# यशवंतराव चव्हाण सेंटर

विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा



**४१वा**
**वार्षिक अहवाल**
**२०२५-२०२६**

**41th**
**Annual Report**
**2025-2026**

www.chavancentre.org




मा. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त, 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०२५', मा. प्रो. अनिल कुमार गुप्ता यांना प्रदान करताना चव्हाण सेंटरचे विश्वस्त, मा. श्री. दिलीप वळसे-पाटील; यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष, मा. डॉ. अनिल काकोडकर; विश्वस्त, मा. श्री. विवेक सावंत, मा. डॉ. समीर दलवाई; मा. डॉ. जब्बार पटेल.




'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०२५' वितरण सोहळा

# ४१वा वार्षिक अहवाल २०२५-२०२६

## यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१
दूरध्वनी क्र.: २२०२८५९८, २२०४५४६०, २२८५२३४५.
फॅक्स: २२८५२०८१, २२८५२०८२
Email: ybchavan100@gmail.com, info@chavancentre.org
Visit us: www.chavancentre.org

शेवटच्या माणसाचे हित हेच आमचे ब्रीद



# सुसंस्कृत नेता

यशवंतराव चव्हाण यांच्या निधनाने आपण एका सुसंस्कृत नेत्याला मुकलो आहोत. सार्वजनिक जीवनात व त्यातही पक्षीय राजकारणात यशवंतराव दीर्घकाळ बाबरले. यानिमित्ताने त्यांनाही राजकीय खेळ्या खेळाव्या लागल्या; पण त्या खेळनही यशवंतरावांनी सुसंस्कृतपणाला रजा दिली नाही. यामुळे संयुक्त महाराष्ट्र वळवळीच्या ऐन रणधुमाळीतही त्यांचे व श्री. एस. एम. जोशी यांचे सहकार्य होत होते. या दोघांच्या स्वभाव वैशिष्ट्यांमुळे त्या चळवळीला यशवंतराव मुख्यमंत्री झाल्यावर वेगळे स्वरूप येऊन सनदशीरतेच्या मर्यादा ओलांडल्या गेल्या नाहीत. गच चळवळीतील दुसरे पुढारी श्री. दत्ता देशमुख यांचे व यशवंतरावांचे घनिष्ठ संबंध राहिले. या संबंधांमुळे देशमुखांनी पक्ष बदलला नाही. हा त्यांचा गुण. त्याचप्रमाणे पक्ष न बदलूनही यशवंतरावांनी स्नेहभाव व पाहुणचार याबाबतीत कमी केले नाही हा त्यांचा गुण तसेच द्वैभाषिक तोडण्याची शिफारस केल्यावरही यशवंतराव दिल्लीत श्री. मोरारजी देसाईकडे उतरत हेही यशवंतरावांच्या स्वभावाचे निदर्शक होते. महाराष्ट्रात असताना व दिल्लीत गेल्यावर त्यांच्या या स्वभावात व दागण्यात फरक पडला नाही. म्हणून कोणत्याही पक्षाचा पुढारी व कार्यकर्ता असो किवा कोणत्याही क्षेत्रात वावरणारी व्यक्ती असो, यशवंतरावांच्या कचेरीचा व निवासस्थानाचा दरवाजा त्यास मोकळा असे. महाराष्ट्राच्या सर्व भागांतल्या, सर्व घरांतल्या लोकांना यशवंतराव हे एखादे अपील कोर्ट आहेत असे वाटे. या प्रत्येकाच्या मनाप्रमाणे होणे शक्य नव्हते; पण आपले मनोगत यशवंतरावांच्या धनावर घातले यातच अनेकांना मानसिक समाधान मिळत होते. लोकांच्या अनंत रुदन्नणी असतात. त्यांना आपले मन कोणातरी जबाबदार व्यक्तीपुढे मोकळे छजेचे वाटते. हे सहानुभूतीने ऐकणारा आणि जमेल तेवढे साहाय्य करणारा यशवंतरावांसारखा नेता ही लोकांची मानसिक गरज होती. म्हणून मराठी जनतेने हे आप्तांसारखे वाटत. त्यांनी स्वत:च आपल्या स्वभावाविषयी लिहिले आहे की त्यांच्यावर उदंड प्रेम केले. त्यांच्याशी राजकीय मतभेद होऊनही सर्वांना यशवंतराव जाण्याचा व नेण्याचा! मुद्दाम दु:ख द्यावे. कोणाचा अवमान करावा हे माझ्या 'माझा एक स्वतंत्र स्वभाव बनला आहे. तो स्वभाव आहे मिळते घेऊन पुढे स्वभावात नाही. कोणी अवमान केला तरी, त्यासाठी उगाच शत्रुत्व करावे असे वाटत नाही... कटुता न ठेवणे आणि कटुता नसणारे वातावरण वाढविणे हा माझा स्वभावधर्म आहे.'

व्यक्तिगत दुरावा व कटुता ठेवण्याचा आणि वाढविण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. या स्वभावाला अनुसरून त्यांचे वागणे-बोलणे होते. मराठी भाषा दणकट. काहीशी रांगडी; पण ती मृदुमुलायम होऊ शकते हे महाराष्ट्रात आधुनिक काळात ज्यांनी दाखवून दिले त्यात यशवंतरावांचा क्रम फार वरचा लागेल.

**- गोविंद तळवलकर**

ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत

(यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या विषयीचे स्मृती संकलन)

**नवे पर्व, नवी दिशा,**

यशवंतराव चव्हाण सेंटर ४१ व्या वर्षात पदार्पण करीत असताना हा अहवाल आपल्या हाती देत आहोत. संस्थेच्या स्थापनेला चार दशकं पूर्ण झाली आहेत. या चार दशकांमध्ये अतिशय मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहेत. शहरं बदलली, खेडी बदलली, शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले, नवीन तंत्रज्ञान आलं, माध्यमं व दळणवळणाचे अनेक पर्याय उपलब्ध झाले, अर्थकारण बदललं, सामाजिक-राजकीय क्षेत्रात अनेक बदल झाले. या सगळ्यामुळे मानवी जीवनात अनेक सोयीसुविधा निर्माण झाल्या हे खरं, मात्र त्याचबरोबर अनेक नवीन समस्याही निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलाच्या परिणामी जगभर अनेक अस्मानी संकटं कोसळताना दिसत आहेत. त्याचबरोबर सतत विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या अविवेकी वापराचा मुद्दाही चिंताजनक आहे. अशा विविध आव्हानांना तोंड देताना लोक गोंधळून गेले आहेत. पुढील पिढीच्या हाती आपण नेमकं काय देणार आहोत, या विषयी एक प्रकारची साशंकता निर्माण झाली आहे.

अशा काळात समाजातील विविध संस्थांनी सुरक्षित आणि समृद्ध भविष्यासाठी आपापली जबाबदारी पार पाडण्याची गरज आहे. पूर्वीपासून करत असलेल्या पारंपरिक कार्याचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. नवीन गोष्टींचा, कार्यपद्धतीचा विचारपूर्वक आणि विवेकाने विचार करून अंगिकार करावा लागणार आहे. अन्यथा सार्वजनिक क्षेत्रातील अनेक संस्था, संघटना कालबाह्य ठरण्याचा मोठा धोका संभवतो. म्हणून नवीन विचार, नवीन रक्ताला संस्थाजीवनामध्ये पुरेसा वाव दिला गेला पाहिजे. नवीन पिढीशी अधिक संवादी राहूनच हे साध्य करता येईल. त्यामुळे संस्थेचे वय वाढत असताना ती थकलेली न दिसता चैतन्यमयी वाटली पाहिजे. समाजाच्या विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सल्ल्याने आमचा असाच प्रयत्न सुरु आहे.

राज्यात आणि देशात सध्या तरुण वर्ग अस्वस्थ असून त्यांनी आंदोलनाचा मार्ग अंगिकारला आहे. बहुतांशवेळा अतिशय जबाबदारीने ते आपली भूमिका मांडताना दिसतात. प्रश्न मांडतात, मागण्या पुढे रेटतात. त्यांना वेळेत आश्वासक प्रतिसाद दिला गेला तर सकारात्मकरितीने गोष्टी पुढे जाऊ शकतात. समाजाला प्रागतिक दिशेने वेगाने पुढे जाण्यासाठी युवा पिढीशी संवाद अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी परंपरा असलेल्या राज्यात याप्रकरणी मोठी भूमिका बजावावी लागणार आहे. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुढील उद्गारातून याचा प्रत्यय येतो.

“पुरोगामी विचाराचे व आचाराचे बोट धरून मी आजवर वाट चालत आलो. देशाला सुखी करण्याच्या शिखराकडे नेणारी ही वाट आपणा सर्वांनाच धरावी लागणार आहे. पुढचा पल्ला एकमेकांच्या साथीनेच गाठावयाचा आहे. ‘सर्वे सुखिन: संतु“ असे घडण्याची शक्ती लाभावी, हीच सदिच्छा!”

स्व. यशवंतराव चव्हाणांच्या या विचाराचा विसर आम्हाला कधीच पडणार नाही. त्यांच्या विचारांची शिदोरी घेऊनच आम्ही आमची पुढील वाटचाल करत राहू. आपल्या सर्वांचे या कार्यात सहकार्य आणि सहभाग मिळत राहावा, अशी आमची मनोमन इच्छा आहे.

सुप्रिया सुळे

**सुप्रिया सुळे**

**कार्याध्यक्ष, यशवंतराव चव्हाण सेंटर**

यशवंतराव चव्हाण सेंटर
विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा

## दृष्टी

आधुनिक आणि समृद्ध समाजाच्या निर्मितीकरिता
सर्व घटकांना संधी निर्माण करून देणे.

## आमची मूल्ये

सेवेची भावना । विश्वासार्हता । प्राविण्य
सर्जनशीलता । उत्तरदायित्व

## कार्यक्षेत्रे

शिक्षण । आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक । महिला
युवा । सांस्कृतिक

# यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

## वार्षिक अहवाल २०२५-२०२६

## अनुक्रमाणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ.क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, चव्हाण सेंटरच्या जिल्हा केद्राचे मा. अध्यक्ष, चव्हाण सेंटरचे विभाग प्रमुख व व्यवस्थापन | ६-९ |
| २ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम | ९ |
| ३ | यशवंतराव चव्हाण सेंटर अंतर्गत राबवण्यात येणारे उपक्रम | १२ |
| ४ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे घेण्यात आलेले महत्त्वाचे कार्यक्रम | १५ |
| ५ | विशेष कार्यक्रम /उपक्रम | १८ |
| ६ | यशवंतराव चव्हाण सेंटर माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी (YCPAIT) | १९ |
| ७ | यशवंतराव चव्हाण सेंटरच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर उपक्रम | २० |
| ८ | यशवंतराव चव्हाण सेंटरला मिळालेले अनुदान | २१ |
| ९ | यशवंतराव चव्हाण सेंटरच्या विभागांमार्फत राबवण्यात आलेले उपक्रम | २२ |
| १० | यशवंतराव चव्हाण सेंटरची जिल्हा केंद्रे | ५९ |
| ११ | यशवंतराव चव्हाण सेंटरची प्रकाशने व व्हिडीओ कॅसेटस् | ८५ |
| १२ | यशवंतराव चव्हाण सेंटरची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | ८७ |
| १३ | कार्यक्रमांची क्षणचित्रे | i-xvi |

# यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

ट्रस्ट रजि. ने. एफ १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. ने. एम. एम. एच. / बी. ओ. एम. - ५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी क्रमांक : २२०२८४९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२

**➢विश्वस्त मंडळ सदस्य➣**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. हेमंत टकले | सरचिटणीस |
| ५. | मा. श्रीम. अदिती नलावडे | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. फ. मुं. शिंदे | सदस्य |
| ७. | मा. श्री. द. म. सुकथनकर | |
| ८. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| ९. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| १०. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | |
| ११. | मा. श्री विवेक सावंत | |
| १२. | मा. डॉ. समीर दलवाई | |
| १३. | मा. सौ. प्रभा कुलकर्णी | |
| १४. | मा. प्रा. फरीदा लांबे | |
| १५. | मा. प्रा. प्रज्ञा दया पवार | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव,
सचिव, (पदनिहाय)
नगर विकास विभाग

१७. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव,
सचिव, (पदनिहाय)
विधी व न्याय विभाग

**➢कार्यकारिणी मंडळ सदस्य➣**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. हेमंत टकले
५. मा. श्रीम. अदिती नलावडे
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. लक्ष्मण माने
८. मा. श्री. प्रकाश आवाडे
९. मा. श्री. हर्षवधन देशमुख
१०. मा. श्री. जीवनराव गोरे
११. मा. श्री. विजय शिर्के
१२. मा. श्री. जयराज साळगांवकर
१३. मा. श्री. सचिन मुळे
१४. मा. श्री. राजेश टोपे
१५. मा. श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पा. पाटील
१६. मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
१७. मा. श्री विवेक सावंत
१८. मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१९. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव,
सचिव, (पदनिहाय)
नगर विकास विभाग

---

**➢ कार्यकारी समिती➣**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरद पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. हेमंत टकले | सरचिटणीस |
| ५. | मा. श्रीम. अदिती नलावडे | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. अजित निंबाळकर | सदस्य |
| ७. | मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ८. | मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |
| ९. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | सदस्य |
| **१०.** | मा. श्री. जयराज साळगावकर | विशेष निमंत्रित |

## यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्रांचे अध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हा केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| २) | जिल्हा केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. महेश बंग |
| ३) | जिल्हा केंद्र, नाशिक | अध्यक्ष | ॲड. नितीन ठाकरे |
| ४) | जिल्हा केंद्र, छत्रपती संभाजीनगर | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| ५) | जिल्हा केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| ६) | जिल्हा केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| ७) | जिल्हा केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. हर्षवर्धन देशमुख |
| ८) | जिल्हा केंद्र, अहिल्यानगर | अध्यक्ष | श्री. चंद्रशेखर घुले पाटील |
| ९) | जिल्हा केंद्र, बीड | अध्यक्ष | श्री. अनिकेत लोहिया |
| १०) | जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | डॉ. निशा कोल्हे माळी |
| ११) | जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| १२) | जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | ॲड. रविंद्र पाटील |
| १३) | जिल्हा केंद्र, नवी मुंबई | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |
| १४) | जिल्हा केंद्र, परभणी | अध्यक्ष | श्री. कांतारावजी देशमुख |
| १५) | जिल्हा केंद्र, नांदेड | अध्यक्ष | श्री. कमलकिशोर कदम |
| १६) | जिल्हा केंद्र, धाराशिव | अध्यक्ष | श्री. जीवनराव गोरे |
| १७) | जिल्हा केंद्र, गडचिरोली | अध्यक्ष | डॉ. धर्मरावबाबा आत्राम |
| २८) | जिल्हा केंद्र, जालना | अध्यक्ष | श्री. राजेश टोपे |
| १९) | जिल्हा केंद्र, बुलढाणा | अध्यक्ष | श्री. राजेंद्र शिंगणे |
| २०) | जिल्हा केंद्र, हिंगोली | अध्यक्ष | श्री. चंद्रकांत नवघरे |
| २१) | जिल्हा केंद्र, भंडारा | अध्यक्ष | श्री. धनंजय माधवराव दलाल |
| २२) | जिल्हा केंद्र, यवतमाळ | अध्यक्ष | ॲड. आशिष देशमुख |
| २३) | जिल्हा केंद्र, कोल्हापूर | अध्यक्ष | श्री. विश्वास बाजीराव पाटील |
| २४) | जिल्हा केंद्र, सिंधुदुर्ग | अध्यक्ष | श्री. उमेश सुंदर गाळवणकर |
| २६) | जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | - |
| २५) | जिल्हा केंद्र, धुळे | अध्यक्ष | श्री. श्री रमेश दाणे |
| २७) | केंद्र, कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पाटील |
| २८) | देवराष्ट्रे (जन्म घर) | | |

........................

| | | |
|---|---|---|
| १) | मानद वास्तुविशारद | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस् |
| २) | सांविधिक लेखा परीक्षक | मे. सी.व्ही.के. असोसिएटस्, मुंबई |
| ३) | अंतर्गत हिशेब तपासनीस | एम. एस. वी. पी. अँड असोसिएटस् |

## यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

| | | |
|---|---|---|
| ● **यशवंत संवाद** | **मानद संपादक** | **सौ. सुप्रिया सुळे** |
| | कार्यकारी संपादक | प्रा. योगेश कुदळे |
| | | डॉ. अनिल पाझारे |
| ● यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | मानद कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ● यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | राज्य समन्वयक | श्री. नीलेश राऊत |

## चव्हाण सेंटर विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| | | सृजन समन्वयक | श्री. विद्याधर खंडे |
| २. | कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| ४. | माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | कोर्स कोऑर्डिनेटर | श्रीम. प्रज्ञा कनोजिया |
| ५. | महिला विभाग | विभाग प्रमुख | श्रीम. साधना तिप्पनाकजे |
| ६. | युवा विभाग | संयोजक | श्री. नीलेश राऊत |
| | | विभाग प्रमुख | श्री. संतोष मेकाले |
| ७. | आरोग्य, दिव्यांग आणि | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| | ज्येष्ठ नागरिक विभाग | समन्वयक | श्री.अभिजीत राऊत |
| | | विभाग प्रमुख | श्रीम. दीपिका शेरखाने |
| ८. | शिक्षण विभाग | मुख्य संयोजक | डॉ. श्री. वसंत काळपांडे |
| | | मुख्य समन्वयक | डॉ. माधव सूर्यवंशी |
| | | विभाग प्रमुख | प्रा. योगेश कुदळे |
| | - यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | डॉ. अनिल पाझारे |
| | - यशवंतराव चव्हाण रिसर्च सेंटर | संचालक | प्रा. योगेश कुदळे |
| | ऑफ सोशल सायन्स (मुंबई विद्यापीठाशी संलग्नित) | | डॉ. अनिल पाझारे |
| | - कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | ॲड. अशद खान |
| ९. | आदिवासी विकास केंद्र | सुकाणू समिती (मान्यवर कार्यकर्ते) | |
| | | समन्वयक | श्री. प्रशांत ईखार |
| १०. | यशवंतराव चव्हाण केंद्र सभागृहे | साहाय्यक-सभागृहे व्यवस्थापक | श्री. विप्लव वागदे |
| ११. | लेखा विभाग | लेखापाल | श्री. महेश चौधरी |

## चव्हाण सेंटर मधील सहकारी

श्री. सुरेश पाटील, श्री. मनोज पोतदार, श्री. निवृत्ती भोर, श्रीम. मिनल सावंत-पाडावे, श्री. यतीन घोडेकर, श्री. राजेंद्र रुपवते, श्री. अनिल चिंदरकर, श्रीम.संजना पवार, श्रीम. सुकेशनी मर्चंडे-शेवडे, श्रीम. मनीषा खिल्लारे, श्रीम. भक्ती जांभवडेकर, श्रीम. पल्लवी वाघ, श्री. प्रशांत ईखार, श्री. अशोक जाधव, श्री. जयेश गुजराथी, श्री. विश्वदत्त मुळे, श्री. मंगेश शिंदे, श्री. सूरज पवार, श्री. शशांक आंबेरकर, श्री. विलास परदेशी, श्री. महेश साळवी, श्रीम. वंदना वाळिंजकर, श्री. संदीप दुर्गोली, श्रीम. तृप्ती वरवडेकर, श्रीम. माधुरी रामाणे, श्री. धनसिंग लाड, श्री. निलेश धुरी, श्री. प्रशांत कोटकर, श्रीम. सुरभी ओटावणेकर, श्री. मयूर गोलतकर, श्री. दीपक खरटमल, श्री. जितु जाधव, श्रीम. नर्मदा देवेंदर, श्री. अतुल तांडेल, श्री. विकास कळंबे, श्री. हुजेर खुरेशी, श्री. विनायक सुतार, श्री. नितीन साहू, श्री. आनंद केळकर, श्रीम. रक्षा मोहिते-बर्पे, सुरक्षा रक्षक, बागकाम कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार.

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईचा सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## १. यशवंतराव चव्हाण सेंटरचे व्यवस्थापन :-

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी चव्हाण सेंटरतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबवण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या या वर्षी १० बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. कार्यकारी समिती बैठकांच्या तारखा २६ एप्रिल २०२५, ७ मे २०२५, २ जुलै २०२५, ६ ऑगस्ट २०२५, २६ सप्टेंबर २०२५, ५ नोव्हेंबर २०२५, ११ डिसेंबर २०२५, ७ जानेवारी २०२६, ४ फेब्रुवारी २०२६, १२ मार्च २०२६ तसेच या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या पुढीलप्रमाणे प्रत्येकी ३ बैठका झाल्या २६ सप्टेंबर २०२५, २५ नोव्हेंबर २०२५, १२ मार्च २०२६ आणि वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्यात आली.

चव्हाण सेंटरच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस में एम. एस. वी. पी. अँड असोसिएटस्, यांच्यामार्फत करण्यात आली. वार्षिक हिशेब तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी. व्ही. के. ॲन्ड असोसिएटस् चार्टर्ड अकाऊटंट याच्याकडून केली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकाच्या अधीन राहून प्रत्येक जिल्हा केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करून घेण्यात आली. चव्हाण सेंटरची वेबसाईट www.chavancentre.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच सेंटरचा ई-मेल ybchavan100@gmail.com; info@chavancentre.org ही आहे.

सभासद संख्या: यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईची निरनिराळ्या प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

(१) विश्वस्त सदस्य - १७ (२) कार्यकारिणी सदस्य १९ (३) संस्थापक सदस्य- १४
(४) संस्था सदस्य - २८ (५) आजीव सदस्य ३१८

महाराष्ट्र शासनाचे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत.

## २. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम :

### मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीदिनी “यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०२५” चे वितरण :

यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे दरवर्षी कृषी औद्योगिक समाज रचना, व्यवस्थापन प्रशासन, सामाजिक एकात्मता, विज्ञान-तंत्रज्ञान, ग्रामीण विकास, आर्थिक-सामाजिक विकास, मराठी साहित्य संस्कृती, कला क्रीडा

या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस हे पारितोषिक व स्मृतिचिन्ह देण्यात येते.

चव्हाण सेंटरच्या वतीने देण्यात येणारे सन २०२५ चे राज्यस्तरीय पारितोषिक मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीदिनी दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी "युसुफ मेहेरअली सेंटर" या संस्थेस प्रदान करण्यात आला. यशवंतराव चव्हाण सेंटरप्रमाणेच युसुफ मेहेरअली सेंटर धर्मनिरपेक्ष आणि पक्ष निरपेक्ष पद्धतीने कार्य करते. या दोन्ही संस्थांची समाजसेवेची व्याख्या समान आहे आणि फुले-शाहू-आंबेडकर या दीपस्तंभांना प्रमाण मानते ही आमच्यासाठी अत्यंत गौरवाची गोष्ट आहे. इथे जमलेल्या सर्व मान्यवरांच्या साक्षीने 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक" युसुफ मेहेरअली सेंटरला प्रदान करण्यात आले त्याचा आम्ही नम्रपणे स्वीकार करतो. युसुफ मेहेरअली आणि यशवंतराव यांचे आगळेवेगळे नाते होते. सुसंस्कृत, सर्जनशील आणि सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्वामुळेच यशवंतराव चव्हाणांचा आम्हाला नेहमीच आदर वाटतो. त्यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या पारितोषिकासाठी आमच्या संस्थेची निवड केल्याबद्दल चव्हाण सेंटरचे ऋण व्यक्त करतो, अशा भावना युसुफ मेहेरअली सेंटरचे सरचिटणीस श्री. मधुकर मोहिते यांनी यशवंतराव चव्हाण सेंटरचे राज्यस्तरीय पारितोषिक स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना केल्या. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने देण्यात येणारे सन २०२५ चे राज्यस्तरीय पारितोषिक युसुफ मेहेरअली सेंटरचे अध्यक्ष श्री. नितीन आणेराव आणि सरचिटणीस श्री. मधुकर मोहिते यांनी यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते स्वीकारले.

अध्यक्षीय भाषणात सेंटरचे अध्यक्ष श्री. शरद पवार म्हणाले की, चव्हाण साहेब प्रागतिक विचारांचे होते. विकासाभिमुख योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या माणसापर्यंत कसा पोहोचेल, याची व्यवस्था करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे यशवंतराव चव्हाण. त्यांचा विचार समाजात अखंड रुजेल असा प्रयत्न यशवंतराव चव्हाण सेंटर करत असते. यशवंतराव चव्हाण साहेबांनी राज्यासह देशाच्या सहकार, शिक्षण, उद्योग, व्यवसाय, शेती व मानवी जीवनाशी संबंधित प्रत्येक कार्यक्षेत्रासाठी दूरदृष्टीपूर्ण भूमिका घेतली. महाराष्ट्र सर्वार्थाने मोठा झाला पाहिजे आणि कायम देशाच्या मुख्य प्रवाहात राहिला पाहिजे, यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. चव्हाण साहेबांनी स्वच्छ आणि लोकाभिमुख शासनव्यवस्था निर्माण करून देशासमोर नवा आदर्श ठेवला. चव्हाण साहेबांनी सत्तेचा गैरवापर केला असे त्यांचे विरोधकही म्हणू शकत नाहीत, ही त्यांच्या कामाची पावती आहे. मी आज जो काही आहे, ते केवळ यशवंतराव चव्हाण साहेबांच्यामुळेच, असे भावोत्कट विचार श्री. शरद पवार यांनी व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या माध्यमातून आम्ही संविधानाच्या वाटेने जाऊ इच्छितो. युसुफ मेहेरअली सेंटरची भूमिका आमच्या विचारांशी अत्यंत सुसंगत आहे. त्यांनी हा पुरस्कार स्वीकारला याचा आनंद वाटला, असे ते म्हणाले.

चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष, सौ. सुप्रिया सुळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात यशवंतराव चव्हाण सेंटरच्या स्थापनेमागील भूमिका विषद करून सेंटरच्या साडेतीन दशकातील कार्याचा मागोवा घेतला. तसेच सध्या चव्हाण सेंटरच्या माध्यमातून राबवण्यात येत असलेल्या समाजाभिमुख योजनांची महिति उपस्थितांना दिली. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जडणघडणीत अनेकांनी योगदान दिले आहे. या सर्वांनी चव्हाण सेंटरला दिशा देण्याचे काम केले आहे, असे सांगून त्यांचे आभार मानले. चव्हाण साहेब यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षी आम्ही स्त्रीभ्रूण हत्येविरोधात जागर उभा केला होता. चव्हाण साहेबांनी दाखवून दिलेल्या वाटेवरून चालण्याचा

आम्ही सर्व जण प्रयत्न करीत आहोत. चव्हाण सेंटर अनेक चांगले उपक्रम राबवत आहे, त्यात काही सुधारणा करायच्या असतील तर अवश्य करू पण यासाठी आपणा सर्वांची साथ गरजेची असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यशवंतराव चव्हाण सेंटर ही संस्था महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीची आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी अनेक दाखले देऊन युसुफ मेहेरअली सेंटरने केलेल्या समाजसेवेबद्दल गौरवोद्गार काढले.

या वेळी सन २०२५ चा 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार' ही जाहीर करण्यात आला. राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी हा पुरस्कार Grassroots Innovations द्वारे राष्ट्रीय एकात्मतेसाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी प्रा. अनिल कुमार गुप्ता यांना जाहीर केला. डॉ. गुप्ता हे तळागाळातील नवोपक्रमांच्या क्षेत्रातील एक भारतीय अभ्यासक आहेत. ते इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबादचे माजी प्राध्यापक असून SRISTI (Society for Research and Initiatives for Sustainable Technologies and Institutions), GIAN (Grassroots Innovations Augmentation Network), Honey Bee Network आणि NIF (National Innovation Foundation) या संस्थांचे संस्थापक आहेत, अशी माहिती डॉ. काकोडकर यांनी दिली.

चव्हाण सेंटरचे मानद कार्यक्रम व्यवस्थापक श्री. दत्ता बाळसराफ यांनी युसुफ मेहेरअली सेंटरला प्रदान करण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन केले. सेंटरच्या कोषाध्यक्ष अदिती नलावडे, विश्वस्त डॉ. समीर दलवाई, विश्वस्त बी. के. अग्रवाल, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर, अर्थशास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, ज्येष्ठ पत्रकार आणि मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

- **मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जयंतीदिनी "यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०२५" चे वितरण**

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार दरवर्षी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी दि. १२ मार्च रोजी प्रदान केला जातो. पुरस्काराचे मानकरी ठरविण्यासाठी, विख्यात अणुशास्त्रज्ञ, डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय पुरस्कार निवड समिती गठित करण्यात आली आहे. या समितीमध्ये एसएनडीटी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. रूपा शाह, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर, अर्थशास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत श्री. विवेक सावंत, आर्किटेक्ट आय.एम. काद्री आणि महात्मा गांधी मिशनचे सचिव, श्री. अंकुशराव कदम हे सदस्य म्हणून काम पाहतात. रु. ५ लाख, मानपत्र, शाल व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

१२ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दिला जाणारा 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०२५" प्रोफेसर डॉ. अनिल कुमार गुप्ता यांना मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या प्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ अनिल काकोडकर, विश्वस्त श्री. विवेक सावंत, चव्हाण सेंटरच्या कोषाध्यक्ष श्रीमती अदिती नलावडे, विश्वस्त बी.के. अगरवाल, डॉ. समीर दलवाई, माजी महापौर निर्मला सामंत-प्रभावळकर, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, चव्हाण सेंटरचे पदाधिकारी, इतर सदस्य आणि मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी प्रोफेसर डॉ. अनिल कुमार गुप्ता यांनी आपले मनोगत व्यक्त केले. परिस्थितीने गरीब असलेली माणसे ज्ञानाने गरीब नसतात. समाज हा समांतर असायला पाहिजे. उभ्या किंवा लंबरेषाकार समाजामध्ये समान संधीअभावी प्रगती खुंटते. लोकांसाठी केलेले शोधकार्य हे त्यांच्या भाषेत झाले तरच अशा कामाचा फायदा होऊ

शकेल. मधमाशा एकप्रकारे याच पद्धतीने आपले काम करीत असतात. स्वयंपाक घरात भांडी ठेवण्याच्या पद्धतीवरून त्या समाजाच्या संकृतीची ओळख होते. चव्हाण सेंटरचे कार्य अदभुत आहे. ते वेबसाईटच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ४२ हजार गावांमध्ये पोहोचविण्यासाठी प्रत्येक गावाची स्वतंत्र वेबसाईट निर्माण झाली पाहिजे. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी माझी निवड झाली याचा मला मनस्वी आनंद होत आहे. यशवंतराव चव्हाण सेंटरने दिलेला सन्मान हा माझा नसून मी शोधयात्रेद्वारे तळागाळातील नवोपक्रम राबविण्यासाठी ज्यांच्याबरोबर गावोगाव फिरलो, अशा सामान्य माणसांचा हा सन्मान आहे, अशा कृतज्ञापूर्ण भावना त्यांनी व्यक्त केल्या.

मानपत्राचे वाचन डॉ. समीर दलवाई यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले.

## ३. यशवंतराव चव्हाण सेंटर अंतर्गत राबवण्यात येणारे उपक्रम :-

### ३.१ सभागृहे

- **मुख्य सभागृह :-** यशवंतराव चव्हाण सेंटर मधील सभागृहाचा वापर चव्हाण सेंटरने आयोजित केलेले विविध कार्यक्रम तसेच निरनिराळ्या सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराथी व इंग्रजी नाटके, संगीत, सभा आदी कार्यक्रमही झाले.

- **सांस्कृतिक, रंगस्वर व ऋणानुबंध सभागृह :** सांस्कृतिक सभागृह, रंगस्वर व ऋणानुबंध सभागृह या तिन्ही सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. वरील तिन्ही सभागृहे आवश्यक त्या सर्व सोयींनी युक्त व अद्ययावत करण्यात आली आहेत. पुस्तक प्रकाशन, संगीत कार्यक्रम, एकांकिका, नाट्यस्पर्धा, वार्षिक सर्वसाधारण सभा. इ. कार्यक्रम या ठिकाणी संपन्न होतात.

- **विरंगुळा :** येथे पिकलबॉल, सृजन, प्रायोगिक नाटकांची तालीम, तसेच शनिवारी शेतकरी बाजार, पुस्तक प्रकाशन, विविध प्रकारचे प्रदर्शन आदी कार्यक्रम हेतात.

### ३.२ यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय :

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयाची स्थापना २५ नोव्हेंबर १९९६ रोजी झाली असून हे एक सुसज्ज संदर्भ ग्रंथालय म्हणून ओळखले जाते. गरजू आणि स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक माहिती उपलब्ध करून देणे हे या ग्रंथालयाचे मुख्य उद्दिष्ट आहे. ग्रंथालयाचे प्रमुख म्हणून ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक, डॉ. अनिल पाझारे आणि साहाय्यक ग्रंथपाल म्हणून भक्ती जांभवडेकर काम पाहत आहेत. ग्रंथालयाचे व्यवस्थापन अधिक गतिमान करण्यासाठी `SLIM' म्हणजे लायब्ररी इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट सॉफ्टवेअर या संगणकीकृत प्रणालीचा वापर केला जातो. ग्रंथालयात वैशिष्ट्यपूर्ण ऑनलाईन माहितीसह समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भाषाशास्त्र, प्रशासन, व्यवस्थापन, शिक्षण, इतिहास, भूगोल, शेती, कायदा आणि संस्कृती अशा विविध विषयांवरील पुस्तकांसोबतच चरित्र, आत्मचरित्र, धर्मकोश, विश्वकोश, गॅझिटीयर, ॲटलास, इन्सायक्लोपीडिया यासारखे महत्त्वाचे संदर्भ ग्रंथ आणि नियतकालिके उपलब्ध आहेत. MPSC, UPSC सारख्या

स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी ग्रंथालयाचा लाभ घेतात.

- **ग्रंथालयीन सभासद**

'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय' या संदर्भ ग्रंथालयातून ग्रंथ वाचण्यासाठी किंवा सोबत घेऊन जाण्याची सुविधा उपलब्ध आहे. याकरिता वार्षिक वर्गणी रु.१०००/- व अनामत रक्कम रु.५००/- आहे. सभासदांना एकावेळी दोन पुस्तके/ग्रंथ देण्यात येतात. ते पंधरा दिवसात परत करणे आवश्यक असते. संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करावयाचा असतो, ते घरी नेता येत नाहीत. अनामत रकमेपेक्षा पुस्तकाची किंमत जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येते. महाविद्यालयीन व उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांच्याकरिता सवलतीची वार्षिक वर्गणी रु.५००/- असून या सभासदांना ग्रंथ किंवा नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. संदर्भाकरिता येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सहा महिन्याकरिता रु.६००/- फी आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाचे व्यवस्थापन संगणकीकृत करण्यात आले आहे.

**दि. ३१.०३.२०२६ रोजी ग्रंथालयाची सभासद फी व सभासदांची एकूण संख्या**

- संयुक्त संस्था सभासदत्व (Corporate Membership)

ग्रंथालयाने संस्थात्मक पातळीवरही सभासदत्वाची सोय केली आहे. यामध्ये कॉर्पोरेट संस्थांसाठी ५ वर्षांकरिता रु. ५०,०००/- वर्गणी असलेले 'संयुक्त संस्था सभासदत्व' उपलब्ध आहे. कॉर्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येत नाही, परंतु एखाद्या दुर्मीळ व किमती पुस्तकासाठी चव्हाण सेंटर निश्चित करील तेवढी रक्कम घेण्यात येते. एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके दिली जातात.

- संस्था सभासदत्व (Institutional Membership)

यासाठी UGC, ICSSR, ICCR, ICHR किंवा शासन मान्यताप्राप्त शिक्षण, संशोधन व सांस्कृतिक संस्थांसाठी 'संस्था सभासदत्व' दिले जाते.

- संस्था सभासदत्व: ना परतावा प्रवेश फी रु.१,०००/-; वार्षिक वर्गणी रु.५,०००/-

- दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासदत्व: ५ वर्षांसाठी एकवेळ वर्गणी रु.२०,०००/- असून एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके दिली जातात.

- **संयुक्त संस्था सभासदस्यत्व व संस्था सभासदस्यत्व**

सदस्यत्व संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येते. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येते. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक-दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्यावतीने पुस्तके घेण्यास, तसेच परत करण्यास नामनिर्देशित करू शकतात. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागते. मात्र, पुस्तके सुस्थितीत वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे, ही जबाबदारी संस्थाप्रमुखाची असते. वरील सभासदत्व देण्याचा किंवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार चव्हाण सेंटरला राहील.

महाविद्यालयीन विद्यार्थी वार्षिक फी रु.५००/-, सर्वसामान्य सभासद फी रु.१०००/- अनामत रक्कम

रु.५००/-, विद्यार्थी रेफरन्स वार्षिक फी रु.५००/-, ६ महिन्याकरिता फी रु.६००/- आहे. आजमितीस ग्रंथालयाचे एकूण ४९४३ सभासद आहेत. सन २०२५-२०२६ मध्ये ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाचे रु.१,९८,५२८/- अनुदान मिळाले आहे.

**ग्रंथालयाचे उपक्रम**

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (साहित्य) २०२५ कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने देण्यात येणाऱ्या शरद पवार साहित्य फेलोशिपचे (२०२५) चौथे वर्ष आहे. दि. २ व ३ मे २०२५ रोजी सिंहगड इन्स्टिट्युट, लोणावळा येथे दुसरी कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस निवड झालेले १२ युवा लेखक व त्यांचे मेंटर प्रा. नीतीन रिंढे, डॉ. राजीव नाईक, श्री. गणेश विसपुते, श्री. मुकुंद कुळे, श्री. किरण येले, डॉ. करुणा गोखले, श्री. संग्राम गायकवाड उपस्थित होते.

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (साहित्य) २०२५ कार्यशाळा**

दि. ४ व ५ ऑक्टोबर २०२५ रोजी राजस्थान भवन, वाशी येथे तिसरी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेस निवड झालेले १२ युवा लेखक व त्यांचे मेंटर प्रा. नीतीन रिंढे, डॉ. राजीव नाईक, श्री. गणेश विसपुते, श्री. मुकुंद कुळे, श्री. किरण येले, डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते. शरद पवार साहित्य फेलोशिप कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रामध्ये दत्ता बाळसराफ यांनी प्रास्ताविक केले. नवे प्रवाह निर्माण करणाऱ्या लेखकांना दिशा देणे आणि नव्या विचारांच्या अंकुरांना बळ देणे हा या फेलोशिपचा मूलभूत उद्देश आहे.

सकाळच्या सत्रात नॉन फिक्शनच्या चार फेलोंनी आपापले लेखन सादरीकरण केले. प्रत्येक सादरीकरणात वेगवेगळे विषय, दृष्टिकोन आणि अभिव्यक्तीचे प्रकार पाहायला मिळाले. सादरीकरणांनी नव्या पिढीतील लेखकांची विचारसंपन्नता, भाषा शैलीतील वैविध्य आणि साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधोरेखित झाला. मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या प्रा. डॉ. नीतीन रिंढे, ज्येष्ठ लेखक गणेश विसपुते, प्रा. डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. करूणा गोखले, राजीव नाईक, डॉ. कुमुद कुळे आणि किरण येले यांनी फेलोंच्या लेखनावर सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या. त्यांनी सृजनाची दिशा, विषयांमधील गूढार्थ, भाषेची मांडणी आणि अभिव्यक्तीतील सूक्ष्मतेवर अत्यंत मार्गदर्शक चर्चा घडवून आणली. या सत्रामुळे फेलोंना स्वतःच्या लेखनाचा नव्याने विचार करण्याची, त्यात सुधारणा आणि विस्तार करण्याची प्रेरणा मिळाली. साहित्यिक संवाद, विचारांची देवाणघेवाण आणि मार्गदर्शकांचे प्रोत्साहन यामुळे कार्यशाळेचा प्रारंभच प्रेरणादायी वातावरणात झाला.

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (साहित्य) २०२६ कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर पुरस्कृत 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (साहित्य) २०२६" अंतर्गत दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय मिल मजदूर संघ, खंडाळा येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या कार्यशाळेला फेलोंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सर्व १२ फेलो उपस्थित होते. मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ लेखिका डॉ. करुणा गोखले, प्रा. डॉ. शमसुद्दिन तांबोळी, लेखक-तंत्रज्ञ गौरव सोमवंशी, लेखक गणेश मतकरी आणि रवींद्र झेंडे उपस्थित होते. या वेळी डॉ. अनिल पाझारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले,

तर दत्ता बाळसराफ यांनी आपल्या प्रास्ताविकात यशवंतराव चव्हाण सेंटर – शरद पवार इन्स्पायर फेलोशिपची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर डॉ. करुणा गोखले यांनी फेलोशिपची संकल्पना, कार्यपद्धती आणि आपण या फेलोशिपसोबत का आहोत याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दिवसभरात पाच फेलोंनी आपले लेखन आणि सादरीकरण केले. त्यावर विषयानुरूप झालेल्या चर्चेमध्ये डॉ. गणेश मतकरी, डॉ. करुणा गोखले, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, रवींद्र झेंडे, दत्ता बाळसराफ यांनी सहभाग घेतला.

- **मार्गदर्शकांचे मनोगत**

१) प्रा.डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी साहित्याची भूमिका, सामाजिक बांधिलकी आणि समकालीन संदर्भ यावर विस्तृतपणे विचार मांडले.

२) गौरव सोमवंशी यांनी ब्लॉकचेन तंत्रज्ञान, त्यामागील विज्ञान आणि आधुनिक लेखन-चिंतनाशी त्याचा संबंध स्पष्ट करून नवे तंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी साहित्यिकांनी ठेवावी, असे प्रतिपादन केले .

या वेळी फेलो आणि मार्गदर्शक यांच्यात साहित्यनिर्मिती, समकालीन सामाजिक प्रश्न आणि लेखनातील जबाबदारी या विषयांवर सांगोपांग चर्चा झाली .दोन दिवस चाललेल्या या कार्यशाळेत विविध साहित्यप्रकारांमध्ये कार्यरत असलेल्या फेलोंनी त्यांच्या सुरू असलेल्या लेखनाचे सादरीकरण केले, त्यांना अनुभवी लेखक व मार्गदर्शकांचे तेथेच मार्गदर्शन लाभले.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन केतनकुमार पाटील यांनी केले. फेलोंच्या विषयांचा संदर्भ, लेखनाची दिशा आणि साहित्यनिर्मितीमधील विविध पैलूंवर त्यांनी समर्पक भाष्य केले.

डॉ. अनिल पाझारे यांनी फेलोशिपची प्रक्रिया, कार्यशाळेचे स्वरूप, सादरीकरणांचे महत्त्व आणि मार्गदर्शकांकडून मिळणाऱ्या अभिप्रायाची भूमिका याविषयी माहिती दिली.

## ४. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे घेण्यात आलेले महत्त्वाचे कार्यक्रम :-

- **बहुचर्चित नाटक 'मार्क्स इन सोहो'' चे सादरीकरण**

'प्रत्यय, कोल्हापूर' निर्मित साम्यवादी विचारवंत कार्ल मार्क्स यांच्या जीवनावर बेतलेले 'मार्क्स इन सोहो' या नाटकाचे सादरीकरण दि. २९ एप्रिल २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे करण्यात आले. सदरीकरणास प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला

- **यशवंत लघुपट महोत्सव/स्पर्धा २०२५**

यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे ३० एप्रिल २०२५ रोजी '**यशवंत लघुपट महोत्सव/स्पर्धे**'चे आयोजन करण्यात आले होते. '**आजच्या समाजात महिलांची बदलती भूमिका**' हा अत्यंत संवेदनशील विषय स्पर्धेसाठी ठेवण्यात आला होता. या स्पर्धेसाठी राज्यभरातून एकूण १२१ अर्ज प्राप्त झाले. सुप्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, प्रख्यात छायाचित्रकार श्री. महेश लिमये, सुप्रसिद्ध पटकथा लेखिका श्री. मनिषा कोर्डे व सुप्रसिद्ध चित्रपट समीक्षक आणि लेखक श्री. गणेश मतकरी या सदस्यांची निवड समिती गठित करण्यात आली होती. निवड समितीने प्राप्त अर्जांमधून स्क्रीनिंगसाठी २२ सर्वोत्कृष्ट लघुपटांची निवड केली. 'सर्वोत्कृष्ट लघुपट' हा मुख्य

पुरस्कार '**रंग**' आणि '**वी, द पफकॉर्न्स ऑफ इंडिया**' या दोन लघुपटांना विभागून देण्यात आला. तसेच निवड समितीतर्फे '**विथ लव्ह, मम्**' या लघुपटास विशेष पुरस्कार देण्यात आला. याव्यतिरिक्त पुढील वैयक्तिक पुरस्कार देण्यात आले :

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन -** श्री. आदित्य मुंगडे (लघुपट: वी, द पफकॉर्न्स ऑफ इंडिया)
**सर्वोत्कृष्ट पटकथा लेखन -** श्री. सुशांत घाडगे / महेश कुलकर्णी (लघुपट: ॲनिव्हर्सरी / Anniversary)
**सर्वोत्कृष्ट छायाचित्रण -** श्री. रोहित निकम (लघुपट: रंग)
**सर्वोत्कृष्ट अभिनेता -** श्री. श्रीराम व्यंकट (लघुपट: कुझांथा / Kuzhantha)
**सर्वोत्कृष्ट अभिनेत्री -** श्रीमती वैष्णवी घोडके (लघुपट: वी, द पफकॉर्न्स ऑफ इंडिया)

चषक, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन विजेत्या कलाकारांचा आणि तंत्रज्ञांचा गौरव करण्यात आला. निवड समितीबरोबरच समन्वयक प्रमुख श्री. श्रीनिवास नार्वेकर, क्रिएटिव्ह प्रमुख आणि क्रिएटिव्ह डिझाइन श्री. सौरभ करंदीकर, महोत्सव समन्वयक ईशा घरत, महोत्सव समन्वयक श्री. अनुप हरिश्चंद्रे, डॉ. संतोष पाठारे तसेच सोशल मिडियासाठी श्रीमती सुप्रिया चव्हाण यांनी स्पर्धेच्या यशस्वितेसाठी आपले योगदान दिले. महिला सक्षमीकरणावर प्रकाश टाकणारा हा महोत्सव प्रेक्षकांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला.

- **'अरे संसार संसार'- बहिणाबाईंच्या कवितांचा सांगीतिक कार्यक्रम**

कविवर्य ना. धों. महानोर यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई, भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशन आणि परिवर्तन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी बहिणाबाईंच्या अजरामर कवितांचा परिवर्तन (जळगाव) निर्मित सांगितिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे, ज्येष्ठ सिनेदिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, डॉ. श्यामकांत देवरे, श्री. नारायण बाविस्कर, श्रीमती राजश्री शिंदे उपस्थित होते. बहिणाबाईंच्या शेतीशी संबंधित कवितांनी या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. बहिणाबाईंच्या कवितांची माहिती देत, माझी माय सरस्वती, खोप्यामधी खोपा, धरतीच्या कुशीमंदी आदी कविता तसेच कवी ना. धों. महानोर यांच्या कविताही सादर करण्यात आल्या. श्री. शंभू पाटील यांच्या अभ्यासपूर्ण निवेदनामुळे कार्यक्रम रंजक व उद्बोधक झाला. काव्यप्रेमी मोठ्या संख्येने या सांगितिक कार्यक्रमास उपस्थित होते.

- **कविवर्य ना. धों. महानोर पुरस्कार वितरण सोहळा**

शुक्रवार, २६ सप्टेंबर २०२५ रोजी, यशवंतराव चव्हाण सेंटर आणि भवरलाल अँड कांताबाई जैन फाउंडेशन, जळगाव यांच्या वतीने कविवर्य ना. धों महानोर साहित्य, शेती-पाणी पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यत आला होता. याप्रसंगी चव्हाण सेंटरचे उपाध्यक्ष, श्री. अरुण गुजराथी, सेंटरच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रियाताई सुळे, जैन इरिगेशनचे श्री अशोकजी जैन, प्रख्यात दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, श्रीमती सरलाताई

महानोर आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी ना. धों. महानोर यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. कविवर्य ना.धों. महानोर यांनी साहित्य आणि शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले होते. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साहित्य आणि शेती - पाणी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना दरवर्षी हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यंदाचे या पुरस्काराचे दुसरे वर्ष. या वर्षी पालघर येथील श्रीमती साधना उमेश वर्तक आणि नंदुरबार येथील श्रीमती कुसुम सुनील राहसे यांना कविवर्य ना. धों. महानोर शेती-पाणी पुरस्कार तर चंद्रपूर येथील श्री. अविनाश पोईनकर, बुलढाणा येथील श्री. वैभव देशमुख, मराठवाडा येथील श्रीमती सुचिता खल्लाळ आणि पुणे येथील श्रीमती हिनाकौसर खान यांना कविवर्य ना. धों. महानोर साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

- **दिवंगत शरद काळे स्मृती व्याख्यान**

मा. शरद काळे हे प्रशासनातील गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांची समाजाप्रति असलेली बांधिलकी, त्यांनी वेगवेगळ्या पदांवर काम करीत असताना जनतेसाठी घेतलेले योग्य निर्णय यामुळे ते नेहमीच आदरणीय असल्याची भावना लोकसत्ताचे संपादक आणि व्यासंगी पत्रकार गिरीश कुबेर यांनी व्यक्त केली. यशवंतराव चव्हाण सेंटर, प्रथम आणि एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईतर्फे माजी सनदी अधिकारी दिवंगत शरद काळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शनिवार, १७ ऑक्टोबर २०२५ रोजी नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटरच्या रंगस्वर सभागृहात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. न्यायालयाने निष्पक्ष न्यायदान करणे, नोकरशहांची बांधिलकी कर्तव्याशी असली पाहिजे आणि पत्रकाराने वाचकाशी प्रतारणा करू नये, अशी अपेक्षा असते. पण सध्याच्या कालखंडात न्यायाधीश, अधिकारी, संपादक यांची अभद्र युती देशात राज्य करतेय. समाजाने शासकीय आदेश निमूटपणे ऐकणे हे समाजाच्या ऱ्हासाचे लक्षण आहे. एकेकाला स्वतंत्रपणे काम करू देणे हे केव्हाही चांगले. धर्मसत्तेला प्रश्न विचारलेले आवडत नाही, असे त्यांनी प्रतिपादन केले. कुबेर यांनी 'प्रशासन, माध्यमं आणि राजकारण : नवे समीकरण' या विषयावर विविध संदर्भ देत सविस्तर माहिती देऊन देशातील सद्य: स्थितीवर विवेचन केले.

एशियॉटिक सोसायटी ऑफ मुंबईच्या अध्यक्ष प्रो. विस्पी बालापोरिया कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. तर शरद काळे यांच्या पत्नी सुनीती काळे, कन्या सुचित्रा काळे, दिवंगत काळे यांचे समकालीन वरिष्ठ सनदी अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. 'प्रथम' या स्वयंसेवी संस्थेच्या सहसंस्थापक विश्वस्थ प्रा. फरिदा लांबे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी शरद काळे यांच्या स्मृतींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले.

- **काला घोडा आर्ट फेस्टिवल २०२६**

मुंबईच्या स्थापत्यकलेचा प्राचीन वारसा मिरवणाऱ्या, विविध कलाविष्कारांना प्रोत्साहन देणारा आणि देशभरातील हस्तकलेच्या वस्तूंना बाजारपेठ देणारे काळाघोडा फेस्टीवल २०२६ दि. ३१ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान पार पडले. यशवंतराव चव्हाण सेंटर हे दरवर्षीप्रमाणे यंदाही काळाघोडा फेस्टिवलचे 'व्हेन्यू पार्टनर' होते. काळाघोडा फेस्टिवल दक्षिण मुंबईतल्या काळाघोडा परिसर, यशवंतराव चव्हाण सेंटर, कामा हॉल, क्रॉस मैदान, हॉर्निमन सर्कल, कूपरेज बँड स्टँड गार्डन यांसारख्या ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी

पार पडला.

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहांमध्ये विविध भाषेतील उत्तम प्रायोगिक नाटके व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. त्यास प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद होता. चव्हाण सेंटरचे विविध विभाग आणि त्यांच्यातर्फे सुरु असणाऱ्या प्रकल्पांबाबत माहिती देण्यासाठी क्रॉस मैदानावर प्रमोशनल स्टॉल लावण्यात आला होता. त्यास अभ्यागतांचा भरपूर प्रतिसाद मिळाला.

- **"कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक धोरण कायदा २०१३" विषयावर जनजागृतीपर कार्यशाळा"**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या विशाखा समितीच्या पुढाकाराने दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी "कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, २०१३" या विषयावर जनजागृतीपर कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यस्थळी महिलांना सुरक्षित, सन्माननीय व समान संधीचे वातावरण निर्माण करणे तसेच संबंधित कायद्याची माहिती सर्व कर्मचारी वर्गापर्यंत पोहोचविणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

सदर कार्यशाळेत प्रथम संस्थेच्या संचालक तसेच विशाखा समितीच्या पीठासीन अधिकारी मा. फरीदा लांबे यांनी कायद्याची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, तरतुदी, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया, विशाखा समितीची रचना व जबाबदाऱ्या तसेच संस्थात्मक पातळीवर घ्यावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी कार्यस्थळी सन्मानपूर्वक वागणूक, लैंगिक संवेदनशीलता आणि परस्पर आदर राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीच्या कोर्स कोऑर्डिनेटर तसेच विशाखा समितीच्या सदस्य मा. प्रज्ञा कनोजिया यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यशाळेचे प्रास्ताविक केले व सदर विषयाचे संस्थात्मक व सामाजिक महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी चव्हाण सेंटरचे ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक तसेच विशाखा समितीचे सदस्य मा. डॉ. अनिल पाझारे यांनी मार्गदर्शक, उपस्थित कर्मचारी व कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यशाळा कर्मचारी वर्गामध्ये कायदेशीर जागरूकता निर्माण करणारी व कार्यस्थळी सुरक्षित वातावरण वृद्धिंगत करणारी ठरली.

## ५. विशेष कार्यक्रम / उपक्रम :-

### ५.१ शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (SPIF) (शेती, शिक्षण आणि साहित्य)

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने सेंटरचे अध्यक्ष मा. शरदचंद्र पवार यांच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्याच्या निमित्ताने त्यांच्या देदीप्यमान कारकिर्दीला सलाम करण्यासाठी सन २०२२ पासून **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप** सुरु करण्यात आली. याअंतर्गत कृषी (Sharad Pawar Inspire Fellowship in Agriculture), साहित्य (Sharad Pawar Inspire Fellowship in Literature) आणि शिक्षण (Sharad Pawar Inspire Fellowship in Education) या क्षेत्रातील युवा पिढीतील गुणवंतांना आपआपल्या क्षेत्रात कर्तृत्व गाजविण्याची संधी दिली जाते. 'Sharad Pawar Inspire Fellowship in Education' च्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात नवे

काही करू पाहणाऱ्या गुणवंत शिक्षकांना प्रोत्साहन देण्यात येते. त्यांच्याकडून गुणवत्तापूर्ण काम व्हावे तसेच मूलभूत संशोधनास वाव मिळावा हा या फेलोशिपचा उददेश आहे. दरवर्षी महाराष्ट्रापुढील शैक्षणिक आव्हानांची जाण असणाऱ्या ३० शिक्षकांना (२० प्राथमिक आणि १० माध्यमिक शिक्षकांना), साहित्यामध्ये १२ तर शेती क्षेत्रामध्ये ८० जणांना ही फेलोशिप देण्यात येते. त्यांना नवी आव्हाने व संधींशी सुसंगत अशा त्यांच्या पसंतीच्या उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी रोख रक्कम व सातत्यपूर्ण मार्गदर्शन देण्यात येते. MKCL चे मुख्य मार्गदर्शक मा. विवेक सावंत शिक्षण फेलोशिपचे मुख्य समन्वयक आहेत. डॉ. वसंत काळपांडे, श्रीम. धनवंती हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही फेलोशिप वाटचाल करीत आहे. याशिवाय यावर्षीपासून बालशिक्षणात काम करणाऱ्या १० अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षक सीडीपीओ यांना फेलोशिप दिली जाणार आहे. सन २०२५-२६ मध्ये प्राथमिक साठी १४२ तर माध्यमिक साठी ६४ अर्ज प्राप्त झाले आहेत.

अर्ज छाननी, मुलाखत व निवड असे टप्पे या फेलोशिप मध्ये आहेत. निवडलेले उमेदवार वर्षभर सेंटर सोबत असतात. त्यांना मार्गदर्शक (मेंटॉर) देण्यात येतो. वर्षभरातं तीन निवासी कार्यशाळा घेऊन त्यांना मार्गदर्शन केले जाते. तसेच त्यांना शिष्यवृत्तीही दिले जाते.

## ६. यशवंतराव चव्हाण सेंटर माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी (YCPAIT) :-

- यशवंतराव चव्हाण सेंटरचा अंगिकृत उपक्रम असलेली माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी (AIT) ही Centre for Development of Advanced Computing (C-DAC) आणि Maharashtra Knowledge Corporation Limited (MKCL) चे संगणक प्रशिक्षणासाठी चालविण्यात येणारे अधिकृत केंद्र आहे. या केंद्रात वेगवेगळे संगणकीय कोर्सेस चालवले जातात. यामध्ये ग्राफिक्स, अकाऊन्टिंग, मायक्रोसॉफ्ट ऑफिसचे विविध कोर्सेस, प्रोग्रामिंग, कोडिंग तसेच आरटीफ़िशिअल इंटेलीजेंस्या कोर्सेसचा समावेश आहे. याचबरोबर ए. आय. चे वेगवेगळे टूल्स आपण MKCL च्या अधिकृत कोर्सेस मधून शिकविले जातात.

- विविध राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांसाठी अधिकृत केंद्र म्हणून YCC AIT ला मान्यता प्राप्त झाली आहे. संस्थेचे नाव आता परीक्षा पटलावर एक आधुनिक व सुसज्ज परीक्षा केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. वेगवेगळ्या स्तरावरील व क्षेत्रातील प्रवेश परीक्षा या केंद्रातर्फे घेतल्या जातात. दृष्टिहीन मुलांसाठी संगणक कोर्ससंबंधी आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षांसाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयीसुविधा परीक्षा आयोजकांना या केंद्रात उपलब्ध करून दिल्या जातात. शिवाय या परीक्षांच्यावेळी YCC AIT चे मार्गदर्शक-साहाय्यक तिथे उपस्थित असतात. दृष्टिहीन बालकांसाठी परीक्षा केंद्र म्हणून अधिक सुविधा निर्माण करण्याचा YCC AIT प्रयत्न करीत आहे.

- AIT मार्फत चालविण्यात येणाऱ्या PG DAC (Diploma in Advanced Computing) ह्या कोर्समध्ये विद्यार्थी वेगवेगळे कोडिंग शिकतात. कोर्सच्या अंतिम परीक्षेमध्ये मिळालेल्या त्यांच्या यशावर त्यांना कंपनीकडून नोकरी मिळण्याची संधी अवलंबून असते. PG DAC या अभ्यासक्रमासाठी केंद्राद्वारे कॅम्पस प्लेसमेंट मोहीम आयोजित केली जाते. सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या तणावाचा परिणाम या कोर्सेसच्या प्रवेश प्रक्रियेवर तर होत आहेच; शिवाय याचे पडसाद नोकऱ्यांच्या उपलब्धतेवरही होत

असल्याचे दिसून येते. असे असले तरी, फेब्रुवारी महिन्यात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंट्सने ५० टक्क्यांचा टप्पा ओलांडला आहे. मार्च-एप्रिल २०२६ या दोन महिन्यांच्या कालावधीत सुमारे ७० कंपन्यांना कॅम्पसवर आणण्यात YCC AIT यशस्वी ठरली आहे.

PG DAC या कोर्सचे नाव बदलून PG CPAC (Certificate Course in Advanced Computing) असे करण्यात आले आहे. विशेष म्हणजे हा कोर्स केल्याने YCC AIT ला आंतरराष्ट्रीय क्रेडीट पॉइंटस्‌मिळणार आहेत. त्यामुळे भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठी सूट मिळते. नोकरीच्या ठिकाणी ही बाब विशेषत्वाने विचारात घेतली जात असल्याने नोकरी मिळण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध होतात. त्यामुळे हा कोर्स करण्याकडे विद्यार्थ्यांचा अधिक कल आहे.

PG CPAC हा एक पूर्णवेळ कोर्स आहे. C-DAC च्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांसाठी टेक्नॉलॉजी सोबत मानसिक स्वास्थ्यावर सुद्धा कार्यशाळा घेतल्या जातात. १८ मार्च २०२६ रोजी अशी कार्यशाळा घेण्यात आली होती. ही कार्यशाळा आयोजित करण्यामध्ये चव्हाण सेंटरच्या युवा विभागाचे प्रमुख श्री. संतोष मेकाले यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांचे सुप्त गुण प्रकर्षाने पाहावयास मिळाले. आवडीचे छंद जोपासण्याला संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

विद्यार्थ्यांनी सहा महिन्यांचा संगणकीय अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, त्यांच्यासाठी एक छोटेखानी दीक्षांत समारंभ आयोजित केला जातो. अशा कार्यक्रमांद्वारे संस्थेला आणि विद्यार्थ्यांना मिळणारे यश सर्वांपर्यंत पोहोचते, आणि मुलांना मिळणारा आनंद, कॉर्पोरेट जगतात संस्थेचे होणारे नाव असे अनेक हेतू साध्य होतात.

संस्थेची उत्तोरोत्तर प्रगती व्हावी असा येथील प्रत्येक व्यक्तीचा प्रयत्न असतो.

## ७ यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर उपक्रम :-

● **प्रथम मुंबई शिक्षण उपक्रम :-** मुंबई शहरात झोपडपट्टीवासीयांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाड्या चालविणे, संगणकाचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून या उपक्रमाकरिता शिक्षक शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कामे प्रथम मुंबई शिक्षण उपक्रमामार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास चव्हाण सेंटरकडून सहकार्य करण्यात येते. या संस्थेचे कार्यालय चव्हाण सेंटरच्या केंद्रीय इमारतीच्या चौथ्या मजल्यावर आहे.

● **युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स :-** युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य चव्हाण सेंटरच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृद्धीसाठी ते फार महत्त्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळ्या क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करून घेता येईल, याची माहिती प्रसिद्ध केली जाते. या संस्थेचे कार्यालय चव्हाण केंद्र इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आहे.

● **महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ :-** महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास

वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरू करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सक पद्धतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे कार्यालय केंद्र इमारतीतील तिसऱ्या मजल्यावर आहे.

- **बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन (मुंबई फर्स्ट) :-** मुंबई फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारून येथील पायाभूत सुविधांमध्ये विकास करून नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते. या संस्थेचे कार्यालय चव्हाण सेंटरच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आहे.

## ८ यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईला मिळालेले अनुदान

यशवंतराव बव्हाण सेंटर, मुंबईला सन २०२५-२६ मध्ये रु. २,५३,१४,६००/- (रु. दोन करोड त्रेपन्न लाख चौदा हजार सहाशे फक्त) इतकी रक्कम देणगी म्हणून प्राप्त झाली आहे.

> **" भारतीय संगीत, रंगभूमी या संकल्पना आता रुढ होत आहेत. तशी भारतीय साहित्य ही संकल्पना आता रुढ झाली पाहिजे. पण असे व्हावयाचे असेल तर मराठी वाङ्.मयातील उत्कृष्ट कृतीचे रुपांतर हिंदीमध्ये व्हावयास पाहिजे."**
>
> **-यशवंतराव चव्हाण**

## ९. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या विभागांमार्फत राबवण्यात आलेले उपक्रम :

### ९.१ महिला विभाग

- **'यशस्विनी सन्मान पुरस्कार सोहळा '**

रविवार, दि. २२ जून २०२५ रोजी आदरणीय शरद पवार साहेबांच्या उपस्थितीत बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने **"यशस्विनी सन्मान सोहळ्या"**चे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. श्यामल गरुड यांना **'यशस्विनी साहित्य सन्मान'**, गडचिरोली येथील श्रीमती मनिषा सजन पवार यांना **'यशस्विनी कृषी सन्मान'**, रायगड येथील श्रीमती उल्काताई महाजन यांना 'यशस्विनी सामाजिक सन्मान', मुंबई येथील श्रीमती अलका धुपकर यांना **'यशस्विनी पत्रकारिता सन्मान'**, धाराशिव येथील श्रीमती कमल कुंभार यांना **'यशस्विनी उद्योजकता सन्मान'** तर अहिल्यानगर येथील डॉ. शबनम शेख यांना **'यशस्विनी क्रीडा प्रशिक्षक सन्मान'** या पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

चव्हाण सेंटरच्या कार्यध्यक्ष सौ. सुप्रिया सुळे यांनी पुरस्कारार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व उपस्थितांशी संवाद साधला. महिला दिन ८ मार्चला साजरा केला जातो. पण संपूर्ण ३६५ दिवस माणुसकीचा दिवस साजरा करणे गरजेचे आहे. २२ जून १९९४ साली महिला धोरणाची अंमलबजावणी झाली, त्यामुळे महिला उंबरठा ओलांडून बाहेर आल्या. तंत्रज्ञान बदलत असते. पवार साहेबांनी महिला धोरण आणले त्या वेळी सायबर क्राईम हा मुद्दा नव्हता. पण आता महिलांविरोधात सायबर क्राईम वाढला आहे, त्यामुळे महिला धोरणात सायबर क्राईमचा समावेश करणे गरजेचे आहे, असे मत सेंटरच्या कार्याध्यक्ष सौ. सुप्रिया सुळे यांनी मांडले. हुंडाबंदी आणि महिला सुरक्षा यासाठी प्राधान्याने मोहीम राबवण्यात येईल, असे त्यांनी या वेळी नमूद केले.

चव्हाण सेंटरचे अध्यक्ष मा. शरद पवार यांनी आपल्या भाषणात महिला धोरणाची पूर्वपीठिका मांडली. महिलांसाठी देशातील पहिलं धोरण हे महाराष्ट्रात तयार केलं गेलं. अनेक भगिनींशी संवाद साधून या धोरणाची आखणी करण्यात आली. महिलांच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या विविध संघटनांमधील भगिनी, प्रशासकीय महिला अधिकारी, जाणकार महिला कायदे पंडित अशा सर्वांचा सहभाग या धोरणासाठी घेतला गेला. या सगळ्यांशी जाणीवपूर्वक संवाद साधून प्राथमिक आराखडा तयार करण्यात आला. त्याला मान्यता मिळविण्यासाठी तत्कालीन उपराष्ट्रपती श्री. के.आर. नारायणन यांना निमंत्रित केलं होतं. नेहरू सेंटरमध्ये या धोरणाचा आढावा घेण्यात आला. सुरुवातीला पुरुषी मानसिकतेमुळे या धोरणाला विरोध होत होता. त्यातलं एक एक कलम, तरतूद याच्यासाठी तासन्‌तास चर्चा करावी लागली. ज्यांचा विरोध आहे त्यांना समजावून सांगावं लागलं. काही कायद्यात दुरुस्ती करावी लागली. कालांतराने या धोरणाचं जनतेने स्वागत केलं आणि महाराष्ट्रात हे महिला धोरण अस्तित्वात आलं.

पुरस्कार सन्मान सोहळ्यास लेखक दिग्दर्शक प्राजक्त देशमुख, आसावरी जगदाळे, निर्मलाताई सामंत-प्रभावळकर, रोहिणी खडसे, यशवंतराव चव्हाण सेंटर, पुण्याचे सचिव अंकुश अण्णा काकडे, प्रशांत जगताप, चव्हाण सेंटरचे पदाधिकारी यांच्यासह महिला भगिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

- **महिला पत्रकार संमेलन**

भारतीय पत्रकारिता दिवसानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटरच्या महिला विभागातर्फे रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्रातील महिला पत्रकारांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. या वेळी आपल्या प्रास्ताविकात चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी प्रसारमाध्यमांमधील विशाखा समितीचे वास्तव तपासण्याची गरज व्यक्त केली. महिलांसाठी पत्रकारिता हे क्षेत्र आव्हानात्मक आहे, खूप कष्ट आहेत, अडचणी आहेत, परंतु सद्य:स्थितीत महिला पत्रकारांची संख्या वाढली असल्याचे आशादायक चित्र महिला पत्रकार संमेलनात दिवसभरात झालेल्या विविध चर्चासत्रांतून समोर आले. यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये पार पडलेल्या या संमेलनात महिला पत्रकारांच्या विविध प्रश्नांवरही प्रकाश टाकण्यात आला.

या संमेलनात ज्येष्ठ पत्रकार राही भिडे, कल्पना शर्मा, विनया देशपांडे, शुभांगी पालवे, प्राची कुलकर्णी, मृणालिनी नानिवडेकर, अरुंधती रानडे, जान्हवी पाटील, विदुला टोकेकर, मुक्ता चैतन्य, प्रीती सोमपुरा, स्वाती नाईक, मोहिनी जाधव, सुकेशनी नाईकवाडे, शिरीन दळवी, मानसी फडके, आरती कदम आणि लता व्यंकटेश या विविध चर्चासत्रांमध्ये वक्त्या म्हणून सहभागी झाल्या होत्या. राज्यभरातून अनेक महिला पत्रकार आणि पत्रकारितेच्या विद्यार्थिनी आल्या होत्या. दिवसभर चाललेल्या या संमेलनात महिला संपादक आणि पत्रकारांना काम करताना येणाऱ्या आव्हांनांसोबतच पत्रकारितेत एआयचा वापर आणि सुरक्षा यावर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते.

- **'लिंगाधारित हवामान उपाययोजनांमध्ये पंचायतींची भूमिका'' या विषयावर राष्ट्रीय परिसंवाद**

असर, रिसोर्स एण्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट आणि यशवंतराव चव्हाण सेंटर यांनी संयुक्तपणे 'लिंगाधारित हवामान उपाययोजनांमध्ये पंचायतींची भूमिका' यावर दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रीय परिसंवाद आयोजित केला होता. याच अनुषंगाने पुढील कृती कार्यक्रम ठरवण्याकरता दि. १० डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र हवामान कृती दलाचे संचालक मा. अभिजीत घोरपडे यांची भेट घेण्यात आली. या बैठकीत लिंग समानता आणि क्लायमेट जस्टीस यावर आधारित प्रशिक्षणाकरता चव्हाण सेंटर आणि आरएससीडीने ट्रेनिंग मॉड्यूल तयार करणे. यशदाच्या माध्यमातून खासकरून महिला सरपंचांकरता शॉर्ट टर्म कोर्सेस आयोजित करण्याचे ठरले. या संदर्भात राज्यातील विविध विभागांतील पंचायत महिला लोकप्रतिनिधींसोबत २१ जानेवारी २०२६ रोजी नियोजन बैठक झाली.

- **महिला धोरण दालन आणि पुस्तिका प्रकाशन**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते चव्हाण सेंटरच्या प्रांगणातील 'विरंगुळा' इथे दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी महिला धोरण दालनाचे अनावरण आणि पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. महाराष्ट्रातील महिलांना समान संधी आणि अस्तित्व मिळण्यात महिला धोरणाचा मोठा वाटा आहे. मा. शरदचंद्र पवार साहेबांच्या संकल्पनेतून १९९४ मध्ये पहिले महिला धोरण आकारास आले. पहिल्या महिला धोरणाचा प्रवास तसेच या धोरणाचा नेमका काय फरक पडला ? याची नोंद या दालनात आहे.

- **महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद सुवर्ण महोत्सव**

महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळीला ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण सेंटर इथे दिनांक २०, २१ आणि २२ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन संसदरत्न खासदार व चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद आणि यशवंतराव चव्हाण सेंटरने संयुक्तपणे या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले होते.

परिषदेच्या पहिल्या दिवशी घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा त्रास, कायदे आणि त्यांची अंमलबजावणी याविषयावरील परिसंवाद होते. दुसऱ्या दिवशी आर्थिक, राजकीय परिस्थिती, कामगार वर्ग, कंत्राटी व असंघटित क्षेत्रातील कामगार, पर्यावरण आणि विकास, जंगल, जमीन, पाणी आणि स्थानिक लोकांच्या हक्कांचे प्रश्न अशा विविध महिलाकेंद्री विषयांवर गटवार चर्चा आणि परिसंवाद या वेळी झाले. यात प्रत्यक्ष महिलांना सहभागी करून आले होते. परिषदेच्या तिसऱ्या दिवशी या परिसंवादातून आलेल्या मागण्यांचे ठराव आणि पुढील वाटचालीचा आराखडा मांडण्यात आला. या परिषदेच्या निमित्ताने चव्हाण सेंटरच्या आवारात विविध महिला संघटनांनी संविधान, स्त्रीमुक्ती, सामाजिक चळवळी यांच्याविषयी चित्र, पोस्टर आणि पुस्तकांचे प्रदर्शनही भरवले होते. या परिषदेत राज्यातील स्त्री-मुक्ती चळवळीतील सर्व प्रमुख संस्था / संघटना सहभागी झाल्या होत्या.

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या यशस्विनी सामाजिक अभियानाच्या १८ जिल्हा समन्विका या तीन दिवसीय परिषदेत सहभागी झाल्या. तसेच या परिषदेत महाराष्ट्रातील विविध महिला संघटनांच्या ८०० हून अधिक महिला प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या.

- **भीमथडी जत्रेत यशस्विनी बचतगटांच्या स्टॉल्सना पुणेकरांचा भरघोस प्रतिसाद**

पुण्यातील कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात दिनांक २० ते २५ डिसेंबर २०२५ दरम्यान भीमथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. या जत्रेत यशस्विनी सामाजिक अभियानांतर्गत ५ महिला बचतगट सहभागी झाले होते.

- **काळाघोडा आणि सुगी महोत्सवात यशस्विनी गटांना उत्तम प्रतिसाद**

मुंबईच्या स्थापत्यकलेचा प्राचीन वारसा मिरवणाऱ्या, विविध कलाविष्कारांना प्रोत्साहन देणारा आणि देशभरातील हस्तकलेच्या वस्तूंना बाजारपेठ देणारा ‘काळाघोडा फेस्टिवल २०२६’ दिनांक ३१ जानेवारी ते दिनांक ९ फेब्रुवारी दरम्यान अतिशय दिमाखदारपणे पार पडला. रॅम्पार्ट रोडवरील विविध स्टॉल्समध्ये चव्हाण सेंटरच्या यशस्विनी सामाजिक अभियानातील ५ महिला बचतगट सहभागी झाले होते. ग्रामीण जीवनातील सुगीच्या दिवसांचा आणि पदार्थांचा शहरातही अनुभव घेता यावा, याकरता मुंबई स्वयंपाकघर या फेसबुक ग्रुपद्वारे मुलुंडमधील महाराष्ट्र सेवा संघात दरवर्षी सुगी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदा दिनांक ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान पार पडलेल्या सुगी महोत्सवात यशस्विनी सामाजिक अभियानाचे २ गट सहभागी झाले होते. दोन्ही महोत्सवांमध्ये यशस्विनी सामाजिक अभियानाच्या सातही महिला गटांना उत्तम आर्थिक लाभ झाला.

- **चारही महिला धोरणांचा आढावा घेणारी राज्यव्यापी चर्चासत्रे**

१९९४ पासून ४ महिला धोरणे अमलात आली. आर्थिक सक्षमता, अधिकार, आरोग्य, शिक्षण, राजकीय अधिकार, सामाजिक सुरक्षितता, हक्क अशा अनेक बाबतीत महिलांकरता अनेक तरतुदी केल्या गेल्या. पण

वास्तवात महिलांना यांचा कितपत वापर करता येतो ? महिला म्हणून अनेकदा वेगवेगळ्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. त्यांच्या या आव्हानांवर चर्चा घडवून त्यावर शिफारशी सुचविण्यासाठी महिला विभागातर्फे यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्रांच्या मदतीने राज्यभर **'धोरण कुठवर आलं गं बाई'** ही चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. या चर्चासत्रांची सुरुवात दि. ५ मार्च २०२६ रोजी नवी मुंबईपासून झाली. त्यानंतर नांदेड इथे दि. १३ मार्च, परभणी इथे दि. १४ मार्च, जालना इथे दि. १५ मार्च, छ. संभाजीनगर इथं दि. १६ मार्च तर पुणे इथं दि. २८ एप्रिल रोजी ही चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. या चर्चासत्रांमध्ये धोरण आणि स्थानिक पातळीवर काम करणारे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्त्यांना वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले. महिलासंबंधी विषयांवर काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, विद्यार्थिनी यात सहभागी झाल्या.

**या चर्चासत्रांमध्ये उपस्थित करण्यात आलेले मुद्दे पुढीलप्रमाणे –**

- महिला लोकप्रतिनिधींचे एकूण प्रमाण वाढले पण बजेट तयार करण्यात त्यांना सहभागी होऊ न देणे
- महिला लोकप्रतिनिधींचे 'यूटर्न' घेण्याचे वाढते प्रमाण
- ग्रामपंचायतील महिला कल्याण १० टक्के निधीचा वापर केवळ महिला विकासासाठीच व्हावा.
- राजकीय पक्षांच्या बैठकांमध्ये महिला पदाधिकाऱ्यांना आपले मत मांडू न देणे
- कमकुवत घटकांना मजबूत करण्यासाठी धोरणे आखली जातात. पण ती वरच्या स्तरातून आखली जात असल्याने तळागाळात परिणामकारक ठरत नाहीत.
- खेड्यापाड्यांत महिला धोरण माहीतच नाही.
- आपल्याच परिसरातील काही भागात दिवसाही ये-जा करण्यास सुरक्षित न वाटणे
- अल्पसंख्याक महिलांच्या शिक्षण व नोकऱ्यांकडे दुर्लक्ष
- कौटुंबिक हिंसाचारात व हुंड्याकरता महिलांचे बळी अजूनही जातच आहेत.
- कष्टकरी महिलांपर्यंत अजूनही धोरण पोहचले नाही
- महिलांचे मालमत्ता-शेती अधिकार, महिलांना कुटुंबप्रमुख म्हणून कागदपत्रे तयार करण्याबाबत शासकीय कर्मचारी व अधिकारी करण्याबाबत उदासीन
- मुली, महिलांच्या वडिलोपार्जित संपत्तीतील समान हक्काचा विपर्यास करत याचा हुंड्याकरता वापर
- पहिल्या धोरणात उल्लेख असलेले महिलांकरता स्वच्छतागृह, बसमधील राखीव सीट या बाबी अजून कागदावरच.
- सर्व प्रकारच्या एकल महिलांचे ओळखपत्र, कागदपत्रे, रोजगार, सुरक्षा असे अनेक प्रश्न
- सरकारी शाळा बंद करण्यामुळे कष्टकरी वर्गातील मुलींचे शाळेत जायचे प्रमाण घटले.
- घटस्फोटाच्या केसेस २०-२५ वर्ष लांबणीवर आहेत.

**शिफारशी**

- राजकीय पक्षांनाही पॉश कायदा लागू करावा. तसेच खासगी क्षेत्रात विशेषत: पुण्यातील आयटी कंपन्यांमध्ये पॉश व विशाखा समितीची कडक अंमलबजावणी होत नाही.
- धोरण राबवायला राजकीय इच्छाशक्ती महत्त्वाची. त्यामुळे महिलांनी राजकारणात अधिक सक्रिय व्हावे.

- पुरुषांकडून सपोर्ट सिस्टम तयार होण्याकरता जोतिबा पुत्र अभियान राबवावे
- ८ मार्च हा राज्य महिला सुरक्षा व ऑडिट दिवस म्हणून घोषित करावा. सुरक्षित महिला व मुलींसाठी पंचायतीकरता वार्षिक अजेंडा त्यातून तयार व्हावा.
- सर्व शासकीय कर्मचारी, अधिकारी, न्यायाधीशांकरता लिंग समभाव प्रशिक्षणे ठरावीक अंतराने नियमितपणे आयोजित करणे.
- सरकारसोबतच सामाजिक संस्था व सामान्य माणसाने धोरण राबवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक बदल जोपर्यंत होत नाही तोवर धोरणांची अंमलबजावणी शंभर टक्के होणं शक्य नाही
- महिला मच्छीमार व शेतकरी यांना स्वतंत्र दर्जा देऊन धोरण आखावे
- महिलांना कायद्याचे शिक्षण द्यावे
- महिलांचे स्टेममधील प्रमाण वाढवण्याकरता अधिक जोरदार प्रयत्न करावे
- शहरे व खेड्यांच्या मार्गांवर स्वच्छतागृहांची उपलब्ध व्हायलाच हवीत
- बालविवाह रोखण्यासाठी सरपंचांनी पुढाकार घ्यावा
- चौथ्या धोरणातील मानसिक आरोग्याच्या मुद्द्याची ठोस अंमलबजावणी व्हावी.
- आर्थिक भेटीपेक्षा समान संधी आणि सक्षम कामे द्यावी.
- वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर अनाथ आश्रमातून बाहेर पडणाऱ्या मुलींना आधार, ओळखपत्रे व स्वावलंबी होण्यासाठी योजना
- परिवहन सेवा, शिक्षण व आरोग्य यांचे खासगीकरण थांबवून महिलांना रोजगार द्यावा.
- मालमत्ता केवळ नावावर नाही तर महिलेच्या नियंत्रणात हवी.

- **एम.जी.एम. कम्युनिटी रेडिओ केंद्रासह महिलांकरता कार्यक्रमाचे नियोजन**

छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशन विद्यापीठातर्फे लोकोपयोगी माहिती, चर्चासत्रे, योजना, अभियाने अशा अनेक बाबींचा प्रसार विद्यापिठाच्या कम्युनिटी रेडियोद्वारे करण्यात येतो. MGM Radio 90.8 FM या नावाने हा रेडिओ प्रसारित होतो. दिनांक १७ मार्च रोजी एमजीएम रेडिओच्या मार्केटिंगप्रमुख अश्विनी नितुरकर यांच्यासह यशवंतराव चव्हाण सेंटरच्या महिला विभागप्रमुख साधना तिप्पनाकजे यांची बैठक झाली. एमजीएम रेडियो महिला सक्षमीकरण, समाजात काही वेगळं व प्रेरणादायी काम करणाऱ्या महिलांना घेऊन रेडियोकरता कार्यक्रम करणार आहे. त्याकरता यशवंतराव चव्हाण सेंटर महिलांकरता राबवत असणारे विविध कार्यक्रम आणि सेंटरच्या विविध प्रकल्पात सहभागी यशस्वी महिलांना केंद्रस्थानी ठेवून काही कार्यक्रम करण्याबाबत या बैठकीत प्राथमिक नियोजन करण्यात आले.

## ९.२ आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक विभाग

यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या विभागाचे संयोजक म्हणून श्री. विजय कान्हेकर, समन्वयक श्री. अभिजित राऊत, विभाग प्रमुख दीपिका शेरखाने, साहाय्यक मनिषा खिल्लारे काम पाहतात.

- **'नमो दिव्यांग शक्ती योजना' चर्चासत्र**

दिव्यांगांसाठी उपलब्ध असलेल्या योजना आणि इतर सुविधा गरजूंपर्यंत पोहोचाव्या यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटर प्रयत्न करीत असते. दि. २२ एप्रिल २०२५ रोजी शासन राबवत असलेले 'नमो दिव्यांग शक्ती अभियान'बाबत चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये योजनेचा उद्देश, त्याचा दिव्यांगांना कसा लाभ मिळणार आहे, योजनेची अंमलबजावणी कशी होते, अनुदान प्रक्रिया कशी आहे, या संदर्भात माहिती देण्यात आली. चर्चासत्राकरिता जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अधिकारी, प्रतिनिधी व इतर साहाय्यक उपस्थित होते. सावित्रीबाई फुले महिला मंडळ, छत्रपती संभाजी नगर; मनुदेवी फाउंडेशन, नंदुरबार; डी.डी.आर.सी. पुणे, आस्था सोशल फाउंडेशन, रत्नागिरी; जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, अकोला-वाशीम; उमंग सिद्धिविनायक प्रतिष्ठान, लातूर; उडान दिव्यांग प्रतिष्ठान, जळगाव येथील उपस्थितांचा सहभाग होता. तसेच ऑनलाईन माध्यमातून ३८ लोकांनी हजेरी लावली.

- **डिजिटल श्रवणयंत्रपूर्व तपासणी आणि वाटप, पुणे**

दि. २५ मे २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, ठाकरसी ग्रुप, सिकोर एड्स प्रायव्हेट लिमिटेड आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने निसर्ग कार्यालय, गुलटेकडी, पुणे येथे **मोफत डिजिटल श्रवणयंत्र तपासणी व वाटप शिबिराचे** आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून कर्णबधिर व ज्येष्ठ नागरिकांची मोफत श्रवण तपासणी करून १०० लाभार्थ्यांना डिजिटल श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले.

- **जिल्हा समन्वयक कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर, आरोग्य दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक विभागाच्या वतीने दि. ७ आणि ८ जून २०२५ रोजी निवासी जिल्हास्तरीय समन्वयक बैठक व कार्यशाळा पार पडली.

कार्यशाळेचे उद्घाटन माजी मंत्री, आमदार सचिन आहिर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी विजय कान्हेकर, नंदकुमार फुले, डॉ. सनद पवार, संदेश लाळगे, डॉ.सुनील जगताप यांच्यासह राज्यातील १७ जिल्ह्यांमधून ५० समन्वयक उपस्थित होते. दोन दिवसाच्या या निवासी कार्यशाळेत मुस्कान शर्मा (NCPEDP) यांनी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ व श्री. प्रमोद ढोकळे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या कायद्याची माहिती दिली. तसेच डॉ.सनद पवार यांनी मानसिक आरोग्य, नंदकुमार फुले यांनी दिव्यांगांच्या योजना, डॉ. कविता मुरुगकर यांनी सुगम्यता, डॉ. अभय शुक्ला यांनी आरोग्य समन्वयकाची भूमिका या विषयांवर सविस्तर मांडणी केली.

- **"ज्येष्ठ नागरिक अत्याचार प्रतिबंध" दिन**

दि. २४ जून २०२५, जागतिक ज्येष्ठ नागरिक अत्याचार प्रतिबंध (World Elder Abuse Awareness Day) दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर, साठे महाविद्यालय आणि शार्प ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचार रोखणे, त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे हा ह्या व्याख्यानाचा मुख्य उद्देश. मा. डॉ. प्रकाश बोरगांवकर यांनी ज्येष्ठ

नागरिकांना मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नागरिकांवरील अन्याय, अत्याचार, शारीरिक, मानसिक छळ आणि गैरवर्तनाबद्दल जागरूकता निर्माण करणे, प्रतिबंध करणे तसेच दोन पिढ्यातील स्नेहबंध कसे वृद्धिंगत होतील, याबाबत व्याख्यानातून उपस्थितांना मार्दर्शन करण्यात आले. व्याख्यानास महाविद्यालयाचे ओजेटी प्रमुख श्रीम. सुक्रता पेठे, शार्प ओजेटी प्रमुख श्रीम. कविता मोकाशी, श्री. विकास कुमार, श्रीमती यादवी नेवरेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

- **कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधने वितरण कार्यक्रम, पुणे**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या पुढाकारातून ठाकरसी ग्रुप, मुंबई व महात्मा गांधी सेवा संघ यांच्या सहकार्याने ३ ते ६ जुलै २०२५ दरम्यान दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधने वितरणाचा कार्यक्रम पुणे येथे पार पडला. या वेळी दिव्यांगाना विविध साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले. या वेळी जिल्हा दिव्यांग सक्षम अधिकारी, रोहिणी मोरे, ठाकरसी ग्रुपच्या श्रीमती जलज कालरा यांच्यासह यशवंतराव चव्हाण सेंटर, ठाकरसी ग्रुप आणि महात्मा गांधी सेवा संघाचे पदाधिकारी तसेच श्री. सोपान काका चव्हाण, श्रीमती अनिता इंगळे, श्री. आनंद मते, श्री. सचिन भोसले, श्री. रवींद्र पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

- **कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधने वितरण कार्यक्रम, बारामती**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून, ठाकरसी ग्रुप, मुंबई व महात्मा गांधी सेवा संघ यांच्या सहकार्याने आणि विद्या प्रतिष्ठानचे खजिनदार युगेंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत १७ जुलै २०२५ रोजी बारामती येथे कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधने वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी दिव्यांगांना विविध साहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास श्री. एस.एन.बापू जगताप, श्री. राजेंद्र बापू जगताप, श्रीमती वनिता बनकर, श्री. अमित तावरे, श्रीमती आरती गव्हाळे, श्रीमती प्रियंका शेंडकर, यशवंतराव चव्हाण सेंटर, ठाकरसी ग्रुप आणि महात्मा गांधी सेवा संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

- **जागतिक डिम्नेशिया दिनानिमित्त ज्येष्ठांच्या हक्कांविषयी व्याख्यानाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समिती यांच्या वतीने जागतिक डिम्नेशिया दिनानिमित्त दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी ज्येष्ठांच्या हक्कांविषयी कार्यरत असलेल्या सिल्व्हर इनिंग या सेवाभावी संस्थेचे प्रमुख श्री. शैलेश मिश्रा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डिम्नेशियाचे प्रकार, लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधक उपाय याची त्यांनी दृक्‌श्राव्य माध्यमातून उपस्थितांना माहिती दिली. डिम्नेशियाग्रस्त व्यक्तीशी घरच्यांचे वर्तन संयमपूर्ण असावे. त्यांच्याशी कसे संभाषण करावे याची काही उदाहरणे त्यांनी दिली. डिम्नेशिया पासून बचाव करण्यासाठी आहारात अंडी, मासे असे प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश असावा असे त्यांनी सांगितले. रोग बरा होऊ शकत नाही परंतु सुरुवातीच्या काळात काही औषधे वापरल्यास डिम्नेशियाचा वेग मंदावू शकतो. शारीरिक व्यायाम आणि बौद्धिक व्यायाम यामुळे डिम्नेशियाला काही प्रमाणात अटकाव करता येतो, असे त्यांनी सांगितले.

या वेळी ॲड. प्रमोद ढोकले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. श्री. प्रकाश दिघे यांनी प्रास्ताविक केले. श्री. रविंद्र दळवी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. श्रीमती शुभांगी बावडेकर यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली.

- **कर्णबधिरता दिनानिमित्त श्रवणयंत्र वाटप कार्यक्रम, छत्रपती संभाजी नगर**

सामाजिक न्याय अधिकारीता मंत्रालय भारत सरकार, यशवंतराव चव्हाण सेंटर, आरोग्य दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक विभाग; महात्मा गांधी सेवा संघ, जिल्हा समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजी नगर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी कर्णबधिरता दिनानिमित्त पंधरा श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पद्मजा सराफ, ऑडिओलॉजिस्ट विश्वजित सोनटक्के, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या समन्वयक श्रीमती अलका झिंजुर्डे उपस्थित होते.

- **महिलांसाठी मानसिक आरोग्य व्याख्यान, धारावी**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि जय भवानी क्रीडा मंडळ, धारावी यांच्या वतीने दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी महिलांसाठी **'मानसिक आरोग्य-शोध आनंदी जीवनाचा'** या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. मानसशास्त्रज्ञ डॉ. स्वाती राणे व त्यांचे सहकारी श्री. संदेश लालगे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

- **ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त माहिती सत्र**

धारावीतील जय भवानी क्रीडा मंडळातर्फे नवरात्र उत्सव सभा मंडळ येथे १ ऑक्टोबर २०२५ रोजी ज्येष्ठ नागरिक **दिनानिमित्त 'ज्येष्ठांचे आरोग्य, मानसिक स्वास्थ्य तसेच त्यांच्या समस्या'** या विषयावर संवाद आणि माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले. या वेळी मानसशास्त्रज्ञ डॉ. निशिगंधा मगर यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करताना आहार-विहारासह सकारात्मक विचारसरणीतून आयुष्य कसे जगावे, याविषयी मौल्यवान मार्गदर्शन केले. या वेळी फेस्कॉम संलग्न हॅपिनेस ज्येष्ठ नागरिक संघ, धारावीचे प्रमुख श्री. दिलीप गाडेकर तसेच श्री. गिरीराज शेरखाने, श्रीमती सुमन शेरखाने, श्री. गौतम व्हटकर, श्री. मंजुनाथ शेरखाने आणि लतेश शेरखाने या कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

- **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा – २०२५**

दरवर्षीप्रमाणे दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी **'ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्या'**चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपस्थित असलेले वस्तू व सेवा कर विभागाचे विशेष आयुक्त नितीन पाटील यांनी चव्हाण सेंटरच्या या उपक्रमाचे कौतुक करून ज्येष्ठांनी सकारात्मक बदल घडविण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. तसेच चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सौ. सुप्रिया सुळे यांनी ज्येष्ठ नागरिक चव्हाण सेंटरच्या कार्यात हिरिरीने सहभाग घेतात याबद्दल त्यांचे कौतुक केले.

या मेळाव्यात राज्यातील काही ज्येष्ठ नागरिकांना 'यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक राज्यस्तरीय कृतज्ञता सन्मान' देऊन गौरविण्यात आले. सेवानिवृत्त झाल्यानंतरही आपल्या अनुभवाच्या जोरावर समाजाभिमुख कार्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा यथोचित सन्मान व्हावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या सोहळ्यात कोल्हापूर येथील सुशीला ओडेयर, सांगली येथील चेलनादेवी खुरपे, पुणे येथील अरुण रोडे, छत्रपती संभाजी नगर येथील रमेश दुसे, चंद्रपूर येथील श्रीराम पान्हेरकर, मुंबई येथील सलमा खान यांना **'यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक राज्यस्तरीय कृतज्ञता सन्मान'** प्रदान करण्यात आला. तसेच, **यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संघ/संस्था राज्यस्तरीय कृतज्ञता सन्मान** लातूर येथील ज्येष्ठ नागरिक संघास प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. प्रमोद ढोकळे यांनी केले.

- **मानसिक आरोग्य परिषद**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या आरोग्य, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक विभाग आणि रोटरॅक्ट डिस्ट्रिक्ट ३१४१ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ ऑक्टोबर २०२५ रोजी '**मानसिक आरोग्य परिषदे**'चे आयोजन करण्यात आले होते. युवकांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, सकारात्मक संवाद वाढवणे आणि मानसिक स्वास्थ्यासाठी सक्रिय सहभाग नोंदविणे हा या परिषदेमागील मुख्य उद्देश होता. परिषदेला ४५० पेक्षा अधिक रोटरॅक्टर्सची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. त्यामुळे ही परिषद वर्षातील सर्वात प्रभावी आणि मोठ्या प्रमाणावर आयोजित मानसिक आरोग्यविषयक युवा परिषद ठरली.

"Mental Health: Beyond the Box - Breaking the Loop: From Vicious to Virtuous Cycle" तसेच "Inner Balance: Emotion Regulation and Well-being" या संकल्पनांवर आधारित सत्रांमध्ये संवाद, सहानुभूती आणि सामूहिक मानसिक आरोग्य सहाय्य यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. समाज अधिक संवेदनशील, मजबूत आणि सहकार्यशील बनविण्यासाठी मानसिक आरोग्याविषयी जागरूकता आवश्यक असल्याचे या वेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमात इंध्या फाउंडेशनच्या संस्थापक सौ. गौरी देशमुख, प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ. सिद्धार्थ वॉरियर तसेच मानसिक स्वास्थ्य विषयाचे यूट्यूब व्याख्याते डॉ. आरती सूर्यवंशी या वक्त्यांनी मानसिक आरोग्यावरील संभ्रम दूर करणे, भावनिक संतुलन राखणे, मानसिक सक्षमीकरण, लवचीकता आणि समुदायाशी सकारात्मक नाते निर्माण करणे या विषयांवर मौलिक मार्गदर्शन केले.

- **दिव्यांग जनजागृती अभियान**

दिव्यांग सक्षमीकरणाशी संबंधित कायदे तसेच दिव्यांगांसाठीच्या स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य शासन आणि केंद्र सरकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये दिव्यांग जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. त्याची सुरुवात मावळ तालुक्यापासून झाली. रविवार, दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी मावळ तालुक्यातील साईबाबा सेवाधाम, कान्हे येथे यशवंतराव चव्हाण सेंटरच्या सहकार्याने महात्मा गांधी सेवा संघ संचलित पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, मावळ पंचायत समिती, कान्हे ग्रामपंचायत, इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राइड आणि इनरव्हील क्लब ऑफ मावळ शक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, राज्य तसेच केंद्र सरकारच्या दिव्यांगांसाठी राबवण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची माहिती दिव्यांगांना देण्यात आली. त्याचबरोबर दिव्यांगत्व प्रमाणपत्र, यूडीआयडी कार्ड काढण्याची प्रक्रिया, बौद्धिक दिव्यांगांसाठी असलेली निरामय आरोग्य विमा योजना, कायदेशीर पालकत्व घेण्याची विहित कार्यपद्धती आणि दिव्यांगत्वाचे एकवीस प्रकार यांसारख्या महत्त्वाच्या बाबींची माहितीही देण्यात आली. या वेळी दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे निवृत्त महाव्यवस्थापक नंदकुमार फुले, जिल्हास्तरीय राष्ट्रीय न्यास समितीच्या सदस्या भाग्यश्री मोरे, पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे जिल्हा समन्वयक यशवंत सोळंके, समुपदेशक हरिदास शिंदे, मावळ तालुक्याचे सहायक गटविकास अधिकारी सेवक थोरात, इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राइडच्या अध्यक्षा डॉ. कमलजीत कौर दुल्लत, ज्योती राजीवडे, जिल्हा समाजकल्याण विभागाच्या सामाजिक कार्यकर्त्या पूर्वा जोशी, साईबाबा सेवाधामचे व्यवस्थापक दत्तात्रय चांदगुडे, दिव्यांग मार्गदर्शक तानाजी मराठे, सामाजिक कार्यकर्ते भरत नाना राजीवडे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

- **'डिम्नेशिया आणि अल्जायमर' विषयक जनजागृतिपर व्याख्यानाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने जागतिक स्मृतिभ्रंश दिनान्निमित्त 'डिम्नेशिया आणि अल्जायमर' विषयक जनजागृतिपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी इंटीग्रिटी थेरेपिस्ट आणि डीमेंशिया स्पेशालिस्ट डॉ. विद्या शेणॉय वक्त्या म्हणून लाभल्या होत्या. व्याख्यानास सुमारे १ ३ ० लोक उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. सुरेश गुप्ते यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

- **दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम अन्वये संवेदनशीलता कार्यशाळा**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ (RPWD Act 2016) कलम ३९ अंतर्गत दिव्यांग व्यक्तींबाबत संवेदनशीलता व जागरूकता निर्माण करण्यासाठी दि.५ डिसेंबर २ ० २ ५ रोजी बी. जे. हायस्कूल, ठाणे येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शासकीय अधिकारी व विभाग प्रमुखांना दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांविषयी संवेदनशील करणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्यासाठी असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि सर्वसमावेशक समाजनिर्मिती करण्यासाठी प्रशासनाची भूमिका अधिक दृढ करणे हा या कार्यशाळेचा उद्देश होता.

अप्पर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. डॉ. उज्वला सपकाळे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांनी प्रास्ताविक करताना दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांविषयी जागरूकता वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. राष्ट्रीय न्यास (National Trust Act) कायदा या विषयावर दीपिका शेरखाने दिव्यांग विभागप्रमुख - यशवंतराव चव्हाण सेंटर यांनी मार्गदर्शन केले. विनित भागोजी, प्रकल्प व्यवस्थापक व त्यांच्या सहकारी खुशी गणोत्रा, नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसॅबल पिपल यांनी RPWD Act 2016 व कलम ३ ९ बाबत सविस्तर माहिती दिली.

या वेळी तहसीलदार संदीप थोरात, विभाग प्रमुख कृषी विभाग मुनिर बाचोटिकर, साहाय्यक सल्लागार दिव्यांग सक्षमीकरण संगिता शिर्के, सल्लागार ज्येष्ठ नागरिक विभाग यशवंतराव चव्हाण सेंटर ॲड. प्रमोद ढोकळे, समग्र शिक्षा सर्वसमावेशक शिक्षण अनिल कुऱ्हाडे उपस्थित होते. ठाणे जिल्ह्यातील सर्व शासकीय

आस्थापनांचे प्रमुख, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि दिव्यांग क्षेत्रात कार्यरत संस्था कार्यशाळेत उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या.

- **दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम-२०१६ जनजागृती व्याख्यान**

विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन, यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता ठाणे आणि नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसेबल पीपल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० डिसेंबर २०२५ रोजी ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयातील जिल्हा सरकारी वकिलांकरिता दिव्यांग कायदा २०१६ याबाबत जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ. मुस्कान शर्मा यांनी दिव्यांग हक्क अधिनियम या कायद्यावर मार्गदर्शन केले. ॲड. संजय लोंढे, जिल्हा सरकारी वकील व जिल्हा सरकारी अभियोक्ता ठाणे यांच्यासह ठाणे जिल्हयातील सर्व सरकारी वकील शिबिरास उपस्थित होते.

- **ज्येष्ठ नागरिक जनजागृती कार्यक्रम**

दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर आणि मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने उल्हासनगर येथील सौ. चांदीबाई हिमत्मल मानसुखानी महाविद्यालयात ज्येष्ठ नागरिक जनजागृतिपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चेंबूर येथे अशाच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये ॲड. प्रमोद ढोकळे यांनी ज्येष्ठ नागरिकांची काळजी, त्यांच्या समस्या आणि समाजातील युवकांची जबाबदारी या विषयांवर मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी युवकांनी संवेदनशीलता, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

- **'कलेच्या माध्यमातून मानसिक स्वास्थ्य' या विषयावर कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि कांदिवली एज्युकेशन सोसायटीचे श्रॉफ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी **'कलेच्या माध्यमातून मानसिक स्वास्थ्य'** या विषयावर श्रीमती सलोनी न्यायनीत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कला ही आत्मपरीक्षण, भावनिक अभिव्यक्ती आणि वैयक्तिक विकासासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्याशालेद्वारे विद्यार्थ्यांनी कला आणि सर्जनशील अभिव्यक्तीच्या माध्यमातून स्वत:च्या भावना, विचार आणि अंतर्मनातील अनुभव समजून घेण्याचा प्रयत्न केला.

- **मोफत डिजिटल श्रवणयंत्र पूर्वतपासणी व वितरण शिबिर, सांगली आणि कोल्हापूर**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि केपीटी इंडस्ट्रीज लिमिटेड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, इनर व्हील क्लब, सिकोर एड्स प्रा.लि., सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने २५ डिसेंबर २०२५ रोजी सांगली येथे कर्णबधीर मुलांसाठी **श्रवणयंत्र पूर्वतपासणी व वितरण शिबिराचे** आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण ६४ लाभार्थ्यांना १२८ श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले.

तसेच दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी **कोल्हापूर** येथे आयोजित केलेल्या शिबिरात ५० लाभार्थ्यांना १०० श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. या दोन्ही शिबिरांना यशवंतराव चव्हाण सेंटरच्या विश्वस्त आणि केपीटी

इंडस्ट्रीजच्या व्हाईस चेअरपर्सन मा. प्रभा कुलकर्णी, उत्कर्षा पाटील, डायरेक्टर, इनर व्हील क्लब; पल्लवी मराठे, अध्यक्षा, इनर व्हील क्लब सांगली; शिल्पा सावंत, अध्यक्ष, इनर व्हील क्लब, कोल्हापूर; कुलदीप माने, मार्गदर्शक, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, सांगली; भाग्यश्री मोरे; सागर कान्हेकर, समन्वयक, यशवंतराव चव्हाण सेंटर; सिकोर अँड कंपनीचे प्रशांत दलाल; आदित्य आनिकर, प्रदीप मोहिते, व्यवस्थापक, मा. यशवंतराव चव्हाण जन्मघर, देवराष्ट्रे; आणि इतर मान्यवर शिबिरास उपस्थित होते.

- **'ज्येष्ठ नागरिकांचे हक्क, धोरणे व कायदे' या विषयावर जनजागृतिपर कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई आणि सावली ज्येष्ठ नागरिक सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० जानेवारी २०२६ रोजी वेणूताई सभागृह, कराड येथे **"ज्येष्ठ नागरिकांचे हक्क, धोरणे व कायदे"** या विषयावर जनजागृतीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सनद पवार यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आरोग्याविषयी विशेष मार्गदर्शन केले. ॲड. प्रमोद ढोकळे यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहितीही त्यांनी दिली.

- **'सामान्य तणाव व्यवस्थापन आणि त्यावरील उपाययोजना' मार्गदर्शनपर व्याख्यान**

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई, रोटरॅक्ट क्लब ऑफ विल्सन कॉलेज आणि अँड्र्यू व्हिजन सेंटर, विल्सन कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ जानेवारी २०२६ रोजी कु. व्हियाना पिल्लई यांच्या मार्गदर्शनाखाली **'सामान्य तणाव व्यवस्थापन आणि त्यावरील उपाययोजना'** यासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना माइंडफुलनेस, स्व-देखभाल (Self-care), भावनांचे संतुलन राखण्याच्या पद्धती तसेच सकारात्मक तणावनियंत्रण कौशल्यांविषयी त्यांनी माहिती दिली.

- **'कमी आत्मविश्वास' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान, पालघर**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी पालघर येथील सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळ महाविद्यालयात मानसिक आरोग्य व्याख्यानमाले अंतर्गत **'कमी आत्मविश्वास'** या विषयावर कु. सलोनी न्यायनीत यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

- **कृत्रिम पाय बसवण्यासाठी मोजमाप शिबिर**

यशवंतराव चव्हाण सेंटर, इंडो-फ्रेंच चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री- (IFCCI), फुप्रो, आणि महात्मा गांधी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि २१ फेब्रुवारी २०२६ रोजी चव्हाण सेंटर, मुंबई येथे कृत्रिम पाय बसवण्यासाठी मोजमाप शिबिर घेण्यात आले. WALK INDIA ही Legrand द्वारे राबविण्यात येणारी एक सामाजिक संस्था दिव्यांग बांधवांना सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी उपक्रम राबवीत आहे. शिबिरामध्ये गुडघ्याखालील २९ लाभार्थ्यांची निवड कारण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. राहुल डुमारू, प्रोस्थेटिस्ट आणि ऑर्थोडोन्टिस्ट, डॉ. नम्रता शिंदे, प्रोस्थेटिस्ट आणि ऑर्थोडोन्टिस्ट, प्रबलीन सिंग, सहाय्यक यांचे सहाय्य मिळाले. शिबिरास चव्हाण सेंटरच्या कोषाध्यक्ष, मा. अदिती नलावडे उपस्थित होत्या.

- **'आत्मविश्वास वाढविणे आणि तणावावर मात' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान, कांदिवली**

दि. २ मार्च २०२६ रोजी बालभारती महाविद्यालय, कांदिवली येथे **'आत्मविश्वास वाढविणे आणि तणावावर मात'** या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील तणाव प्रभावीपणे हाताळण्यासाठी तसेच आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी उपयुक्त आणि व्यवहार्य उपाययोजनांवर कु. व्हियाना पिल्लई यांनी मार्गदर्शन केले.

- **'जागृती आणि कृती कार्यशाळा' या विषयावर कार्यशाळा, ठाणे**

दि. ४ मार्च २०२६ रोजी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत यशवंतराव चव्हाण सेंटर आणि इक्वल एज यांच्या संयुक्त विद्यमाने कमलिनी कर्णबधिर विद्यालय, ठाणे येथे विद्यार्थी व पालकांसाठी **'जागृती आणि कृती कार्यशाळे'**चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिव्यांगांचे अधिकार, सर्व क्षेत्रात समान संधी आणि त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आवश्यक कृतिशील बदलांवर चर्चा करण्यात आली.

- **श्रवणयंत्र पूर्वतपासणी आणि वितरण शिबिर, बारामती**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने आणि ठाकरसी ग्रुप व सिकोर एड्स प्रा.लि. यांच्या सहकार्याने बारामती येथे दि. ११ मार्च २०२६ रोजी **मोफत डिजिटल श्रवणयंत्र पूर्व तपासणी व वितरण शिबिर** पार पडले. या शिबिरात १५६ श्रावणयंत्रांचे वाटप करण्यात आले. या वेळी श्री. सतीशमामा खोमणे, ॲड. राजेंद्रबापू जगताप, श्रीमती वनिताताई बनकर, श्रीमती आरतीताई शेंडगे-गव्हाळे, श्री. गणपत आबा देवकाते, ॲड.बळवंत बेलदार पाटील, श्रीमती प्रियांका शेंडकर आदि मान्यवर उपस्थित होते.

- **श्रवणयंत्र पूर्वतपासणी आणि वितरण शिबिर, पुणे**

१३ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, ठाकरसी ग्रुप व सिकोर एड्स प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे श्रवणयंत्र पूर्वतपासणी व वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी १५० लाभार्थ्यांना ३०० श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी श्री. विजयराव कोलते, श्री. सोपान (काका) चव्हाण, अनिताताई इंगळे, भारतीताई शेवाळे, स्वातीताई पोकळे, त्रिंबक अण्णा मोकाशी, किशोर कांबळे, प्रमोदसिंह गोतारने, रामभाऊ टुले, अजित शितोळे, प्रदीप मरळ, आनंद मते, श्रद्धा जाधव, दुर्गा चोरघे, संदीप नांगरे इत्यादी सन्माननीय उपस्थित होते.

- **आरपीडब्ल्यूडी' (RPWD) कायद्यावर मार्गदर्शनपर कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर, इक्वल एज फाउंडेशन आणि इंटरॲक्ट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने **'आरपीडब्ल्यूडी' (RPWD) कायद्यावर** आधारित विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दिव्यांग व्यक्तींचे हक्क, त्यांना मिळणाऱ्या सवलती आणि समाजात त्यांना मानाचे स्थान मिळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेला ६५ हून अधिक पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी 'इक्वल एज फाउंडेशन'च्या संस्थापिका व सीईओ मा. श्रीमती खुशी गणत्रा आणि संचालिका मा. श्रीमती प्रणाली वानकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

- **कृत्रिम पाय बसविण्यासाठी शिबिर**

१६ मार्च २०२६ रोजी इंडो-फ्रेंच चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (घ्इण्ण्घ), फुप्रो (इल्जेद), महात्मा गांधी सेवा संघ, आणि यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने चव्हाण सेंटर मुंबई येथे कृत्रिम पाय बसविण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ३३ लाभार्थ्यांना अत्याधुनिक कृत्रिम अवयव बसविण्यात आले.

- **'डिमेंशिया आणि अल्झायमर – संभ्रम व काळजी' विषयावर व्याख्यान, कोल्हापूर**

दि. २९ मार्च २०२६ रोजी 'मातोश्री विरंगुळा केंद्र', कोल्हापूर येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी **'डिमेंशिया आणि अल्झायमर-संभ्रम व काळजी'** या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. सनद पवार यांनी डिमेंशिया आणि अल्झायमर या आजारांची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमासाठी फेस्कोम (कोल्हापूर प्रभाग) चे माजी उपाध्यक्ष अंजुमन खान हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटर, कोल्हापूरचे आरोग्य समन्वयक व माजी ज्येष्ठ नागरिक पुरस्कारार्थी श्रीमती सुशीला ऑडियार, श्री. सोमनाथ गवस तसेच राजश्री शाहू ज्येष्ठ नागरिक संघ आणि सावित्रीबाई फुले महिला संघ, कोल्हापूर यांच्या सदस्यांसह सुमारे ५० मान्यवर उपस्थित होते.

- **मानसिक आरोग्य व्याख्यान -'आत्महत्या प्रतिबंध आणि आशा' - कोल्हापूर**

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई आणि सायबर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने **'आत्महत्या प्रतिबंध आणि आशा'** या विषयावर दि ३० मार्च २०२६ रोजी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या उद्घाटक, जिल्हा विधिसेवा प्राधिकरणाच्या सचिव न्यायाधीश दिपाली डोईफोडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

मिरज येथील प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सनद पवार, हैदराबाद येथील सामाजिक कार्यकर्त्या फराह सिद्धीकी तसेच गोवा येथील 'अन्याय रहित जिंदगी' संस्थेचे डॉ. रुपेश पाटकर यांनी कार्यशाळेमध्ये मोलाचा सहभाग दिला. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. दीपक भोसले यांनी महाराष्ट्र राज्यातील उपलब्ध 'आत्महत्या प्रतिबंधात्मक हेल्पलाईन' क्रमांकाच्या माहितिपत्रकाचे प्रकाशन केले. यावेळी राज्यभरातून १०० हून अधिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## ९.३ कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम, मुंबई

समाजातील गोरगरिब, दीनदुबळ्या व असाहाय्य लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रतेमुळे किंवा मागासलेपणा अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी योग्य ते उपाय योजावेत अशा प्रकारचे सामाजिक मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरून भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो. ही योजना राबवण्याचे काम यशवंतराव चव्हाण सेंटरमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भुत असलेली मोफत कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम विभागाची निर्मिती केली

आहे. या फोरम मध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ही योजना राबविनेसाठी ते आपल्याला मोफत सेवा देत आहेत. 'कायदेविषयक साहाय्य व मोफत सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती करण्यात आली.

फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते:

१. समाजातील गोरगरीब व तळागाळांतील लोकाना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत कायदेविषयक तोंडी सल्ला देणे.
२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नासंबंधी सखोल अभ्यास करून गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.
३. सामान्य लोकांना कायद्याची माहिती करून देण्यासाठी विधी साक्षरता (Legal Awareness) कार्यशाळांचे नियमित आयोजन करणे.
४. फोरमच्या बैठका: कायदेविषयक साहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी बैठका घेतल्या जातात. या बैठकांना फोरमचे जास्तीतजास्त सदस्य उपस्थित राहतात.

● उपक्रम -आपला कायदा जाणून घ्या:- यशवंतराव चव्हाण सेंटर च्या वतीने लीगल फोरमच्या माध्यमातून कायदेविषयक जागृतीचे विविध कार्यक्रम आम्ही सातत्याने आयोजित करीत असतो, त्यापैकी 'आपला कायदा जाणून घ्या','Know Your Law' हा एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम असून त्या अंतर्गत वेगवेगळ्या कायद्यांवर व्याख्यान आयोजित करण्यात येते.

कायद्याची जनजागृती या उपक्रमांतर्गत:- सामान्य नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आदींना विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करून देण्यात येते. या कार्यशाळेत आपल्या फोरमचे उत्तम जाणकार वकील कोणतेही मानधन न घेता या उपक्रमात मोफत बहुमोल मार्गदर्शन करतात.

## ९.४ शिक्षण विभाग

शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची आणि समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. प्रगतिशील समाज घडविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून यशवंतराव चव्हाण सेंटरचा शिक्षण विभाग कार्यरत आहे. सन २००८ मध्ये शिक्षण तज्ज्ञ डॉ. कुमुद बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाची स्थापना झाली. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर शिक्षण विभागाची वाटचाल सरू आहे. हा विभाग शैक्षणिक प्रश्न, शैक्षणिक उपक्रम, शैक्षणिक धोरण इत्यादी बाबींच्या अनुषंगाने उत्प्रेरक म्हणून काम करतो. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रियाताई सुळे विभागाच्या निमंत्रक असून शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे हे मुख्य संयोजक, बसंती रॉय या विशेष सल्लागार तसेच धनवंती हर्डीकर, भाऊ गावंडे, शिवाजी तांबे हे मुख्य सल्लागार आणि डॉ. माधव सूर्यवंशी हे मुख्य समन्वयक म्हणून जबाबदारी पाहतात. ऐनुल आत्तार, अजित तिजोरे, तुषार म्हात्रे, मच्छिंद्र बोऱ्हाडे हे या विभागाचे कोअर टीम सदस्य आहेत. कोअर टीमचे सदस्य आणि शिक्षण विभागांशी जोडले गेलेले राज्यभरातील आणि भारताबाहेरीलही सुमारे २० हजार सदस्य स्वयंसेवी वृत्तीने काम करतात.

शिक्षण विभागाच्या माध्यमातून प्रामुख्याने SPIF इन एज्युकेशन फेलोशिप, शिक्षण कट्टा, ग्रंथ निर्मिती आणि ग्रंथ पुरस्कार, शिक्षण साहित्य संमेलन, व्याख्याने, गुणवंत शिक्षक पुरस्कार, राज्यस्तरीय परिषद, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा, ब्लॉग, मोनोग्राफ, शिक्षकांसाठी प्रशिक्षणे आणि कार्यशाळा इत्यादी उपक्रम राबवले जातात.

सेंटरचे शिक्षण विभाग प्रमुख व रिसर्च सेंटरचे प्रमुख म्हणून प्रा. योगेश कुदळे काम पाहतात तर श्रीमती संजना पवार या सहकारी आहेत.

## ४.१ शिक्षण कट्टा :

गेल्या दहा वर्षांपासून शिक्षण कट्ट्यावर शैक्षणिक गप्पांची मैफल रंगत आहे. शिक्षण क्षेत्राशी संबंधित मंडळी एकत्र येऊन शिक्षणाशी निगडित विविध विषयांवर चर्चा करतात. यामध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशासक, अधिकारी, पत्रकार, पालक यांचा समावेश असतो. शिक्षण कट्टा शिक्षकांना सक्षम बनविण्यात आणि त्यांचे कार्य अधिक क्षमतेने आणि प्रभावीपणे करण्यास मदत करीत असतो.

**सन २०२५-२६ मधील शिक्षण कट्टे :**

| दिनांक | विषय | स्थळ | मार्गदर्शक | सहयोगी संस्था |
|---|---|---|---|---|
| ५/०४/२०२५ | महाराष्ट्राचा सीबीएसई पॅटर्न | ऑनलाईन | प्रा. भाग्यश्री पिसोळकर, सचिन उषा विलास जोशी, महेंद्र गणपुले | - |
| ८/०४/२०२५ | महाराष्ट्राचा सीबीएसई पॅटर्न | छत्रपती संभाजी नगर | सचिन उषा विलास जोशी, डॉ. श्रीरंग देशपांडे, महेंद्र गणपुले | जिल्हा केंद्र छत्रपती संभाजी नगर, श्री. सरस्वती भुवन शिक्षण संस्था |
| २६/०४/२०२५ | महाराष्ट्राचा सीबीएसई पॅटर्न | आझम कॅम्पस, पुणे | महेंद्र गणपुले, भाऊ गावंडे | - |
| २८/०६/२०२५ | पहिली पासून तीन भाषा | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | डॉ. श्रुती पानसे, डॉ. बसंती रॉय, महेंद्र गणपुले | - |
| ३०/०६/२०२५ | पहिली पासून तीन भाषा | छत्रपति संभाजी नगर | डॉ. श्रुती पानसे, डॉ. श्रीरंग देशपांडे, महेंद्र गणपुले | जिल्हा केंद्र छत्रपती संभाजी नगर, श्री. सरस्वती भुवन शिक्षण संस्था |
| - | पहिली पासून तीन भाषा | जिल्हा परिषद प्रशाला, जालना | डॉ. श्रुती पानसे, महेंद्र गणपुले, | जिल्हा केंद्र जालना, |
| २२/११/२०२५ | मूल्यांकनाच्या नव्या दिशा | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | तुषार म्हात्रे, अजित तिजोरे, डॉ. वसंत काळपांडे | - |

## ४.२ शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (SPIF)

**सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या SPIF कार्यशाळांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :**

पहिली कार्यशाळा दि. ६, ७ व ८ मे २०२५ रोजी कृषिविज्ञान केंद्र बारामती येथे पार पडली.
दुसरी कार्यशाळा दि. २७ आणि २८ ऑक्टोबर २०२५ रोजी तर
तिसरी कार्यशाळा दि. २१ आणि २२ फेब्रुवारी २०२६ खंडाळा येथे पार पडली.

**स्पीफ फेलोशिप २०२५-२६ चे विजेते व त्यांचे उपक्रम खालीलप्रमाणे :**

| अ.क्र. | प्राथमिक फेलोज २०२५-२६ | उपक्रमाचे नाव |
|---|---|---|
| १ | गुलाब रामजी दातीर | घरगुती उपकरणे दुरुस्ती प्रयोगशाळेतून विद्यार्थी विकास कौशल्य |
| २ | निलम आप्पासाहेब सुंबे | शोधात्मक अनुभवात्मक शिक्षणाचा स्तोत्र प्रोजेक्ट बेस्ट लर्निंग : PBL |
| ३ | मनिषा रामकिसन गिरी | 'सक्षम कवचस्वसंरक्षणाचे तंत्र आणि कौशल्ये' |
| ४ | शितल मोहन झरेकर | संगणन विचारातून भविष्यवेधी शिक्षणाकडे वाटचाल |
| ५ | दिपक गुरूबसअप्पा भांगे | ॲस्ट्रॉनॉमी क्लब - तारे, ग्रह आणि त्यापलीकडील ब्रह्मांडाची सफर |
| ६ | विजयकुमार किसन भुजबळ | आर्मी मुलींची, लढाई संकटांशी |
| ७ | प्रितम सातपुते | 'मिशन रेड डॉट' अंतर्गत किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळी विषयक जनजागृती करणे |
| ९ | ज्योती निलेश कांबळे | DIY (DO it Youerself) विज्ञान नवकल्पनांची प्रयोगशाळा |
| १० | गायत्री दिनकर आहेर | विद्यार्थ्यांमधील वाढती हिंसकवृत्ती व इतर वर्तन समस्यांची कारणमीमांसा करून त्यावर उपाययोजना करणे |
| ११ | सौ रोहिणी सचिन चौधरी | करिअर फाउंडेशन फॉर लिटिल चॅम्प |
| १२ | आरती विठ्ठल बोराडे | लैंगिक सुरक्षा शिक्षण अंतर्गत वयोगटानुरूप मुले, मुली, पालक आणि शिक्षकस्त्री, पुवैयक्तिक, सुरक्षा शिक्षण यांसाठी स्वप्न-कार्यक्रमांना पंख मिळू दे भाग-१, Self Help Module आणि मासिक पाळी स्वछता व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम स्वप्नांना पंख मिळू दे भाग – २, MHM Module राबविणे, या कृती संशोधनाचे शास्त्रीय पद्धतीने लेखन करून अंतिम अहवाल लेखन करणे, तपासणी करणे व सादरीकरण करणे. |

| | | |
|---|---|---|
| १३ | राजन गौतम गरुड | पारंपरिक कलेचा शैक्षणिक क्षेत्रात विकास करणारा बाल उपक्रम, 'आदिवासी बोलीभाषा बालसांस्कृतिक मंच' |
| १४ | बापू नरुटे | 'उद्योजकता शाळेतून: अनुभवाधारित शिक्षणाद्वारे उद्योजकता कौशल्ये विकसित करणे" |
| १५ | सतिश दिनकर कुंभार | सण साजरे करण्याच्या आधुनिक पद्धतींचे पर्यावरण पूरक नियमन |
| १६ | हरिश्चंद्र हाथवटे | अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या धर्तीवर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेतील बालसाहित्यिकांचे तालुकास्तरीय अभिरूप साहित्य संमेलन- एक वाङ्मयीन चळवळ |
| १७ | विठ्ठल कचरे | प्राथमिक आश्रमशाळा वारोळा या शाळेत राज्यातील शालेय पातळीवरील परकीय भाषा शिकण्याची पहिली प्रयोगशाळा तयार करणे. |
| १८ | संध्या भिते | Mentality of parents and teachers affects childs growth. |
| १९ | महेश मोतीलाल चव्हाण | शीर्षक पंज्योच खेळ माझ्या आज्या – उपशीर्षक – लोप पावत चाललेल्या पारंपरिक खेळात विद्यार्थ्यांची आवड निर्माण करून भारतीय पारंपरिक खेळ संस्कृती जोपासणे |

| अ.क्र. | माध्यमिक फेलोज | प्रकल्प नाव |
|---|---|---|
| १ | रविंद्र सोपान गांगर्डे | Weather Wanders for Young Forecasters - वेदर वंडर्स फॉर यंग फोरकास्टर्स शाळेत हवामान केंद्र, हवेची गुणवत्ता विश्लेषण आणि विद्यार्थी कौशल्यांचा विकास |
| २ | मंगेश मानकर | 'द स्टुडंट मार्ट' उद्योजकतेचे पहिले पाऊल...! |
| ३ | सुनिल वेलेकर | घर तिथे शाळा गाव तिथे शिक्षण |
| ४ | अरुण दोरके | 'मोबाईल शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा विषयक जागृती निर्माण करणे.' |
| ५ | राजेंद्र पाटील | किमया ब्लेंडेड लर्निंग मॉडेलची, आनंददायी शिक्षणास जोड डिजिटल तंत्रज्ञानाची |
| ६ | पूजा भागवत घुले | क्युरियम तंत्रज्ञान व गणित यांचे एकत्रीकरण |
| ७ | झिनत सय्यद | The leadership enhancement programme for secondary school students is entitled `The empowerment of future leaders: a leadership enhancement programme for secondary school students'. |
| ८ | पांडुरंग आलूरकर | The impact of sensory integration therapy as an early intervention for sensory precessing issues in Autism |

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन चाइल्ड एज्युकेशन (बालशिक्षण)**

३ ते ६ वयोगटातील मुलांचे शिक्षण किंवा बालशिक्षण हा देशातील अत्यंत महत्त्वाचा पण दुर्लक्षित राहिलेला विषय आहे. व्यक्तीच्या शिक्षणावरच नव्हे तर संपूर्ण आयुष्यावर प्रभाव टाकणाऱ्या बालशिक्षणाच्या क्षेत्रात बरेच काम व अभ्यास होणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर बालशिक्षणासाठीची ही फेलोशिप हे एक विधायक आणि ठोस पाऊल आहे. शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन चाइल्ड एज्युकेशन डबाल शिक्षण.या वर्षी प्रथमच शाळापूर्व स्तरावर बालशिक्षणासाठी काम करणाऱ्या व्यक्तींसाठी या फेलोशिप मधील १२ जागा उपलब्ध करून देण्यात येतात. शाळापूर्व स्तरावर कृती संशोधनाला प्रोत्साहन मिळावे असा यामागचा हेतू आहे. या अंतर्गत अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, CDPO, अनुदानित शाळांतील बालशाळांमध्ये कार्यरत शिक्षक व मुख्याध्यापक, तसेच बालशिक्षणात काम करणाऱ्या अशासकीय संस्थांतील कार्यकर्ते हे फेलोशिपसाठी पात्र असतील. त्यांना बालशिक्षण क्षेत्रात कृती संशोधन करण्याची संधी दिली जाते.

- **शैक्षणिक धोरणानुसार बदल**

सन २०२० मध्ये जाहीर झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने (NEP 2020) बालशिक्षणाला प्रथमच औपचारिक शिक्षणव्यवस्थेचा भाग म्हणून मान्यता दिली आहे. ३ ते ८ वर्ष या वयोगटास शिक्षणातील Foundational Stage म्हणण्यात आले आहे, त्यासाठी विशेष अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार अंगणवाड्या, बालवाड्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्राथमिक शाळांशी जोडल्या आहेत. बदललेल्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार पायाभूत शिक्षणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अंगणवाडी सेविकांना SPIF in Child Education देण्यात येईल. यामुळे अंगणवाडी सेविकांना प्रेरणा मिळून त्यांचे सक्षमीकरण होईल, असा विश्वास वाटतो. त्यामुळे २०२५ पासून शरद पवार इन्स्पायर फेलोशिपमध्ये बालशिक्षण क्षेत्रासाठी १० जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तज्ज्ञ समितीकडून अर्जांची छाननी पूर्ण करण्यात येईल व पात्रतेचे निकष अधिक गुणवत्तेने पूर्ण करणाऱ्या मोजक्याच अर्जदारांची तज्ज्ञांतर्फे दूरस्थ मुलाखतीसाठी निवड/प्रत्यक्ष (आवश्यकतेनुसार शाळाभेटीसह) मुलाखतीतील गुणवत्तेच्या मूल्यमापनानुसार दूरस्थ मुलाखतीसाठी निवड करण्यात येईल. प्रत्यक्ष फेलोशिपसाठी वरील प्रमाणे १० फेलोजची निवड करण्यात येईल. सदर फेलोशिपसाठी निलेश निमकर - मुख्य सल्लागार, नेहा कुलकर्णी मुख्य समन्वयक तसेच डॉ. मंजिरी निंबाळकर, सुचिता पडळकर, शलाका देशमुख, सुषमा पाध्ये, मालविका झा, शर्दुली जोशी, शालिनी नारनवरे आणि शैलेश जाधव हे सल्लागार आहेत. सन २०२५ साठी १२१ तर सन २०२६ साठी १८३ अर्ज प्राप्त झाले.

बालशिक्षणाची पहिली कार्यशाळा १९, २० आणि २१ सप्टेंबर २०२५ रोजी बारामती येथे झाली,
दुसरी कार्यशाळा १ आणि २ नोव्हेंबर २०२५ रोजी तर
तिसरी कार्यशाळा ७ आणि ८ फेब्रुवारी २०२६ रोजी खंडाळा येथे झाली.

**बालशिक्षण फेलोज २०२५-२६**

| अ.क्र. | नाव | प्रकल्प नाव |
|---|---|---|
| १ | आकाश गोरे | ३ ते ६ वयोगटातील मुलांच्या विकासात / शिक्षणात पालकांच्या सहभागाचा अभ्यास |
| २ | प्रज्ञा दत्ताराम शेपुंडे | ग्रामीण भागातील अंगणवाडीच्या पालकांचा त्यांच्या पाल्याच्या प्रगतीत सहभाग वाढवण्यासाठी पालक सभांचा प्रभावी उपयोग करणे |
| ३ | अस्मिता बिरजे | अंगणवाडी सेववकांची बालशिक्षण विषयक प्रशिक्षणे शाश्वत व कार्यक्षम करण्यासाठी प्रशिक्षण कार्यप्रणाली (SOPs) निश्चित करणे आणि त्या अनुषंगाने बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांच्या भूमिका व जबाबदारी ठरवणे. |
| ४ | बुद्धपाल डुमने | नांदेड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका भाषा आणि साक्षरता प्रशिक्षणानंतर ही पद्धत कशी वापरतात याचा अभ्यास |
| ५ | भावना भानुदास पाटील | सिन्नर तालुक्यातील पालकांचा मुलांना बालशाळेत घालताना माध्यम निवडण्यामागच्या विचार प्रक्रियेचा शोध. |
| ६ | निलम जगदाळे | अंगणवाडीत गुणवत्ता उंचावण्यासाठी अंगणवाडी सेविकेने केलेल्या स्वप्रयत्नांचा केस स्टडी. |
| ७ | मुन प्रल्हाद रायपुरे | नागपूर जिल्ह्यातील वडधामणा या अंगणवाडीतील डिजिटल तंत्रज्ञान वापराचा अभ्यास |
| ८ | उन्नत सांगळे | ५ ते ६ वयोगटातील मुलाांना जबाबदाऱ्या दिल्यास ती कसा प्रतिसाद देतात याचा अभ्यास करणे. |

- **जिल्हा समन्वयक बैठक**

शुक्रवार, दिनांक ९ मे २०२५ रोजी शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा समन्वयक आणि कोअर कमिटी टीम सदस्य यांची एकदिवसीय कार्यशाळा 'कृषी विज्ञान केंद्र, बारामती' येथे आयोजित करण्यात आली होती.

शिक्षण विकास मंचचे मुख्य समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी यांनी दैनंदिन कामात समन्वयकांचा सहभाग व दिशा या विषयावर सादरीकरण केले. यानंतर यशवंतराव चव्हाण सेंटर, शिक्षण विभाग प्रमुख योगेश कुदळे यांनी 'संघटनात्मक काम आणि समन्वयकांची भूमिका', समन्वयकाची जबाबदारी, समन्वयकाची कौशल्ये इत्यादी मुद्दे त्यांनी विस्ताराने मांडले.

कोअर कमिटीच्या सदस्य वैशाली सरवणकर यांनी कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठातून एम.ए. संस्कृत विषयात सुवर्ण पदक मिळविल्याबद्दल त्यांचा डॉ. वसंत काळपांडे यांनी सत्कार केला.

शिक्षण विकास मंचच्या विशेष सल्लागार बसंती रॉय, मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे, लेखक व

नागपूर शिक्षणकट्टा समन्वयक भाऊ गावंडे, कोअर कमिटी सदस्य महेंद्र गणपुले, अजित तिजोरे यांनी शिक्षण विकास मंचाच्या कार्याचा आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यानंतर झालेल्या खुल्या चर्चेत सर्व कोअर कमिटी सदस्य आणि जिल्हा समन्वयक यांनी आपल्या जिल्ह्यातील कामाविषयीचा आढावा घेतला तसेच भविष्यातील कामाविषयी काही योजना आणि सूचना याविषयी आपली मते मांडली.

पुढे अशा **जिल्हा समन्वयक बैठका** दि. २७ व २८ ऑक्टोबर २०२५ रोजी खंडाळा येथे, दि. २३ नोव्हेंबर आणि ७ डिसेंबर २०२५ रोजी पुणे येथे तसेच मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर समन्वयक परिषद बैठक 3 जानेवारी २०२६ रोजी घेण्यात आली.

- **राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने सोळाव्या राज्यस्तरीय वार्षिक शिक्षण परिषदेच्या पूर्वतयारीच्या निमित्ताने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या संदर्भाने 'मूल्यांकनाच्या नव्या दिशा' या मध्यवर्ती विषयावर ऑनलाइन राज्यस्तरीय शिक्षक प्रश्नमंजुषेचे आयोजन रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातून ६००५ शिक्षक-सदस्यांनी सहभाग घेतला. मराठी आणि इंग्रजी या दोन माध्यमातून ही स्पर्धा घेण्यात आली. शिक्षक प्रश्नमंजुषा उपक्रमाचे प्रमुख म्हणून शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी जबाबदारी पार पाडली. माजी उपसंचालक, एससीईआरटी, पुणे डॉ. नेहा बेलसरे आणि डॉ. आराधना कुलकर्णी यांनी विषयतज्ज्ञ म्हणून प्रश्नमंजुषेतील प्रश्न कोणते असावेत? त्याच्या निवडीचे काम त्यांनी केले. या सर्वांना तांत्रिक मदत कोअर टीमचे सदस्य आणि तंत्रस्नेही शिक्षक अजित तिजोरे यांनी केले. शिक्षण विकास मंचचे मुख्य समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी समन्वयाचे काम केले. ही प्रश्नमंजुषा महाराष्ट्रभर सर्वदूर पोहोचविण्याचे काम शिक्षण विकास मंचचे सर्व जिल्हा समन्वयक यांनी केले.

**प्रश्नमंजुषेचा निकाल पुढीलप्रमाणे :**

१. सौ. सोनाली सुनील सदरे : साहाय्यक प्राध्यापिका, छत्रपती शाहू व्यवसाय शिक्षण आणि संशोधन संस्था, कोल्हापूर (CSIBER), लोकनेते सदाशिवराव मंडलिक मार्ग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
२. प्रशांत भालचंद्र चिपकर : साहाय्यक शिक्षक, जि. प. पूर्ण प्राथ. शाळा दाभोली नं. २, दाभोली, तालुका वेंगुर्ला, सिंधुदुर्ग
३. नितीन भिकनराव बारगळ : साहाय्यक शिक्षक, राधाबाई काळे कन्या विद्यामंदिर, कोळपेवाडी मौजे सुरेगाव, फ्लॅट नं. १०३, एच विंग, रचना पार्क, कोपरगाव, अहिल्यानगर

२५ गुण मिळवणाऱ्या स्पर्धकांची संख्या : २४६
२० पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या स्पर्धकांची संख्या : २१७५
**एकही स्पर्धकाला शून्य गुण नाही.**

रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी मुंबई येथे झालेल्या सोळाव्या राज्यस्तरीय वार्षिक शिक्षण परिषदेत प्रश्नमंजुषेतील पहिल्या तीन विजेत्यांना प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

- मुंबई विद्यापीठ संलग्नित यशवंतराव चव्हाण सामाजिक संशोधन केंद्र सामाजिक शास्त्र विद्या शाखा अंतर्गत अर्थशास्त्र या विषयात पीएचडीं करत असलेल्या **मनीषा प्रशांत नवले** या विद्यार्थिनीने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या २० व्या आविष्कार आंतरमहाविद्यालय/विभाग संशोधन परिषदेत सुवर्णपदक पटकावले.

- **राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२५**

शिक्षक दिन आणि डॉ. कुमुद बन्सल यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या संदर्भाने 'मूल्यांकनाच्या नव्या दिशा' या विषयावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा-२०२५ चे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, राज्य अभ्यासक्रम आराखडा यामध्ये सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यांकनाची प्रभावी अंमलबजावणी, त्यामधील साधने व तंत्राचा परिणामकारक रीतीने उपयोग करावा असे सुचविण्यात आले आहे.

**निबंध स्पर्धा विषय :**

१. मूल्यांकनाच्या नव्या दिशा या मध्यवर्ती विषयाला अनुसरून त्यातील उपविषय जसे की – पुस्तकासह चाचणी.
२. मूल्यांकनात रुब्रिकचा उपयोग
३. समग्र प्रगतिपत्रक
४. पालक, शिक्षक व विद्यार्थी यांचा सहभाग असलेले ३६०° मूल्यांकन
५. अध्ययन हेच मूल्यांकन
६. अध्ययनासाठी मूल्यांकन
७. अध्ययनाचे मूल्यांकन
८. लर्निंग पोर्टफोलिओ (Learning Portfolio)
९. मित्र-मूल्यांकन
१०. रोल प्ले व नाट्याद्वारे मूल्यांकन
११. AI - कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित मूल्यांकन

निबंधस्पर्धेस राज्यभरातून खूप मोठा प्रतिसाद मिळाला. मराठी आणि इंग्रजी या दोन माध्यमातून घेण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्यातील विविध भागांतून एकूण ६१९ निबंध प्राप्त झाले.

**राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२५ अंतिम निकाल :**

| अ.क्र. | स्पर्धक नावे | माध्यम | क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|
| १ | जयश्री काटीकर ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे | मराठी | प्रथम क्रमांक | वर्ग प्रकल्प तंत्र |
| २ | वैभव पोरे, जि. प. प्राथमिक शाळा, सिद्रामळा, हवेली, पुणे | मराठी | द्वितीय क्रमांक | पुस्तकासह चाचणी |
| ३ | अंजली रमेश तांबे, महानगरपालिका शाळा क्रमांक ८६, पाथर्डीगाव, नाशिक | मराठी | तृतीय क्रमांक | समग्र प्रगतिपत्रक: मूल्यांकनाचा एक व्यापक दृष्टिकोन |
| ४ | अंकुश विठ्ठल रासकर, न्यू इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज लोणंद, पुणे | मराठी | उत्तेजनार्थ | लर्निंग पोर्टफोलिओ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | देवेंद्र विजय खंडारे, आदर्श शाळा, सिंदखेड मोरेश्वर, अकोला | मराठी | | गट पद्धती: भूमिका साकारणे ऐतिहासिक व्यक्तिरेषा वठवणे |
| ६ | संगीता संतोष रेळेकर, सकुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला, सोलापूर | मराठी | | विज्ञान विषयात पुस्तकासह. चाचणी विचार प्रवर्तक प्रश्न |
| ७ | श्रीधर गव्हाणे जि. प. प्राथमिक शाळा, नांदगाव, पुणे. | मराठी | | स्वत:च्या शिकण्याचे विद्यार्थ्याकडून मूल्यांकन |
| ८ | मंगला नथुजी गणवीर जि.प.उच्च प्राथमिक शाळा चिचाळ मुले ता.पवनी जि.भंडारा. | मराठी | | विद्यार्थी संचिका पोर्टफोलिओ |
| ९ | राजेंद्र भानुदास निकत नूमवि कनिष्ठ महाविद्यालय, पुणे 2 | मराठी | | स्वत:च्या शिकण्याचे विद्यार्थ्यांकडून मूल्यांकन |
| १० | अनिरुद्ध अजित किल्लेदार सरस्वती विद्यामंदिर, तळेगाव दाभाडे, पुणे | इंग्रजी माध्यम | प्रथम | Stress-free Assessment Technique |
| ११ | अश्विनी दीपक आडकर न्यू इंग्लिश स्कूल, वडगाव मावळ, पुणे | इंग्रजी माध्यम | द्वितीय क्रमांक | AI Based Assessment |
| १२ | पल्लवी अभिमन्यू कऱ्हाड नेहरूनगर म्युनिसिपल उच्च प्राथमिक इंग्लिश स्कूल, मुंबई उपनगर | इंग्रजी माध्यम | तृतीय क्रमांक | |

रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी मुंबई येथे झालेल्या सोळाव्या राज्यस्तरीय वार्षिक शिक्षण परिषदेत विजेत्यांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

- **'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : मूल्यांकनाच्या नव्या दिशा' परिषद**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत शिक्षणातील मूल्यांकन पद्धतींमध्ये होत असलेल्या बदलांचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेली सोळावी राज्यस्तरीय शिक्षण परिषद ४ जानेवारी २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे पार पडली. राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेले शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने परिषदेत सहभागी झाले. शिक्षण क्षेत्रातील सध्याच्या घडामोडी, नव्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव, मूल्यांकनातील धोरणात्मक बदल आणि तंत्रज्ञानाची भूमिका याबाबत परिषदे दरम्यान सखोल चर्चा घडून आली.

मुख्य समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी यांनी परिषदेच्या प्रास्ताविकातून शिक्षण विकास मंचाच्या कामाचा आलेख सांगून शिक्षणातील मंचाची भूमिका मांडली.

'गुण देणे म्हणजे मूल्यांकन नव्हे, विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा प्रवास समजून घेणे म्हणजे मूल्यांकन होय.' असे परिषदेची भूमिका स्पष्ट करताना यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष मा. खा. सुप्रिया सुळे म्हणाल्या. आपल्या भाषणात त्यांनी शिक्षण क्षेत्रातील बदलत्या वास्तवावर भाष्य करताना सांगितले. मूल्यांकन हे केवळ

गुणांकनाची प्रक्रिया नाही. मूल्यांकन म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रवास, त्यांची जिज्ञासा, विचारशक्ती, सर्जनशीलता आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल विकास घडविणारी प्रक्रिया असल्याचे सांगितले.

या परिषदेचे बीजभाषण MKCL चे मुख्य मार्गदर्शक विवेक सावंत यांनी केले. ते म्हणाले, मूल्यांकन वर्षभर चालणारी प्रक्रिया असून तिच्या व्यापक संकल्पनेचे विश्लेषण त्यांनी केले. त्यांनी स्पष्ट केले की, पारंपरिक शिक्षणपद्धतीत गुण म्हणजेच शिक्षण. निकाल म्हणजेच प्रगती असा संकुचित दृष्टिकोन तयार झाला होता. मात्र NEP २०२० नुसार मूल्यांकन आता सतत चालणारी प्रक्रिया असून विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील बदलांची नोंद घेणारी आहे. शिक्षक–विद्यार्थी संवादाचे सक्षम साधन अशी नवी ओळख यामुळे प्राप्त करून देत आहे. त्यांनी PARAKH, HPC, कौशल्याधारित मूल्यांकन आणि बहुआयामी प्रगती मूल्यांकनाची माहिती दिली. त्यांचे अत्यंत प्रभावी एक विधान परिषदेत लक्षवेधी ठरले ते म्हणजे, जेव्हा गुण हेच ध्येय ठरते, तेव्हा शिक्षणाचा मूक बळी जातो. शिक्षण अनुकरण --> अनुसरण --> अनुसर्जन या प्रवासातून घडते असा अनुभव सांगितला.

या परिषदेत 'डॉ. कुमुद बन्सल राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. पुरस्कार विजेते: किशोर मोतीराम भागवत, बुलढाणा आणि विजया शरद किरमीरवार, आनंदवन, भामरागड, गडचिरोली यांना नवोपक्रमशील अध्यापन पद्धती, विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन, सामाजिक भान जपणाऱ्या शिक्षणकार्यामुळे त्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार रती भोसेकर लिखित बालशिक्षण-एक अद्‌भुत सफर या ग्रंथाला मिळाला. नावीन्यातून नैपुण्य, फुलताना, उन्नती – समावेशित शिक्षणाची या पुस्तकांना लक्षवेधी शैक्षणिक ग्रंथ म्हणून गौरविण्यात आले. राज्यस्तरीय निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांकडून गौरव करण्यात आला.

मूल्यांकनाचे नवे प्रयोग सादर कताना डॉ. मिलिंद नाईक यांनी ज्ञानप्रबोधिनीतील मूल्यांकन प्रयोगांची माहिती दिली. त्यांनी अनुभवाधारित शिक्षण, स्वमूल्यांकन यांचा शैक्षणिक परिणाम अधोरेखित केला. डॉ. विशाल पाजणकर यांनी एनसीईआरटी, नवी दिल्ली राष्ट्रीय स्तरावर मूल्यांकनात काय काम करते आहे. याचे सादरीकरण केले. PARAKH ची संकल्पना, राष्ट्रीय मूल्यांकन चौकट, बहुमितीय कौशल्य मूल्यांकन याचे सविस्तर विश्लेषण त्यांनी केले.

डॉ. राजेंद्र मोरे रयत शिक्षण संस्था यांनी संस्थात्मक पातळीवरील मूल्यांकन उपक्रम मांडले. परिषदेला उपस्थित असलेल्या शिक्षकांनी खुल्या चर्चासत्रात ग्रामीण–शहरी मूल्यांकनातील भेद, शिक्षक प्रशिक्षणाची आवश्यकता, डिजिटल साधनांचा जबाबदार वापर यावर काही मुद्दे उपस्थित केले. डॉ. विकास गरड, बसंती रॉय, ऐनुल अत्तार यांनी या सत्राला मार्गदर्शन केले. या सत्राचे संचलन अरविंद शिंगाडे, सोमनाथ वाळके यांनी केले. उपस्थित शिक्षकांनी ही परिषद शिक्षण व्यवस्थेला नवा बौद्धिक वेग देणारी ठरली आहे, असा विश्वास व्यक्त केला.

समारोप सत्रात डॉ. वसंत काळपांडे , धनवंती हर्डीकर यांनी परिषदेतील मुद्द्यांचा आढावा घेवून, ही परिषद केवळ कार्यक्रम नव्हे तर शिक्षण व्यवस्थेतील नव्या मूल्यांकनाला दिशा दाखवणारी आहे, असे प्रतिपादन केले.

या वेळी मच्छिंद्र बोऱ्हाडे, अचला मचाडो यांनी निवेदन केले तर योगेश कुदळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

- **स्पीफ शाळा भेटी**

१. पीएम श्री विद्या मंदिर गोरंबे शाळा :

शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन या फेलोशीप अंतर्गत शाळेचे पदवीधर अध्यापक श्री. सतीश दिनकर कुंभार यांच्या सण साजरे करण्याच्या आधुनिक पद्धतींचे पर्यावरण पूरक नियमन या उपक्रमाची पाहणी करण्यासाठी श्री. योगेश कुदळे यांनी बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी शाळेला भेट दिली. यामध्ये या उपक्रमांतर्गत शाळेमध्ये राबवलेल्या पर्यावरणपूरक नागपंचमी, पर्यावरणपूरक गणेशोत्सव, फटाके मुक्त दिवाळी, आकाश कंदील निर्मिती, शिवकालीन मर्दानी युद्धकला प्रात्यक्षिके अशा सर्व उपक्रमांची माहिती घेतली. या भेटीचे औचित्य साधून कुंभार सरांनी त्यांच्या उपक्रमांतर्गत ज्या विद्यार्थ्यांना मर्दानी खेळाचे प्रशिक्षण दिले होते त्या मुलांच्या युद्धकला सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

२. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला संधी देण्यासाठी आणि त्यांच्यात साहित्याची गोडी निर्माण करण्यासाठी वाळुंज (ता. आष्टी, जि. बीड) येथे सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी भव्य 'बालसाहित्य संमेलन' अत्यंत उत्साहात पार पडले. शरद पवार इन्स्पायर फेलोशीप प्राप्त फेलो कवी डॉ. हरीश हातवटे यांच्या संकल्पनेतून हा स्तुत्य उपक्रम पार पडला.

भर उन्हाळ्यातही विद्यार्थ्यांचा आणि ग्रामस्थांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. संमेलनाची सुरुवात दिमाखदार 'ग्रंथदिंडीने' झाली, त्यानंतर उद्घाटन सोहळा, बहारदार कविसंमेलन, रंजक कथाकथन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. या संमेलनाचे अध्यक्षपद प्रसिद्ध साहित्यिक डॉ. कैलास दौंड यांनी भूषवले, तर स्वागताध्यक्ष म्हणून प्राजक्ताताई सुरेश धस उपस्थित होत्या. कार्यक्रमास संदीप पवार, श्री. अनंत हांडे आणि योगेश कुदळे उपस्थित होते.

या प्रसंगी मा. श्री. मनोरंजन धस, कवी हनुमंत चांदगुडे, कवी शंकर कसबे यांच्यासह शिक्षण व साहित्य क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते.

३. बीड जिल्ह्यातील वारोळा (ता. माजलगाव) येथील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत २४ मार्च रोजी 'जपानी दिवस' हा अभिनव शैक्षणिक उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. शरद पवार इन्स्पायर फेलोशीप प्राप्त फेलो श्री. विठ्ठल कचरे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. बदलत्या जागतिक प्रवाहात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांना परदेशी भाषेची ओळख करून देऊन त्यांची संवादक्षमता वाढवणे हा यामागचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाचे खरे आकर्षण ठरले ते म्हणजे इयत्ता १ ली ते ४ थीचे चिमुकले विद्यार्थी! या विद्यार्थ्यांनी मराठी आणि इंग्रजीसोबतच जपानी भाषेत दैनंदिन संवाद, फळे, भाज्यांची नावे आणि साध्या वाक्यरचनांचे अत्यंत आत्मविश्वासाने सादरीकरण केले. जय भवानी आश्रमशाळेचे सचिव श्री. दिलीप भैय्या जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण सेंटरचे शिक्षण विभाग प्रमुख श्री. योगेश कुदळे यांच्या हस्ते झाले.

- **यशवंतराव चव्हाण रिसर्च सेंटर ऑफ सोशल सायन्स (मुंबई विद्यापीठाशी संलग्नित)'महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेचे (रेशनिंग) वास्तव '**

यशवंतराव चव्हाण रिसर्च सेंटर ऑफ सोशल सायन्स (मुंबई विद्यापीठाशी संलग्नित) आणि महाराष्ट्र रेशनिंग कृती समिती यांच्या वतीने शुक्रवार, २५ एप्रिल २०२५ रोजी 'महाराष्ट्रातील दारिर्द्य रेषेचे (रेशनिंग) वास्तव : व्याख्या आणि अंमलबजावणी' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले होते.

या चर्चासत्रामध्ये प्रामुख्याने प्राधान्य कुटुंबाचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण व शहरी भागामध्ये उत्पन्न मर्यादा किती असावी याबाबत सखोल अभ्यास करून काही निष्कर्ष काढण्यात आले. प्राधान्य कुटुंबाचा लाभ घेण्यासाठी काही घटक उदाहरणार्थ आदिम जमाती, कचरा वेचक, परितक्ता एकट्या राहणाऱ्या विधवा निराधार महिला, सायकल रिक्षा चालक, भूमिहीन शेतमजूर, रोजंदारीवर काम करणारे दुर्धर आजार ग्रस्त कुटुंब अशा कुटुंबांना उत्पन्नाची अट न लावता त्यांना सरसकट प्राधान्य कुटुंबाचा लाभ देण्यात यावा तसेच याव्यतिरिक्त ग्रामीण भागात उत्पन्न मर्यादा ही दोन लाखापर्यंत असावी व शहरांमध्ये अडीच लाखापर्यंत असावी हा निष्कर्ष काढण्यात आला.

या चर्चासत्रात नीरज हातेकर, संजीव चांदुरकर, अनिकेत भातखंडे, अलका धुपकर, भीम रासकर, उल्का महाजन, सुरेश सावंत यांचा सहभाग होता. महाराष्ट्र शासनाने प्राधान्य कुटुंबाचा लाभ घेण्यासाठी व त्याचे निकष ठरवण्यासाठी स्थापन केलेल्या कमिटीचे अध्यक्ष मा. सुधाकर तेलंग साहेब, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा तसेच मा. तात्याराव कोळेकर सहसचिव व आशिष आत्राम हे सेक्शन ऑफिसर उपस्थित होते.

१८ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आविष्कार संशोधन अधिवेशनात मुंबई विद्यापीठ संलग्नित यशवंतराव चव्हाण सामाजिक संशोधन केंद्राच्या सामाजिक शास्त्रविद्या शाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. करत असलेल्या प्रा. मनीषा प्रशांत नवले यांनी प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) मिळवून आपल्या संशोधन केंद्राचा मान उंचावला आहे.

तसेच धनंजय चनाले या विद्यार्थ्याने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या २०व्या 'आविष्कार' आंतरमहाविद्यालयीन/विभागीय संशोधन परिषदेत Agriculture and Animal Husbandry या विभागात सुवर्णपदक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, या प्रतिष्ठित स्पर्धेत यशवंतराव चव्हाण सामाजिक संशोधन केंद्राला मिळालेले हे या वर्षातील दुसरे सुवर्णपदक आहे.

## ९.५ युवा विभाग

- **राज्यस्तरीय युवा समन्वयक कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर युवा विभागाच्या वतीने रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी एकदिवसीय राज्यस्तरीय युवा समन्वयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले युवक आणि युवा समन्वयक सहभागी झाले.

तरुण पिढीसमोरील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि वैयक्तिक आव्हानांवर विचारमंथन करण्यासाठी तसेच युवकांमध्ये संवाद, नेतृत्व आणि समन्वयाची भावना दृढ करण्यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरली.

आधुनिक सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत संघभावना आणि सामूहिक नेतृत्व किती महत्त्वाचे आहे, यावर कार्यशाळेमध्ये चर्चा झाली. स्थानिक पातळीवर प्रभावी कार्यक्रमांचे नियोजन आणि यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन समन्वयकांना करण्यात आले.

संपूर्ण महाराष्ट्रातील युवकांना एकत्र जोडणारे सक्षम आणि सशक्त युवकांचे नेटवर्क उभारण्यावर या सत्रात भर देण्यात आला तसेच समाजासमोरील आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी समन्वयकांना नेतृत्वक्षमतेने सज्ज करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

- **मानसिक आरोग्य आणि तणाव नियंत्रण**

यशवंतराव चव्हाण सेंटर युवा विभाग आणि माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी (AIT) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८ मार्च २०२६ रोजी चव्हाण सेंटर येथे 'युथ वेलबीइंग प्रोग्राम'अंतर्गत 'मानसिक आरोग्य आणि तणाव नियंत्रण' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला AIT चे विद्यार्थी आणि फॅमिली सर्व्हिसच्या तरुणांसह एकूण ४५ युवकांनी सहभाग घेतला.

मानसिक आरोग्य मार्गदर्शक व प्रशिक्षक श्रीमती स्वाती राणे आणि श्री. संदेश लालागे यांनी या कार्यशाळेतील विविध सत्रांचे मार्गदर्शन केले. कार्यशाळेत 'आर्ट थेरपी' आणि 'ताणतणाव बादली' यांसारख्या सहभागात्मक उपक्रमांचा समावेश करण्यात आला होता. या उपक्रमांमुळे सहभागी युवकांना ताणतणावाचे स्वरूप समजून घेण्यास, त्याचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी उपयुक्त उपाय शिकण्यास आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूक होण्यास मदत झाली. तसेच, मानसिक आरोग्याला प्राधान्य देत स्वत:च्या स्वास्थ्याची जाणीवपूर्वक काळजी घेण्याची प्रेरणाही या कार्यशाळेतून युवकांना मिळाली.

**शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (SPIF) (शेती) अंतर्गत उपक्रम व क्षेत्रीय भेटी**

- **'साम्राज्य ॲग्रो इंडिया प्रा. लि.' ला भेट**

दि. १५ मार्च २०२६ रोजी कोल्हापूर येथील 'साम्राज्य ॲग्रो इंडिया प्रा. लि.' या संस्थेला भेट देण्यात आली. ॲग्रीकल्चर फेलो म्हणून श्री. पाटील हे शेतीची कार्यक्षमता वाढविणारी तसेच स्थानिक शेतकरी समुदायाला सक्षम करणारी नावीन्यपूर्ण कृषी उपकरणे विकसित करण्याचे कार्य करत आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये प्रभावी वापर करण्यास चालना मिळत असून, कृषी क्षेत्रात शाश्वत आणि सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने उल्लेखनीय योगदान दिले जात आहे.

या भेटीदरम्यान त्यांच्या पेटंट प्राप्त ऊस लागवड तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती घेण्यात आली. मुंबई येथील 'सिर्कोट'कडून या प्रकल्पाला विकास निधी मिळाला आहे. तसेच साम्राज्य ॲग्रोद्वारे तयार करण्यात येणाऱ्या विविध कृषी यंत्रसामग्रीची पाहणी करण्यात आली. यामध्ये खोडवा व्यवस्थापन यंत्रे (ratoon management machines), सीड ड्रील्स, कल्टिव्हेटर्स, सऱ्या पाडणारी यंत्रे (furrow openers) आणि आर/एफ रोटाव्हेटर्स यांचा समावेश आहे. ही आधुनिक कृषी तंत्रज्ञाने शेतीची उत्पादकता वाढवण्यास आणि शाश्वत शेतीला चालना देण्यास महत्त्वपूर्ण योगदान देतात.

- **नावीन्यपूर्ण ब्रँड 'पोशाक"**

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथे SPIF फेलो अमोघ मयी यांच्या 'पोशाक' (Poshaqq) या नावीन्यपूर्ण उपक्रमाला भेट देण्यात आली. 'पोशाक' हा भारतातील पहिला भाजी मिल किट ब्रँड असून, या माध्यमातून शेफने तयार केलेल्या मसाल्यांच्या मिश्रणासह स्वच्छ व चिरलेल्या आरोग्यदायी भाज्या ग्राहकांपर्यंत पोहोचवल्या जातात. कोणत्याही टिकवणाऱ्या रसायनांचा वापर न करता तयार केलेल्या या भाजी किट्सची शेल्फ लाईफ ६ महिन्यांची आहे. यामुळे ताज्या आणि घरगुती चवीच्या भाज्या अवघ्या ७ मिनिटांत तयार करणे शक्य होते.

या वेळी त्यांच्या 'रुचिरंग' या रेडी-टू-कूक मसाला ब्रँडचीही माहिती घेण्यात आली. या ब्रंडअंतर्गत १२० हून अधिक मसाल्यांची उत्पादने उपलब्ध असून, ती दैनंदिन स्वयंपाकाची प्रक्रिया अधिक सोपी, जलद आणि सोयीस्कर करतात. त्याचबरोबर पारंपरिक चव, अस्सलपणा आणि गुणवत्तेचा समतोलही जपला जातो.

- **SPIF ॲग्रीकल्चर फेलोशिप प्रत्यक्ष मुलाखती**

दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पुणे येथील निसर्ग कार्यालयात 'SPIF– ॲग्रीकल्चर फेलोशिप'च्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतींसाठी ६० उमेदवार उपस्थित होते. मुलाखतीच्या पॅनेलमध्ये प्रमोद राजेभोसले, सीईओ, एच-स्क्वेअर इनक्युबेशन सेंटर, सह्याद्री फार्म्स; योगेश थिटे, एआयसी मार्गदर्शक व गुंतवणूक तज्ज्ञ; नरेंद्र पवार, संचालक, समर्थ फार्मर मार्केट; श्रीकांत कारणेवार, प्राध्यापक, ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती; संतोष मेकाले, युवा विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण सेंटर आणि केतन पाटील, एझ्झ कोअर टीम यांचा समावेश होता.

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप प्रदान सोहळा (वर्ष ५ वे)**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथे चव्हाण सेंटरचे अध्यक्ष मा. शरद पवार यांच्या उपस्थितीत 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप' प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. फेलोशिपचे हे पाचवे वर्ष असून, आतापर्यंत ६५० जणांना फेलोशिपचा लाभ मिळाला आहे. मा. शरद पवार साहेबांच्या सहस्रचंद्रदर्शनानिमित्त शिक्षण, कृषी आणि साहित्य या क्षेत्रांतील कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी फेलोशिप सुरू करण्यात आली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश समाजामध्ये सकारात्मक आणि दीर्घकालीन परिणाम घडवून आणणाऱ्या उपक्रमांना बळ देणे हा आहे.

**उत्कृष्ट फेलोज आणि त्यांच्या नवकल्पना**

| फेलोचे नाव आणि जिल्हा | नवकल्पना/प्रकल्प | विशेष कामगिरी/हायलाइट्स |
|---|---|---|
| श्री. सुशांत देसाई (कोल्हापूर) | पशुखाद्य निर्मिती ('देसाईज सह्याद्री पशुखाद्य') | तांदूळ व नाचणीच्या प्रक्रियेतील उपपदार्थांपासून निर्मिती; वार्षिक उलाढाल ०१ कोटी रुपये. |
| श्री. वेदांत गुप्ता (यवतमाळ) | आधुनिक शेती सेवा | शेतकऱ्यांना 'मी हायड्रोपोनिक आणि एरोपोनिक' आधारित आधुनिक शेतीचे स्ट्रक्चर व सेवा पुरवणे. |

| | | |
|---|---|---|
| श्रीमती भाग्याश्री तुपे (छत्रपति संभाजीनगर) | नैसर्गिक वनस्पती पोषण | फळाच्या सालीपासून नैसर्गिक प्रक्रियेद्वारे झाडांना पोषक लिक्विड तयार करणे. |
| कु. भाविका केणे (अहिल्यानगर) | सुपरफूड स्नॅक्स ('सत्व बाईट') | मिलेट आणि सुपरफुडपासून केमिकल व प्रिजर्व्हेटिव्हज विरहित विविध स्नॅक्स प्रॉडक्ट्स निर्मिती आणि लाँचिंग. |
| श्री. अंकित टेटस (यवतमाळ) | नर्सरी व लँडस्केपिंग | १ एकर नर्सरीचा ३ एकरमध्ये विस्तार; ५ जिल्ह्यांत लँडस्केपिंग सुविधा, वार्षिक उत्पन्न ४०-५० लाख रुपये. |
| कु. दिपाली काळभोर (पुणे) | मध प्रक्रिया | मधापासून विविध प्रकारचे दर्जेदार प्रॉडक्ट्स तयार करून उत्पन्न मिळवणे. |
| श्री. मेहुल महेंद्र शहा (सातारा) | ॲग्री-टेक स्टार्टअप | AI व IoT आधारित पीकनिहाय ड्रिप सिंचन सुविधा; १.५ लाख शेतकऱ्यांचा स्मार्ट शेती समुदाय. |
| श्री. श्रावणी शिंदे (सांगली) | आधुनिक कृषी उपकरण | शेतीसाठी उपयुक्त 'AVERATH लिथियम-आयन बॅटरी स्प्रे पंप' १,००० हून अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवला. |

- **सोहळ्यातील इतर प्रमुख वैशिष्ट्ये**
  - सन २०२४-२५ मधील फेलोशिप यशस्वीपणे पूर्ण केलेल्या तीन फेलोंचा (आनंद आनेमवाड - शिक्षण, रेश्मा तांबोळी - साहित्य, अंकित टेटर - कृषी) सत्कार करण्यात आला.
  - विश्वजीत नवनाथ काळे (SPIF २०२२-२३ फेलो) यांना देशभरातून प्रथम क्रमांकासह 'डॉ. एपीजे अब्दुल कलाम रिसर्च फेलोशीप २०२५' जाहीर झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

- **शैक्षणिक आणि सामाजिक समन्वय (Institutional Visits & Synergies)**

नवीन शैक्षणिक आणि सामाजिक समन्वयाला चालना देण्याच्या उद्देशाने दि. ३० मार्च २०२६ रोजी कोल्हापूर येथील काही संस्थांना भेट देण्यात आली. या भेटीदरम्यान `CSIBER' संस्थेच्या सोशल वर्क विभागाचे प्रा. डॉ. दीपक भोसले तसेच शिवाजी विद्यापीठाच्या सोशल वर्क अभ्यास मंडळाचे (BOS) अध्यक्ष डॉ. अमोल मिणचेकर यांना भेटून त्यांना यशवंतराव चव्हाण सेंटरच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच युवकांचा सहभाग वाढविणे, सामाजिक विकासासाठी संयुक्त उपक्रम राबविणे आणि भविष्यातील सहकार्याच्या विविध संधींवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

- **युथ वेलबीइंग प्रोग्राम**

युवा विभागातर्फे विविध शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने 'युथ वेलबीइंग वर्कशॉप'चे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळांचा मुख्य उद्देश युवकांमध्ये आत्मभान, नेतृत्व क्षमता, सामाजिक जाणीव, समुदाय समज, भावनिक सक्षमता आणि लोकसहभागाची भावना विकसित करणे हा होता.

विविध सत्रांद्वारे विद्यार्थ्यांना स्वत:ची ओळख, समाजातील भूमिका, युवा नेतृत्व, सामाजिक रचना, ग्रामीण विकास प्रक्रिया, गुणात्मक संशोधन पद्धती आणि सहभागात्मक ग्रामीण मूल्यांकन (PRA) यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. PRA च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समुदायाची रचना, स्थानिक समस्या, उपलब्ध संसाधने आणि विकास प्रक्रियेत लोकसहभागाचे महत्त्व समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना, प्रश्न समजून घेण्याची क्षमता, सामाजिक जबाबदारी आणि समुदायाशी संवाद साधण्याची कौशल्ये विकसित झाली. युवकांना केवळ वैयक्तिक विकासासाठी नव्हे, तर समाजातील सकारात्मक बदलांसाठी सक्रिय भूमिका घेण्यासाठी प्रेरित करणे हा या उपक्रमांचा उददेश होता.

| दिनांक | ठिकाण | सहभागी कॉलेजचे नाव | मार्गदर्शक |
|---|---|---|---|
| २५ फेब्रुवारी २०२६ | TISS, मुंबई | टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS) व मुंबई विद्यापीठ | ॲड. विश्वजीत चौधरी, स्वाती राणे, संतोष मेकाले, योगेश कुदळे, |
| मार्च २०२६ | सेंट पायस कॉलेज, गोरेगाव | सेंट पायस कॉलेज, गोरेगाव (संघमित्रा टीमच्या सहकार्याने) | संतोष मेकाले |
| मार्च २०२६ | किल्लेबंदर, वसई | घनश्यामदास जालान कॉलेज ऑफ कॉमर्स, आर्ट्स अँड सायन्स, मालाड | संतोष मेकाले |
| १०-११ जानेवारी २०२६ | कोसबाड हिल्स, पालघर | डालमिया कॉलेज | प्रा. विश्वजीत चौधरी, संतोष मेकाले |
| ११ डिसेंबर २०२५ | नायगाव | शैलेंद्र एज्युकेशन सोसायटी ज्युनियर कॉलेज | स्वाती राणे |
| ११ डिसेंबर २०२५ | कामन | शैलेंद्र एज्युकेशन सोसायटी डिग्री कॉलेज | संतोष मेकाले |
| २२ सप्टेंबर २०२५ | SNDT विद्यापीठ, मुंबई | SNDT विद्यापीठ | निखिल वलाडे, संतोष मेकाले |

- **अभिसरण – यूथ एक्सचेंज प्रोग्राम**

यशवंतराव चव्हाण सेंटर, युवा विभाग आणि कालिका स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभिसरण – युथ एक्सचेंज प्रोग्राम' (Batch 19) अंतर्गत पूर्व विदर्भ ते उत्तर महाराष्ट्र असा ९ दिवसांचा अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्याची सुरुवात सेवाग्राम, वर्धा येथून झाली. उद्घाटन कार्यक्रमात नितेश कराळे यांनी युवा प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. या प्रवासात युवकांनी नंदुरबार, धुळे, नाशिक आणि जळगाव या जिल्ह्यांना भेटी दिल्या. या ठिकाणच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शेतीशी संबंधित जीवनाचा त्यांनी अनुभव घेतला.

जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथे प्रसिद्ध कवी आणि समाजसेवक **ना. धों. महानोर** यांच्या जन्मस्थळाला भेट देण्यात आली. यावेळी त्यांच्या कन्या योगितताई महानोर यांनी युवकांना गावाच्या विकासासाठी काम करण्याची प्रेरणा दिली तसेच सामाजिक जबाबदारी आणि नेतृत्व विकास यावर मार्गदर्शन केले.

या अभ्यास दौऱ्याचा समारोप नाशिक येथे झाला. समारोप कार्यक्रमात अशोक पिंगळे, सुरेखा बोराडे, प्रा. खेमराज पाटील, डॉ. उल्हास सोनवणे तसेच निर्मल ग्राम संस्थेचे श्रीकांत आणि नलिनी नावरेकर यांनी युवकांना मार्गदर्शन केले.

या दौऱ्यामुळे युवकांना विविध भागांतील लोकजीवन, संस्कृती, शेती आणि सामाजिक कार्य समजून घेण्याची संधी मिळाली. तसेच नवीन अनुभव आणि नेतृत्वाची प्रेरणा मिळाली.

- **तीन दिवसीय ग्रामीण शिबिर**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि जिल्हा केंद्र, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ डिसेंबर ते २८ डिसेंबर २०२५ दरम्यान हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये ३ दिवसीय ग्रामीण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात मुंबईतील १० महाविद्यालयांमधील ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या शिबिराचा उददेश विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन जवळून समजून घेण्याची संधी उपलब्ध करून देणे हा होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागाची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती समजून घेतली. तसेच शेती, दुग्धव्यवसाय, लघुउद्योग आणि इतर उपजीविकेच्या साधनांचा अभ्यास केला. गावातील स्थानिक स्वराज्य व्यवस्था आणि 'पंचायत राज' पद्धतीबद्दलही माहिती घेतली. या शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील नेते, शेतकरी, महिला बचत गट, युवक आणि विविध सामाजिक संस्थांशी संवाद साधला. त्यामुळे त्यांना ग्रामीण भागातील समस्या, संधी आणि लोकजीवनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (SPIF) बूटकॅम्प**

कृषी क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणण्यासाठी 'ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती' येथील अटल इन्क्यूबेशन सेंटर येथे दि. १५ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२५ दरम्यान ५-दिवसीय निवासी बूटकॅम्पचे आयोजन करण्यात आले. बूटकॅम्पचे दिवसनिहाय सत्र खालीलप्रमाणे होते:

दिवस १ : एम.के.सी.एल.चे चीफ मेंटॉर विवेक सावंत, ट्रस्टचे सीईओ नीलेश नलावडे आणि जया तिवारी यांनी 'नवउद्योजकता आणि उद्यमशीलता' यावर मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथे मिलेट्स, ग्राफ्टिंग, हायड्रोपोनिक्स आणि ॲरोपोनिक्स प्रकल्पांची पाहणी केली.

दिवस २ : बारामती येथे संस्थात्मक नेतृत्व संवाद व फेलोचे सादरीकरण झाले. 'AIC पिनाकल'च्या वतीने ॲड. मनाली पी. बिडकर यांनी बौद्धिक संपदा (IP - पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराइट) जागरूकता सत्र घेतले; इंडो सायन्स एज्युकेशन ट्रस्टचे संतोष पिसे यांनी सॉफ्ट स्किल्स ट्रेनिंग दिले. शेवटी समीर डोम्बे (पवित्रक) व मयूर पवार (वीनग्रो मार्केट) यांच्या यशोगाथा मांडल्या.

दिवस ३ : सोनाली आणि अभिषेक यांनी 'बिझनेस पिच डेक प्रिपरेशन' सत्र घेतले. दीपेश चंद्रन यांनी 'बिझनेस स्टोरीटेलिंग' कार्यशाळा घेतली. सुश्री अवंती राजवाडे यांनी स्टार्टअप्स कायदेशीर अनुपालन (Legal Compliances) आणि डॉ. एस. एस. मगर यांनी 'क्लायमेट स्मार्ट ॲग्रीकल्चर' वर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.

‘अरे संसार संसार’ – बहिणाबाईंच्या कवितांचा सांगीतिक कार्यक्रम




कविवर्य ना. धों. महानोर पुरस्कार २०२५ चे मानकरी




दिवंगत शरद काळे स्मृती व्याख्यान




PGCP-AC Feb २०२३ Batch



कुमुद बंसल गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२५



कुमुद बंसल गुणवंत शिक्षिका पुरस्कार २०२५



शिक्षण समन्वयक कार्यशाळा पुणे



शिक्षण परिषद ४ जानेवारी २०२६



शरद पवार इंस्पयार फेलोशिप २०२५ प्रदान सोहळा




यशवंतराव चव्हाण सामाजिक संशोधन केंद्राच्या सामाजिक शास्त्र विद्या शाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. करत असलेल्या प्रा. मनीषा प्रशांत नवले यांनी प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) मिळवून आपल्या संशोधन केंद्राचा मान उंचावला



धनंजय चनाले या विद्यार्थ्याने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या २० व्या ‘आविष्कार’ आंतरमहाविद्यालयीनविभागीय संशोधन परिषदेत Agriculture and Animal Husbandry या विभागात सुवर्णपदक मिळवले.



मानसिक आरोग्य परिषद





समन्वयक कार्यशाळा



नमो शक्ती दिव्यांग योजना




दिव्यांग हक्क कायदा जिल्हास्तरीय बैठक –पुणे



छ. संभाजीनगरमध्ये महिला धोरण चर्चासत्रात सहभागी महिला



जळगावमधील आदिवासी महिला विकास कार्यशाळेत सहभागी आदिवासी महिला

पुणे येथील महिला धोरण चर्चासत्रात मांडणी करताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या किरण मोघे



महिला पत्रकार संमेलन




युथ कॉन्क्लेव्ह



यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युथ अवॉर्ड्स



SIPF




अभिसरण – पूर्व विदर्भ ते उत्तर महाराष्ट्र




शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन ॲग्रीकल्चर
२०२५-२६, १६ डिसेंबर, २०२५



युथ वेल-बीइंग वर्कशॉप





राज्यस्तरीय युवा समन्वयक कार्यशाळा



डिसेंबरअखिल भारतीय वनहक्क आणि जंगल चळवळ परिषद – नागपूर (५ ते ७ एप्रिल २०२५)




विशेष बैठक – शरदचंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली (७ जून २०२५, पुणे)




पुस्तक प्रकाशन कार्यक्रम – मुंबई (१६ जून २०२५)






‘कम्युनिटी ॲक्शन फॉर न्यूट्रिशन (CAN)’ अहवाल प्रकाशन – मुंबई (३ नोव्हेंबर २०२५)



प्रलंबित वनहक्क दाव्यांबाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या पुढाकाराने बैठक (२३ जून २०२५)



विशेष बैठक – वनमंत्री गणेश नाईक यांच्यासोबत (२७ जून २०२५, पुणे)



कोकण भवन येथे विभागीय आयुक्त श्री. सूर्यवंशी यांच्या सोबत जनसुनावणी क्षेत्र: कोंकण विभाग या विषयी बैठक (दिनांक: १९ नोव्हेंबर २०२५)

वनहक्क जनसुनावणी – कोकण विभाग
(प्रक्रिया: ऑक्टोबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६
आयोजन: २४ फेब्रुवारी २०२६)



साहित्य निर्मितीच्या नव्या शक्यता शोधताना
—कार्यशाळेत फेलोंनी आपल्या लेखनावर
सादरीकरण करत तज्ज्ञांशी संवाद साधला.



साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेतील अनुभव,
आव्हाने आणि पुढील वाटचालीबाबत फेलो व
मार्गदर्शक यांच्यात अर्थपूर्ण संवाद.



तिसऱ्या कार्यशाळेची यशस्वी सांगता - फेलो, मार्गदर्शक
आणि तज्ज्ञ लेखक यांचा उत्साहपूर्ण सहभाग आणि
साहित्यनिर्मितीच्या नव्या संकल्पनांचा सामूहिक उत्सव.



‘नव्या साहित्यिक प्रवासाची सुरुवात’ - शरद पवार इन्स्पायर फेलोशिप साहित्य २०२६ च्या पहिल्या कार्यशाळेत फेलो आणि मार्गदर्शक यांच्यात साहित्य प्रकल्पांच्या संकल्पना, उद्दिष्टे आणि कार्ययोजनेवर सखोल चर्चा झाली.





खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांची यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या कराड येथील समाधी स्थळ व विरंगुळा निवासस्थानास भेट




कवी संमेलन



मोफत दंत चिकित्सा फोटो

मोफत श्रावणयंत्र वाटप शिबीर






धोरण कुठवर आल गं बाई ! महिला धोरण विषय एक दिवशीय चर्चासत्र

आयडॉल शिक्षकांचा सत्कार: राज्यस्तरीय निवड झालेल्या दहा शिक्षकांचा सत्कार



मान्सून शो २०२५ जालना: जिल्हा स्तरीय कलाप्रदर्शनाचे आयोजन





मा. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या ४१व्या पुण्यतिथीनिमित्त विशेष व्याख्यान






आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने अंगणवाडी सेविकांचा सत्कार आणि धोरण कुठवर आलं ग बाई.. महिला धोरण चर्चासत्र

अभिनेते मिलिंद शिंदे यांच्या तिरिया काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न



अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव



ज्येष्ठ लेखक, पानिपातकार श्री. विश्वास पाटील यांचा नवी मुंबई केंद्रातर्फे भव्य सत्कार व व्याख्यानाचे आयोजन



विविध क्षेत्रातील गुणवंत कृतज्ञता पुरस्कार २०२६ चे विजेते व सोबत दिलीपराव वळसे पाटील व अध्यक्ष प्रमोद कर्नाड






गुणवंतांचा सत्कार सोहळा, बुलढाणा




स्वातंत्र्यदिनानिमित्त स्वतंत्र ज्योत रॅलीचे आयोजन

शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांच्या कार्याचा गौरव








'पुस्तकाचे गाव- संकल्पना' या विषयावर चर्चासत्र

मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी आणि चष्मे वाटप, पुणे



'धोरण कुठंवर आलं ग बाई' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन



यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र सोलापूरच्या नूतन अध्यक्षा डॉ. निशिगंधा माळी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारणीची पहिली बैठक संपन्न.



उद्योग्शिल्प स्व. जयकुमार पाटील यांच्या २१व्या पुण्यतिथीनिमित्त 'सोलापुरातील उद्योग उभारणीचा काळ' या विषयावर विचारवंत प्रा. डॉ. रावसाहेब पाटील यांचे व्याख्यान





वृत्तवेध सुलेखन स्पर्धा २०२५ - पुरस्कार वितरण






राष्ट्रीय शैक्षणिक परिषद, नागपूर



सृजन अंतर्गत शहरी शेतीवर कार्यशाळा, नाशिक



जिल्हा केंद्र नाशिकच्या सदस्या सौ. सुरेखा बोऱ्हाडे यांचे देदीप्यमान शलाका पुस्तकाचे प्रकाशन




रागिणी कामतीकर, मा. गुलजार यांची गाणी सादर करताना



मा. संजय भगवंतराव पाटील यांचे व्याख्यान




क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत व्याख्यान देताना मा. ॲड. जयंत जायभावे



‘धोरण कुठवर आलं ग बाई’ या विषयावर चर्चासत्र

दिवस ४: श्री. अभिषेक गिते यांच्या मार्गदर्शनाखाली 'CoE डेअरी मिल्क प्रोसेसिंग युनिट'ला भेट देऊन दूध प्रक्रिया व मूल्यवर्धन तंत्रज्ञान समजून घेतले. त्यानंतर श्री. राम बेंद्रे (पुणे) यांनी 'डिझाइन थिंकिंग वर्कशॉप' घेतले. संध्याकाळी संगीत विद्यालय शारदानगरच्या आशिष गावडे व टीमची संगीतमय मैफल संपन्न झाली.

- **द यशवंत युथ कॉन्क्लेव्ह, पुणे**

पुणे येथे ३, ४ व ५ मे २०२५ रोजी आयोजित ३-दिवसीय 'द यशवंत युथ कॉन्क्लेव्ह'मध्ये युवकांशी त्यांच्या स्वप्नातील भारत, नेतृत्वक्षमता आणि धोरणात्मक नियोजनावर महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. सत्रांचे सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहेत:

| सत्र | विषय | प्रमुख मुद्दे |
|---|---|---|
| सत्र १ | युवक आणि एआय | विवेक सावंत यांनी आर्टिफ़िशिअल इंटेलीजन्सची बदलती भूमिका आणि तरुणांच्या भविष्यातील संधींवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात संविधान उद्देशिकेच्या वाचनाने झाली. |
| सत्र २ | समूह बांधणी आणि सांघिक रचना | संदेश लालागे यांनी खेळ व उपक्रमांद्वारे विश्वास, सहकार्य आणि आत्म-जागरूकता वाढविण्यावर भर दिला. |
| सत्र ३ | स्वत:ची ओळख | स्वाती राणे यांनी सहभागींना स्वत:ची मूल्ये, क्षमता आणि सामर्थ्य ओळखण्यासाठी मार्गदर्शन केले. |
| सत्र ४ | युवक आणि लोकशाही | साधना प्रकाश, मुख्य संपादिका साधना प्रकाशन यांनी लोकशाहीचा इतिहास, विकास आणि घटनात्मक हक्क यावर मार्गदर्शन केले. |
| सत्र ५ | प्रशासनाचा अभ्यास व युवा बजेट | संतोष मेकाले यांनी लोकशाही व्यवस्था, महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प आणि त्याचा युवकांवरील परिणाम यावर चर्चा केली. |
| सत्र ६ | वायसीसी सोबत काम करणे | टीम वायसीसीने संस्थेचे ध्येय, मूल्ये आणि सेवाभिमुख कार्यपद्धतीची माहिती दिली. |
| सत्र ७ | नेतृत्व कौशल्ये आणि समुदाय सहभाग | समीर शिपुरकर यांनी प्रभावी नेतृत्व, संवाद आणि समुदायाशी जोडले जाण्याबाबत मार्गदर्शन केले. |
| सत्र ८ | परिसंवाद – कृतीशील युवक | गायत्री सुतार यांच्या संचालनाखाली तरुण परिवर्तनदूतांच्या प्रेरणादायी यशोगाथा मांडण्यात आल्या. |
| सत्र ९ | सर्जनशील विचार प्रक्रिया | अक्षय शिंपी यांनी कल्पक विचार, नवकल्पना आणि कृतिशील दृष्टिकोन विकसित करण्यासाठी मार्गदर्शन केले. |

- **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार २०२४**

महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रात विधायक, भरीव व विशेष कामगिरी करणाऱ्या युवक-युवतींना प्रतिवर्षी यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. छत्रपती

संभाजीनगर येथील एमजीएम परिसरातील रुक्मिणी सभागृहात दि. ३० मे २०२५ रोजी हा सोहळा आयोजित करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप रोख २१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे आहे. मुख्य अतिथी राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे आणि जिल्हा केंद्र अध्यक्ष अंकुशराव कदम यांनी तरुणांना नोकरी मागणारे होण्यापेक्षा 'नोकरी देणारे' होण्याचे आणि नवनवीन विक्रम स्थापित करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी डॉ. विलास सपकाळ, डॉ. आशिष गाडेकर, दासू वैद्य, नीलेश राऊत, दत्ता बाळसराफ आणि संतोष मेकाले उपस्थित होते. (सविस्तर माहिती छत्रपती संभाजीनगर केंद्र अहवालात देण्यात आली आहे.)

## ९.६ आदिवासी विकास केंद्र (CTD)

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या आदिवासी विकास केंद्रामार्फत मागील एक वर्षभरात महाराष्ट्रातील विविध भागांत आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर केंद्रित अनेक धोरणात्मक बैठका, अभ्यासदौरे, जनसुनावणी प्रक्रिया, परिषदांचे आयोजन तसेच संशोधन व प्रकाशन उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांचा मुख्य उद्देश वनहक्क कायदा, पेसा, शिक्षण, आरोग्य, उपजीविका, महिला सक्षमीकरण, पोषण, हवामान बदल आणि सांस्कृतिक हक्क यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर संवाद घडवून आणणे, स्थानिक समुदायांचे सक्षमीकरण करणे तसेच शासनस्तरावर प्रभावी धोरणात्मक हस्तक्षेपासाठी आवश्यक पाठपुरावा करणे हा होता. या विभागातर्फे राबविली जाणारी सर्व कामे सुकाणू समितीच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केली जातात. या सुकाणू समितीमध्ये मा. सौ. सुप्रिया सुळे, श्री. दिलीप गोडे, श्रीमती प्रतिभा शिंदे, ॲड. पूर्णिमा उपाध्याय, डॉ. किशोर मोघे, ॲड. इंदवी तुळपुळे आणि श्री. वासुदेव कुळमेथे यांचा समावेश असून श्री. प्रशांत ईखार समन्वयक म्हणून त्यांना साहाय्य करतात.

- **गडचिरोली अभ्यासिका व वाचनालय पाहणी**

एप्रिल २०२५ च्या सुरुवातीला गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधांचा आढावा घेण्यासाठी पाहणी दौरा आयोजित करण्यात आला. २ आणि ३ एप्रिल रोजी विविध वाचनालये, अभ्यासिका आणि संगणक प्रशिक्षण संस्थांना भेट देण्यात आली, तर ४ एप्रिल रोजी या सर्व निरीक्षणांचे संकलन करून अहवाल तयार करण्यात आला.

या पाहणीदरम्यान जिल्हा ग्रंथालय, गोंडवाना विद्यापीठ वाचनालय, तसेच काही खासगी अभ्यासिका (Study Points) यांचा अभ्यास करण्यात आला. जिल्हा ग्रंथालयासारख्या ठिकाणी मोफत सुविधा, वृत्तपत्रे, स्वच्छता आणि मोठी आसन क्षमता उपलब्ध असल्याने ते विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत असल्याचे दिसून आले. याउलट काही खासगी अभ्यासिका वातानुकूलित आणि सुविधासंपन्न असल्या तरी त्यांचे शुल्क सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी परवडणारे नाही, ही बाब स्पष्ट झाली.

अनेक ठिकाणी संदर्भग्रंथ, स्पर्धा परीक्षा साहित्य आणि डिजिटल साधनांची कमतरता आढळली. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वत:ची पुस्तके आणावी लागत होती. संगणक प्रशिक्षणासाठी अल्फा अकॅडमीसारख्या उपक्रमांची उपयुक्तता लक्षात आली, मात्र अशा सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध होण्याची गरज अधोरेखित झाली.या पाहणीतून असे स्पष्ट झाले की, आदिवासी भागात शिक्षणासाठी मूलभूत सुविधा असल्या तरी त्या सर्वसमावेशक, दर्जेदार आणि परवडणाऱ्या स्वरूपात उपलब्ध नाहीत.

- **अखिल भारतीय वनहक्क आणि जंगल चळवळ परिषद – नागपूर**

गडचिरोली पाहणीनंतर ५ ते ७ एप्रिल २०२५ दरम्यान नागपूर येथे अखिल भारतीय वनहक्क आणि जंगल चळवळ परिषद आयोजित करण्यात आली. देशातील १९ राज्यांतील प्रतिनिधींनी सहभाग घेतलेल्या या परिषदेत वनहक्क चळवळीच्या व्यापक प्रश्नांवर सखोल चर्चा झाली.

या परिषदेत FRA आणि PESA कायद्यांच्या अंमलबजावणीतील अडचणी, वनविभागाचा हस्तक्षेप, ग्रामसभेचे अधिकार आणि सामुदायिक वनहक्कांचे व्यवस्थापन या मुद्द्यांवर चर्चा झाली. विविध राज्यांतील उदाहरणांमधून 'अखिल भारतीय जंगल आंदोलन मंच' धोरण आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील दरी स्पष्ट झाली.

८ ारिषदेच्या शेवटी ग्रामसभा ही निर्णय प्रक्रियेचे केंद्र असावे, महिला सहभाग बंधनकारक करावा आणि संरक्षित क्षेत्रांमध्ये FRA लागू करावा, या मुद्द्यांवर एकमत झाले.

- **मा. शरदचंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक**

७ जून २०२५ रोजी पुणे येथे आदिवासी विकास केंद्राच्या वतीने एक विशेष बैठक आयोजित करण्यात आली. मा. शरदचंद्र पवार साहेब यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पश्चिम महाराष्ट्र, अहिल्यानगर आणि कोकण विभागातील विविध संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

या बैठकीत शिक्षण, आरोग्य, रोजगार, वनहक्क आणि पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधी सखोल चर्चा झाली. विविध भागांतील अनुभवांमधून आश्रमशाळांची स्थिती, आरोग्यसेवेतील तफावत, रोजगाराच्या मर्यादा आणि वनहक्क दाव्यांमधील विलंब या समस्या अधोरेखित झाल्या.

- **पुस्तक प्रकाशन कार्यक्रम – मुंबई**

१६ जून २०२५ रोजी मुंबई येथे 'महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प २०२४-२५ - आदिवासींसाठी अंदाजपत्रकीय तरतूद व खर्च विश्लेषण' या अभ्यास अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमात शासनाच्या बजेटमधील तरतुदी आणि प्रत्यक्ष खर्च यामधील तफावत स्पष्ट झाली. आरोग्य, शिक्षण आणि वनहक्क क्षेत्रातील निधीचा अपुरा वापर हा एक गंभीर मुद्दा असल्याचे निदर्शनास आले.

- **खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या पुढाकाराने बैठक**

२३ जून २०२५ रोजी पुणे येथे प्रलंबित वनहक्क दाव्यांबाबत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या पुढाकारातून झालेल्या या बैठकीत जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत ४४ प्रलंबित दावे निकाली काढण्याचा निर्णय घेण्यात आला, तसेच सामूहिक दावे सादर करण्यासाठी गावांना प्रोत्साहन देण्याचे ठरले. मंजूर दाव्यांची सातबाऱ्यावर नोंद करण्याबाबतही प्रशासनाला निर्देश देण्यात आले.

- **वनमंत्री श्री. गणेश नाईक यांच्यासोबत विशेष बैठक**

२७ जून २०२५ रोजी वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक आयोजित करण्यात आली. वनविभागाचे सहकार्य, ग्रामसभेचे अधिकार, पुराव्यांची सुलभता आणि CFR व्यवस्थापन यांसारख्या

मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी बैठकीतील मुद्द्यांचे सादरीकरण केले. ही बैठक धोरणात्मक निर्णय प्रक्रियेसाठी महत्त्वाची ठरली.

- **वनहक्क जनसुनावणी संदर्भात समन्वय बैठक**

३० जुलै २०२५ रोजी आयोजित ऑनलाईन बैठकीने राज्यस्तरीय वनहक्क जनन्यायाधिकरण प्रक्रियेचा पाया घातला. या बैठकीत पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज (PUCL) आणि यशवंतराव चव्हाण सेंटरच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. विविध विभागांमध्ये आधीच झालेल्या क्षेत्रीय बैठकींचा आढावा घेत, त्या अनुभवांवर आधारित व्यापक जनसुनावणी आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीदरम्यान हे अधोरेखित करण्यात आले की, महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीत असलेल्या अडचणींचे स्वरूप वेगवेगळे असले, तरी त्यामागील मूलभूत कारणे, प्रशासकीय विलंब, पुराव्यांच्या निकषांतील विसंगती, आणि ग्रामसभेच्या अधिकारांचे मर्यादित मान्यकरण ही समान आहेत. त्यामुळे या सर्व अनुभवांचे दस्तऐवजीकरण करून एक व्यापक चित्र उभे करणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त झाले.

या पार्श्वभूमीवर सप्टेंबर २०२५ च्या पहिल्या आठवड्यात जनन्यायाधिकरण आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. PUCL कडे दस्तऐवजीकरण, ज्युरी पॅनेलची निवड आणि शासकीय अधिकाऱ्यांशी समन्वय या तीन प्रमुख जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या. तसेच, यशवंतराव चव्हाण सेंटरकडून संकल्पनापत्र तयार करणे, विविध विभागांतील संस्थांशी संपर्क साधणे आणि साक्ष (testimonies) गोळा करण्याची जबाबदारी निश्चित करण्यात आली.

या बैठकीत वैयक्तिक (IFR) आणि सामुदायिक (CFR) वनहक्क दाव्यांमधील अडचणी वेगवेगळ्या स्वरूपात नोंदवण्यासाठी स्वतंत्र स्वरूप तयार करण्याचा निर्णयही घेण्यात आला. सहभागी संस्थांना पुरेसा वेळ मिळावा यासाठी पूर्वनियोजनावर भर देण्यात आला. तसेच, समन्वय सुलभ करण्यासाठी व्हॉट्सॲप गट तयार करून सातत्यपूर्ण संवाद ठेवण्याचे ठरले.

- **'कम्युनिटी ॲक्शन फॉर न्यूट्रिशन (CAN)' अहवाल प्रकाशन - मुंबई**

३ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई येथे 'कम्युनिटी ॲक्शन फॉर न्यूट्रिशन (CAN)' अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. या अहवालामध्ये महाराष्ट्रातील सात आदिवासी जिल्ह्यांमधील ४२० गावांमध्ये राबवण्यात आलेल्या समुदाय-आधारित पोषण उपक्रमांचा सखोल आढावा सादर करण्यात येतो.

या उपक्रमाची सुरुवात सन २०१८ मध्ये करण्यात आली होती, ज्यामध्ये स्थानिक पातळीवरील उपलब्ध अन्नस्रोतांचा वापर करून कुपोषण कमी करण्यावर भर देण्यात आला. या प्रक्रियेत अंगणवाडी सेविका, आशा सेविका, ग्रामसमिती सदस्य आणि पालक यांचा सक्रिय सहभाग होता. विशेष म्हणजे, या उपक्रमात केवळ पोषणपुरवठा न करता लोकजागृती, संवाद आणि समुदाय सक्षमीकरण यावर अधिक भर देण्यात आला.

अहवालात नमूद केल्याप्रमाणे, सुमारे २१,६०१ बालकांपर्यंत पोहोचून त्यांच्या पोषण स्थितीत लक्षणीय सुधारणा करण्यात आली. सहा महिन्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर तीव्र आणि मध्यम कुपोषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटल्याचे दिसून आले. या प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक बालकाची माहिती नोंदवली गेली, त्यामुळे नियोजन आणि अंमलबजावणी अधिक प्रभावी झाली.

या अहवालाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये केवळ आकडेवारी दिलेली नसून समुदायाच्या सहभागातून बदल कसा घडवून आणता येतो, याचे एक जिवंत उदाहरण दिसते. कुपोषणासारख्या जटिल समस्येवर स्थानिक उपाययोजना, सामूहिक कृती आणि प्रशासनाशी समन्वय यांच्या माध्यमातून परिणामकारक उपाय करता येतात, हे या उपक्रमातून स्पष्ट झाले.

- **वनहक्क जनसुनावणी (कोकण विभाग) – तयारी, समन्वय व अंमलबजावणी प्रक्रिया**

महाराष्ट्र राज्यात वनहक्क कायदा (FRA) अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी विभागनिहाय जनसुनावण्या आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याची सुरुवात कोकण विभागापासून करण्यात आली. आदिवासी व पारंपरिक वनवासी समुदायांच्या समस्या व तक्रारी मांडण्याचे एक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

दिनांक ९ व ११ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या प्रारंभिक बैठकींमध्ये जनसुनावणीची संकल्पना व कार्ययोजना निश्चित करण्यात आली. त्यानंतर १६ ऑक्टोबर रोजी पूर्वतयारी बैठकीत साक्ष नोंदणी, पुरावे संकलन व प्रक्रियेबाबत सविस्तर चर्चा झाली. विविध संस्थांशी सातत्याने संपर्क ठेवून व्हॉट्सॲप, ईमेल व दूरध्वनीद्वारे समन्वय साधण्यात आला.

दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत १३२ पेक्षा अधिक प्रकरणे प्राप्त झाली असून त्यांची नोंद व पडताळणी करण्यात आली. नोव्हेंबर महिन्यातील बैठकांमध्ये जनसुनावणीची तारीख, स्थळ, न्यायमंडळ व शासकीय समन्वय यावर चर्चा झाली. त्यानंतर २८ नोव्हेंबर व ४ डिसेंबर रोजी अंतिम नियोजन करण्यात आले.

जानेवारी–फेब्रुवारी २०२६ मध्ये अंतिम तयारी पूर्ण करून ९ फेब्रुवारी रोजी जनसुनावणीची तारीख २४ फेब्रुवारी २०२६ निश्चित करण्यात आली. त्यानुसार सर्व आवश्यक समन्वय, निमंत्रणे व कागदपत्रांची तयारी करण्यात आली.

- **वनहक्क जनसुनावणी – कोकण विभाग (प्रक्रिया: ऑक्टोबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ | आयोजन: २४ फेब्रुवारी २०२६)**

वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीचा सखोल आढावा घेण्यासाठी कोकण विभागात आयोजित करण्यात आलेली जनसुनावणी ही एक बहुपदरी, नियोजनबद्ध आणि व्यापक प्रक्रिया होती. ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झालेल्या या उपक्रमात प्रारंभी संकल्पना निश्चित करण्यात आली आणि विभागनिहाय जनसुनावण्या आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

यानंतर विविध टप्प्यांत पूर्वतयारी बैठकांचे आयोजन करून साक्ष नोंदणीची प्रक्रिया, पुरावे संकलन, आणि सहभागी संस्थांशी समन्वय साधण्यात आला. व्हॉट्सॲप, ईमेल आणि प्रत्यक्ष संपर्काच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रकरणे गोळा करण्यात आली. नोव्हेंबर २०२५ पर्यंत १३२ पेक्षा अधिक प्रकरणे प्राप्त झाली. ती पुढे वाढून १३७ प्रकरणांपर्यंत पोहोचली.

या सर्व प्रकरणांचे वर्गीकरण, पडताळणी आणि दस्तऐवजीकरण अत्यंत पद्धतशीरपणे करण्यात आले. विविध बैठकींमध्ये जनसुनावणीची तारीख, स्थळ, न्यायमंडळाची रचना आणि कार्यपद्धती निश्चित करण्यात आली. जानेवारी आणि फेब्रुवारी २०२६ मध्ये अंतिम तयारी करताना प्रकरणांची पूर्तता, पुरावे तपासणी आणि शासकीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात आला.

२४ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित जनसुनावणीत कोकणातील विविध जिल्ह्यांतील आदिवासी बांधवांनी आपल्या समस्या, अनुभव आणि तक्रारी ज्युरीसमोर मांडल्या. अनेक प्रकरणांत दीर्घकाळ प्रलंबित दावे, अपूर्ण कागदपत्रांच्या कारणावरून नाकारलेले अर्ज, तसेच ग्रामसभेच्या अधिकारांचे उल्लंघन यांसारख्या गंभीर बाबी निदर्शनास आल्या.

- **हवामान बदल व पर्यावरण कार्यशाळा – जळगाव**

१० ते १२ मार्च २०२६ दरम्यान जळगाव येथे आयोजित तीन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा आदिवासी समाजावर वाढत्या हवामान बदलाच्या परिणामांचा अभ्यास आणि त्यावर उपाययोजना निश्चित करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. आदिवासी विकास केंद्र आणि लोक संघर्ष मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेत जळगाव आणि नंदुरबार जिल्ह्यातील सुमारे ३० गावांतील कार्यकर्ते सहभागी झाले होते.

कार्यशाळेदरम्यान हवामान बदलाचे वैज्ञानिक पैलू, स्थानिक पातळीवरील परिणाम आणि भविष्यातील धोके यावर सखोल चर्चा झाली. वाढते तापमान, अनियमित पावसाचे स्वरूप, दुष्काळी परिस्थिती आणि नैसर्गिक संसाधनांवरील ताण यामुळे शेती, पाणी आणि उपजीविकेवर होणारे परिणाम स्पष्ट करण्यात आले.

सहभागी कार्यकर्त्यांनी त्यांच्या गावांतील प्रत्यक्ष अनुभव मांडले, ज्यातून हवामान बदलाचा परिणाम सर्वाधिक गरीब, कष्टकरी आणि आदिवासी समाजावर होत असल्याचे अधोरेखित झाले. या पार्श्वभूमीवर स्थानिक स्तरावर उपाययोजना आखण्याची गरज अधोरेखित झाली.

कार्यशाळेत माहितीपट, चर्चासत्रे आणि समूहचर्चा यांच्या माध्यमातून विषय अधिक प्रभावीपणे मांडण्यात आला. विशेषत: 'The Story of Stuff' या चित्रफितीमुळे आधुनिक उपभोगवादी जीवनशैली आणि पर्यावरणीय ऱ्हास यातील संबंध स्पष्ट झाला.

या कार्यशाळेचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे गावपातळीवर महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग असलेले स्थानिक गट तयार करण्याचा निर्णय. हे गट हवामान बदलाशी संबंधित माहिती संकलन, जनजागृती आणि स्थानिक उपाययोजना राबवण्यासाठी कार्यरत राहतील. तसेच, शासनावर धोरणात्मक दबाव निर्माण करण्यासाठी व्यापक अभियान राबवण्याचेही या वेळी ठरविण्यात आले.

> **"जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केल्याशिवाय आणि जीवनामध्ये असलेले श्लेष आणि काव्य यांच्याशी अधिक जवळीक केल्याशिवाय साहित्यात मोलाची भर कोणी घालू शकेल असे मला वाटत नाही."**
>
> **-यशवंतराव चव्हाण**

# १०. जिल्हा केंद्रे:-

## १०.१ नागपूर

- **'शब्द ओंजळीतले' काव्यसंग्रहाचे प्रकाशन**

१ ९ एप्रिल २ ० २ ५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर आणि विद्या विकास पब्लिशिंग हाऊस यांच्या संयुक्त विद्यमाने यामिनी पायघन लिखित 'शब्द ओंजळीतले' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन तसेच त्यातील कवितांवरील गाण्याचा कार्यक्रम लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या वेळी ओंजळीतील शब्द स्वरांच्या माध्यमातून सभागृहात विखुरल्याने वातावरण नादमय झाले. या स्वरलहरींनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले.

प्रमुख अतिथी म्हणून जी. एच. रायसोनी युनिवर्सिटी, अमरावतीचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, प्रसिद्ध संगीतकार शैलेश दाणी, यशवंतराव चव्हाण सेंटरचे जिल्हा केंद्र नागपूरचे अध्यक्ष महेश बंग, ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकरराव ठेंगडी, जयवंतराव उपगडे, यामिनी पायघन उपस्थित होते. या वेळी यामिनी पायघन यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

- **राष्ट्रीय शिक्षण परिषदेचा अहवाल मा. शरदचंद्र पवार यांना सदर**

यशवंतराव चव्हाण जिल्हा केंद्र नागपूर यांच्यातर्फे २ ० एप्रिल २ ० २ ५ रोजी नागपूर येथे राष्ट्रीय शैक्षणिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. तीन सत्रात झालेल्या एका दिवसीय शिक्षा परिषदेला देशातील नामवंत शिक्षण तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या नवीन शैक्षणिक धोरणावर शिक्षण तज्ज्ञांनी भूमिका विषद केल्या. विदर्भात पहिल्यांदाच अशा परिषदेचे आयोजन केले गेले. शेकडो शिक्षकांनी या परिषदेत उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने परिषद यशस्वी झाली होती.

त्या परिषदेचा संपूर्ण अहवाल यशवंतराव चव्हाण सेंटरचे केंद्रीय अध्यक्ष म्हणून खासदार शरदचंद्र पवार यांना नागपूर केंद्राचे अध्यक्ष महेश बंग यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेऊन सदर केला. या वेळी राजाभाऊ टाकसांडे, कोमल ठाकरे, डॉ. अभय महांकाळ, अनिल इंदाने, रवींद्र देशमुख, उल्हास मोगालेवर, निलेश खांडेकर उपस्थित होते.

- **वृत्तवेध सुलेखन स्पर्धा**

विद्यार्थ्यांमध्ये वृत्तपत्र वाचनासह सुलेखनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र आणि वेध प्रतिष्ठानच्या संयुक्त वतीने २ ७ जुलै २ ० २ ५ रोजी वृत्तवेध सुलेखन स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनराईचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते. ज्येष्ठ संपादक प्रमोद काळबांडे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. या वेळी ज्येष्ठ संपादक बाळ कुळकर्णी, यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष महेश बंग, सचिव प्रा. डॉ. कोमल ठाकरे, वेध प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मनोहर नरांजे, सचिव खुशाल कापसे, उपाध्यक्ष वसंत गोमासे, रवी देशमुख, नीलेश खांडेकर प्रामुख्याने उपस्थित होते.

ही स्पर्धा वर्ग ५ ते ८ आणि वर्ग ९ ते १२ या दोन गटांत घेण्यात आली. वर्ग ५ ते ८ या गटात प्रथम क्रमांक क्षितिज कोल्हे (जि. प. शाळा, सुकडी जि. यवतमाळ), द्वितीय क्रमांक पल्लवी अंबरते (जि. प. शाळा, तिडंगी ता.. कळमेश्वर), तृतीय क्रमांक तृधा खडगी डॉ. (न. प. हायस्कूल, कळमेश्वर) तर से, प्रोत्साहनपर पुरस्कार मितांश ढाले ख, (यशोदा इंग्लिश स्कूल, नागपूर), तसेच बत धनश्री ठाकरे (जि. प. शाळा, नक्षी, ता. भिवापूर) या विद्यार्थ्यांनी प्राप्त केला. वर्ग ९ ते १२ या गटात प्रथम क्रमांक जान्हवी हांडे (पीपल्स ज्युनिअर कॉलेज, यवतमाळ), द्वितीय क्रमांक शर्वरी कोठेकर (पीपल्स ज्युनिअर कॉलेज, यवतमाळ), तृतीय क्रमांक योगिता ठाकरे (जगदंबा ज्युनिअर कॉलेज, यवतमाळ), प्रोत्साहन पुरस्कार सेजल कोठेकर (डॉ. नंदूरकर विद्यालय, यवतमाळ) आणि संचिता दिवटे (लालबहादूर शास्त्री विद्यालय, बाबूळवाडा, ता. पारशिवनी) या विद्यार्थ्यांनी प्राप्त केला. विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रास्ताविक महेश बंग यांनी केले. हा कायक्रम यशस्वी व्हावा यासाठी वसंत गोमासे, कृष्णा चावके, शंकर जीवनकर, ओंकार पाटील, डॉ. कीर्ती पालटकर, डॉ. अश्विन किनारकर, डॉ. शिल्पा सूर्यवंशी, डॉ. अश्विनी देहाडराय, राजेंद्र टेकाडे, एकनाथ खजुरिया, धनंजय पकडे, वासंती गोमासे, योगेश भुरसे, प्रशांत बढे यांनी सहकार्य केले.

- **हिंगण्यात राष्ट्रभक्ती समूहगीतांच्या सुरांनी विद्यार्थ्यांनी जिंकली उपस्थितांची मने**

२६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त विशेष उपक्रम म्हणून यशवंतराव चव्हाण सेंटर, नागपूर व श्री संत गमाजी महाराज शिक्षण संस्था, हिंगणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हिंगणा तालुक्यातील आंतरशालेय विद्यार्थी देशभक्ती समूहगान स्पर्धा – २०२६ चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी देशप्रेम, एकता व संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवले.

## १०.२ नाशिक

- **'गोदामाईच्या साक्षीने फुलवू' या काव्योत्स्वाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नाशिक तर्फे शुक्रवार, दि. ४ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा केंद्र नाशिक येथे 'गोदामाईच्या साक्षीने फुलवू' या काव्योत्स्वाचे आयोजन करण्यात आले. काव्योत्स्वाचे हे तिसरे वर्ष. तसेच सुरेखा अशोक बोऱ्हाडे लिखित 'देदीप्यमान शलाका' या पुस्तकाचे प्रकाशनसुद्धा करण्यात आले.

कवींनी विविध विषयावर जसे की गोदावरी नदी प्रदूषणावर टीकात्मक कविता, निसर्ग, राजकारण इत्यादी कविता सादर केल्या. कार्यक्रमाचा शेवट 'निर्मल पावन विशाल सुंदर आमची गोदावरी' या गाण्याने झाला. केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, प्रा. अशोक पिंगळे, ॲड. राजेंद्र डोखळे, श्रीमती सुरेखा बोऱ्हाडे, मा. आमदार अजय नाना बोरस्ते, श्री. प्रकाशजी होळकर, व्यवस्थापक श्री. गणेश ढगे उपस्थित होते. श्री. सचिन कुशारे यांनी या वेळी साहाय्य केले.

- **सृजन अंतर्गत शहरी शेतीवर कार्यशाळा**

सृजन उपक्रमांतर्गत रविवार, दि. २७ जुलै २०२५ रोजी 'शहरी शेती' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेस इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सेंद्रिय शेतकरी व

सम्यक ग्रीनचे संचालक, श्री. मंदार वैद्य यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना समर्पक व सुलभ पद्धतीने शेती कशी करावी यावर मार्गदर्शन केले. अनुभवाधारित शिक्षण सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढविणे हा या कार्यशाळेमागील उददेश होता.

माती, बी, पाणी व निसर्गाच्या सानिध्यात शिक्षण देणे यांचे महत्त्व आयोजकांनी अधोरेखित केले. लहान वयातच पर्यावरणपूरक जीवनशैलीकडे वळण लागावे आणि नैसर्गिक प्रक्रियेशी भावनिक नाते तयार व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. उपस्थित प्रत्येक विद्यार्थ्याला चव्हाण सेंटरतर्फे विविध फळझाडांची आणि भाज्यांची बीजे भेट देण्यात आली. या वेळी केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, सचिव प्रा. अशोक पिंगळे, ॲड.राजेंद्र डोखळे, श्रीमती सुरेखा बोऱ्हाडे, समन्वयक श्री. भूषण काळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. नीरज भोर, श्री. शरद जाधव, श्री. गणेश ढगे, श्री जयराम पिंपळके यांनी परिश्रम घेतले.

- **गुलजार...एक मूड...एक कैफियत... संगीतमय कार्यक्रम**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिकचे सरचिटणीस ॲड. बाबुराव ठाकरे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त गुलजार...एक मूड...एक कैफियत या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी गंगापूर रोडवरील रावसाहेब थोरात सभागृहात पार पडला. बोले रे पपीहरा, सुरमयी अखियोमे, गोरा गोरा अंग, तुझसे नाराज नही जिंदगी, कतरा कतरा, बेचारा दिल क्या कारे, मेरा कुछ सामान, छोटी सी कहाणी, आपकी आखोमे यांसह अनेक सदाबहार गीते सादर करण्यात आली.

या कार्यक्रमास केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, म.वि.प्र.स. चे संचालक ॲड. आर. के. बच्छाव, केंद्राचे सचिव प्रा. अशोक पिंगळे आदी उपस्थित होते. गायिका रागिणी कामतीकर, डॉ. सागर काकतकर आणि सहकार्यांनी मैफलीत रंग भरले. स्मिता मालपुरे यांनी निवेदन केले तर अनुश आढाव कीबोर्डवर आणि अभिजित शर्मा ऑक्टोपॅडवर होते. कलाकारांचे आभार व सूत्रसंचालन केंद्राचे सदस्य ॲड. राजेंद्र डोखळे यांनी केले.

- **अभ्यासिकेतील विद्यार्थी गणेश दशरथ नेहरे यांची MPSC मार्फत PSI पदी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभ**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिकच्या अभ्यासिकेतील विद्यार्थी गणेश दशरथ नेहरे यांचे शिक्षण मराठा विद्या प्रसारक समाजच्या KTHM महाविद्यालयात झाले असून त्यांनी रोइंग या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय पदक प्राप्त केले आहे. ते गेल्या ३ वर्षापासून क्रीडा व स्पर्धा परीक्षेची तयारी करीत होते. अत्यंत खडतर आणि सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा अधिकारी झाला. त्याचा सत्कार करण्यासाठी केंद्रातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि ग्रंथभेट देऊन गणेश नेहरे यांचा सत्कार करून त्याला भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी व्यवस्थापक श्री. गणेश ढगे, श्री. संतोष गीते, श्री. विशाल गुंबाडे तसेच अभ्यासिकेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान सोहळ्याचे आयोजन**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नाशिक आणि मराठा

विद्या प्रसारक समाज यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक विद्यालय मखमलाबाद येथे विशेष व्याख्यान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्य व्याख्याते म्हणून मा. संजय भगवंतराव पाटील - मा. शिक्षणाधिकारी व उपप्राचार्य एस.व्ही.के.टी. महाविद्यालय, देवळाली यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी मा. यशवंतराव यांनी अनेक आघाड्यांवर नवनवीन योजना सुरू केल्या. सहकारी चळवळीला बळ दिले. साहित्य आणि संस्कृती यांच्या विकासासाठी महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ निर्माण केले. पंचायत राज्य योजनेला गती दिली.

कार्यक्रमास छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मखमलाबाद येथील शिक्षकवृंद तसेच जिल्हा केंद्राचे सचिव प्रा. अशोक पिंगळे, सदस्य सुप्रिया मोरे, सुरेखा बोऱ्हाडे तसेच म.वि.प्र. चे रमेश पिंगळे व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १०.३ औरंगाबाद ( छत्रपती संभाजी नगर )

- **'महाराष्ट्राचा सीबीएसई पॅटर्न' या विषयावर शिक्षण कट्टा**

आगामी शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीपासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार, या संदर्भातील माहिती विधिमंडळाला मा. शिक्षण मंत्री यांनी दिली. शिक्षण हा समाजाच्या जिव्हाळ्याचा आणि देशाच्या भवितव्याचा विषय असल्याने या निर्णयाची चर्चा सर्वत्र सुरू झाली. या चर्चेच्या संदर्भाने शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र-छत्रपती संभाजीनगर आणि श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था यांच्यावतीने 'महाराष्ट्राचा सीबीएसई पॅटर्न' या विषयावर शिक्षण कट्टा आयोजित करण्यात आला होता. मंगळवार, ८ एप्रिल २०२५ रोजी सायं. ५ ते ७ या वेळेत गोविंदभाई श्रॉफ ललित अकादमी सभागृह, स. भु. परिसर, औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाला.

कट्ट्याच्या अध्यक्षस्थानी सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. श्रीरंग देशपांडे होते तर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी गठित राज्य सुकाणू समितीचे सदस्य सचिन उषा विलास जोशी, राज्य अभ्यासक्रम आराखडा समितीचे सदस्य महेंद्र गणपुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बदलामुळे 'घोका आणि ओका' ही पद्धत संपुष्टात येणार असून पाठांतरावर भर न देता, संकल्पनात्मक अभ्यासक्रमावर भर दिला जाणार आहे, अशी माहिती नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी गठित राज्य सुकाणू समितीचे सदस्य सचिन उषा विलास जोशी यांनी दिली.

कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई विभागीय केंद्र छत्रपती संभाजीनगरचे सचिव नीलेश राऊत, योगेश कुदळे, ज्ञानप्रकाश मोदाणी, वाल्मीक सुरासे, लेखाविभागाच्या साहाय्यक संचालक शीतल महाले, रमेश ठाकूर, राजेश हिवाळे, आसाराम शेळके, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, राजेंद्र वाळके आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. मोरे तर आभार डॉ. विनोद सिनकर यांनी मानले.

- **कथा घेरा**

मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाऊंडेशनच्या वतीने आयोजित मासिक अभिवाचन उपक्रमांतर्गत 'कथा घेरा' या कथा-अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, १९ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६

वाजता व्ही. शांताराम थियेटर येथे करण्यात आले होते. सुप्रसिद्ध कथाकार बालाजी सुतार यांनी या वेळी सादरीकरण केले. त्यांनी या वेळी फरसाण, फ्रॉईड आणि किरकोळ वार्डातल्या गोष्टी या दोन कथांचे अभिवाचन केले.

- **जर्मन लघुपट प्रदर्शन – AIFF Round the Year उपक्रम**

अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (AIFF) अंतर्गत वर्षभर राबवण्यात येणाऱ्या `AIFF Round the Year' उपक्रमाच्या माध्यमातून 'चित्रपट चावडी' मध्ये गोएथे-इन्स्टिट्यूट (Goethe-Institute) यांच्या सहकार्याने जर्मन लघुपटांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम २६ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता एमजीएम कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथील व्ही. शांताराम थिएटर येथे संपन्न झाला. कार्यक्रमास चित्रपटप्रेमी, विद्यार्थी, अभ्यासक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रदर्शनात It's Just A Whole, The Waiting, Sentimental Stories, I See Them Bloom, Silent Night आणि Kassieren या दर्जेदार जर्मन लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले. विविध सामाजिक, मानवी आणि समकालीन विषयांवर भाष्य करणाऱ्या या चित्रपटांनी प्रेक्षकांना जागतिक सिनेमातील वैविध्यपूर्ण कथनशैलीचा अनुभव दिला.

या उपक्रमाचे आयोजन मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन, एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स, एमजीएम जर्नालिझम विभाग आणि चित्रपट चावडी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. तसेच AG Kurzfilm, Goethe-Institut, German Films, Clermont-Ferrand International Short Film Festival आणि Kurzfilmagentur Hamburg यांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम अधिक समृद्ध झाला.

या विशेष प्रदर्शनाच्या माध्यमातून स्थानिक प्रेक्षकांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जर्मन लघुपटांचा आस्वाद घेण्याची संधी मिळाली. विविध देशांतील चित्रपटसंस्कृतीचा परिचय करून देणे, जागतिक चित्रपटांविषयीची जाण वाढविणे आणि सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक दृढ करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश यशस्वीरीत्या साध्य झाला.

- **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार प्रदान सोहळा**

यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार, ३० मे २०२५ रोजी स. ९ वा. रुक्मिणी सभागृह, एम.जी.एम. परिसर येथे मा. राजेश टोपे व मा. अंकुशराव कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

समृद्ध समाज निर्मितीसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या माध्यमातून शेती, युवक, महिला, शिक्षण, आरोग्य अशा विविध क्षेत्रात खूप मोठे सामाजिक कार्य सुरू आहे. या माध्यमातून समर्पित भावनेने, लक्ष केंद्रित करत, जिद्द, चिकाटी, मेहनत घेत, अडचणीत तग धरून राहत, सकारात्मक आणि सातत्य ठेवत काम करणारी ही आजची तरुण पिढी सर्वांसाठी प्रेरक आहे. भारताचे उद्याचे भविष्य असणाऱ्या तरुणाईस आज यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार देत असताना अभिमान वाटतो, असे प्रतिपादन राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी या वेळी केले.

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रात विधायक, भरीव व विशेष कामगिरी करणाऱ्या युवक-युवतींना दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार सोहळ्याचे आज एमजीएम परिसरातील रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन करण्यात आले होते. या वेळी राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, कार्यकारिणी सदस्य डॉ.अपर्णा कक्कड, लेखक दासू वैद्य, संयोजक नीलेश राऊत, केतकी नेवपुरकर, गौरव सोमवंशी,विभागप्रमुख संतोष मेकाळे व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

आज झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात ७ विविध विभागांमध्ये एकूण १६ पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. महाराष्ट्रातील युवकांच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे, हे या पुरस्कारांचे उद्दिष्ट आहे. रोख रक्कम २१ हजार, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्काराचे स्वरुप आहे.

**यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार २०२४-२५ सालचे मानकरी खालीलप्रमाणे आहेत :**

| **विभाग** | **पुरस्कार प्राप्त मानकरी** | **विभाग** | **पुरस्कार प्राप्त मानकरी** |
|---|---|---|---|
| साहित्य | विनायक होगाडे (कोल्हापूर)<br>मृदगंधा दीक्षित (पुणे) | सामाजिक | आकाश टाले (नागपूर)<br>ऋतुजा जेवे (बुलढाणा) |
| इनोव्हेटर | सुश्रुत पाटील (पालघर)<br>पद्मजा राजगुरू (परभणी) | क्रीडा | ओजस देवतळे, नागपूर (धनुर्विद्या)<br>हृतिका श्रीराम, सोलापूर (डायव्हिंग) |
| पत्रकारिता | प्रथमेश पाटील (पुणे)<br>ज्योती वाय. एल. (मुंबई) | उद्योजक | जयेश टोपे (नाशिक)<br>शिवानी सोनवणे (पुणे) |
| रंगमंचीय कलाविष्कार | कृष्णाई उळेकर, धाराशिव (लोककला)<br>तन्वी पालव, सिंधुदुर्ग (शास्त्रीय नृत्य) | रंगमंचीय कलाविष्कार | ऋतुजा सोनवणे, जळगाव (शास्त्रीय संगीत)<br>कल्पेश समेळ, रायगड (नाट्य) |

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक नीलेश राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशश्री मुळे हिने केले तर आभार विभागप्रमुख संतोष मेकाले यांनी केले. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

- **डॉ. गणेश चंदनशिवे यांचा विशेष सत्कार सोहळा**

मराठवाड्याचे भूमिपुत्र तथा मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख आणि सुप्रसिद्ध सिने-पार्श्वगायक, लोककलावंत डॉ. गणेश चंदनशिवे यांना लोककला क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी अखिल भारतीय नाट्य परिषदेचा अत्यंत प्रतिष्ठेचा ‘सर्वोत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार’ नुकताच प्रदान करण्यात आला आहे. याच अनुषंगाने मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन, महात्मा गांधी मिशन,

अभ्युदय फाऊंडेशन व नागरिकांच्या वतीने डॉ. गणेश चंदनशिवे यांचा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सत्कार सोहळा दि. २१ जून २०२५ रोजी एमजीएमच्या रुक्मिणी सभागृह येथे पार पडला. या वेळी मंचावर एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम, ज्येष्ठ अभिनेते प्रा. डॉ. दिलीप घारे, डॉ. दिलीप महालिंगे, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, नीलेश राऊत, डॉ. रेखा शेळके, प्रेरणा दळवी, विजय राऊत, डॉ. शिव कदम आदि मान्यवर उपस्थित होते.

सत्कार सोहळ्यानंतर डॉ. चंदनशिवे यांचे विशेष कला सादरीकरण झाले. या सादरीकरणाला रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश राऊत यांनी केले. सन्मानपत्र वाचन श्रीकांत देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिव कदम यांनी केले तर आभार महेश अचिंतलवार यांनी मानले.

- **चित्रपट चावडीत 'अ कॉफी इन बर्लिन' चित्रपटाचे प्रदर्शन**

शनिवार, १२ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता एमजीएम येथील व्ही. शांताराम प्रेक्षागृहात सिनेसृष्टीतील गाजलेला चित्रपट A Coffee in Berlin (2022) दाखविण्यात आला.

`A Coffee in Berlin' हा जर्मन ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाइट चित्रपट जन ओले गर्स्टर (Jan-Ole Gerster) यांनी दिग्दर्शित केला असून, हा त्यांचा पहिलाच चित्रपट आहे. चित्रपटाचा नायक निको फिशर (प्रमुख भूमिका टॉम शिलिंग - Tom Schilling) बर्लिनमध्ये दिशाहीन आणि उद्ध्वस्त जीवन जगत असतो. एका दिवसाच्या कालखंडात घडणाऱ्या घटनांमधून, त्याच्या आयुष्यातील विस्कळीतपणा, त्याचे आत्मपरीक्षण आणि सामाजिक व्यवस्थेबाबतचे निरीक्षण या चित्रपटात प्रभावीपणे मांडले आहे. एकाच वेळी गंभीर, विनोदी आणि मार्मिक असा हा चित्रपट, तरुण पिढीच्या मानसिकतेचे आणि शहरी अस्तित्वाच्या समस्या दर्शविते. या चित्रपटाला जर्मनीतील अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले असून, विशेषत: German Film Award (Best Film, Best Dierctor, Best Actor) यासारख्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.

- **अभिनेते मिलिंद शिंदे यांच्या तिरिया काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न**

अभिनेते मिलिंद शिंदे यांनी 'तिरिया' काव्यसंग्रहात त्यांच्या आयुष्यात आलेल्या अनुभवांना अलगदपणे कवितेमध्ये शब्दबद्ध केले आहे. यामध्ये अनेक स्त्रियांची कैफियत मांडली असून अठ्ठावीस युगाच्या बायकांच्या एकटेपणाचे समूहगान म्हणजे 'तिरिया' काव्यसंग्रह असल्याचे प्रतिपादन कवि दासू वैद्य यांनी केले.

मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन आणि एमजीएम कॉलेज ऑफ कम्युनिकेशन कल्चर अँड मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ जुलै २०२५ रोजी आयोजित अभिनेते मिलिंद शिंदे यांच्या 'तिरिया' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आईनस्टाईन सभागृह, एमजीएम परिसर येथे संपन्न झाला. या वेळी, कवि दासू वैद्य यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

या प्रकाशन सोहळ्यास अभिनेते मिलिंद शिंदे, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा.ऐश्वर्य पाटेकर, मैत्री पब्लिकेशनच्या मोहिनी कारंडे, नीलेश राऊत, डॉ. रेखा शेळके, प्रेरणा दळवी, डॉ. शिव कदम व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

या वेळी बोलताना अभिनेते मिलिंद शिंदे म्हणाले, पडद्यावर खलनायकाच्या भूमिकेत काम करणारी माणसे कायम त्याच भूमिकेत असतात असा काहींचा गैरसमज असतो. आजपर्यंत आयुष्यात ज्या महिला मला भेटल्या त्या अनुभवातून मी हे लिहिले आहे. हे आपण सिनेमात - नाटकात मांडावे का असे मला वाटले मात्र, सगळी पात्रे त्यामध्ये समाविष्ट करता येत नाहीत म्हणून मी हे कवितेच्या माध्यमातून सगळे मांडले आहे.

प्रकाशन समारंभानंतर अभिनेता मिलिंद शिंदे यांनी आपल्या काही विशेष कवितांचे सादरीकरण केले. तसेच एमजीएम विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्रेरणा खरात, पल्लवी बेंद्रे, वैशाली दाभाडे आणि विशाखा शिरवाडकर या विद्यार्थ्यांनी तिरिया काव्यसंग्रहातील काही कवितांचे या वेळी सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश राऊत यांनी केले. सूत्रसंचालन धम्मपाल यांनी केले तर आभार प्रशांत पवार यांनी मानले.

- **'जिगीषा नाट्यसहवास' संपन्न; अभिजित झुंझारराव यांना या वर्षीचा 'मिलिंद सफई पुरस्कार' प्रदान**

'जिगीषा'च्या चाळिसाव्या वर्धापनदिनापासून छत्रपती संभाजीनगरमध्ये आयोजित होणारा नाट्यमहोत्सव दि. २२, २३, २४ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाला. महात्मा गांधी मिशन आणि 'मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन' या संस्थांच्या सहयोगाने साजऱ्या होणाऱ्या या नाट्यसहवासाचे यंदाचे तिसरे वर्ष होते. या वर्षीच्या नाट्यमहोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार दि. २२ ऑगस्ट रोजी ज्येष्ठ नाटककार, दिग्दर्शक सतीश आळेकर यांच्या हस्ते एम. जी.एम. परिसरातील रुक्मिणी सभागृहात सायं. ६ वा. झाले.

या नाट्यमहोत्सवात 'जिगीषा' तर्फे 'मिलिंद सफई पुरस्कार' सुरु करण्यात आला आहे. नोकरी, उपजिविका सांभाळून रंगभूमीवर सातत्याने काम करणाऱ्या रंगकर्मीची निवड या पुरस्कारासाठी केली जाते. या वर्षी हा पुरस्कार अभिजित झुंझारराव या दिग्दर्शक - अभिनेत्याला नाट्यमहोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात श्री. सतीश आळेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी अंकुशराव कदम, नंदकिशोर कागलीवाल, कुलगुरू डॉ विकास सपकाळ, चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी, डॉ आशिष गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन समारंभानंतर त्याच रंगमंचावर दि. २२ ऑगस्ट रोजी सायं. ७.३० वा. सतीश आळेकर लिखित आणि अनुपम बर्वे दिग्दर्शित 'ठकीशी संवाद' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. यात सुव्रत जोशी, गिरिजा ओक हे कलावंत होते.

तत्पूर्वी याच परिसरात नाट्यविषयक पुस्तकांचे अभिनव पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आले होते. केवळ 'नाटक' या प्रकारातील नाट्यसंहिता, नाट्यसमीक्षा, नाट्यविषयक अभ्यासपूर्ण लेख, कलावंतांची आत्मचरित्र यांचा या प्रदर्शनात अंतर्भाव असेल. त्यात 'पॉप्युलर', 'राजहंस', 'मौज', 'मॅजेस्टिक' आणि इतर अनेक नामवंत प्रकाशन संस्थांची नाट्यविषयक ग्रंथसंपदा रसिक वाचकांना उपलब्ध करुन देण्यात आली. मुख्य उद्घाटन सोहळ्यापूर्वी नाटककार सतीश आळेकर यांच्या हस्ते या 'पुस्तक प्रदर्शना'चे उद्घाटन संध्या. ५ वा. झाले.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांच्या समवेत विशेष संवाद व्ही. शांताराम सभागृहात आयोजित करण्यात आला होता. संध्या. ७ वा.

जयेश आपटे दिग्दर्शित आणि पर्ण पेठे, सिद्धेश पुरकर अभिनित 'तोत्तोचान' या नाटकाचा प्रयोग रुक्मिणी सभागृहात सादर करण्यात आला.

दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वा. 'नरहर कुरुंदकर: एका विचारवंताची अपरिचित गोष्ट' हे अभिवाचन अजय अंबेकर ज्योती अंबेकर यांनी सादर केले. ज्याचे सादरीकरण व्ही. शांताराम सभागृहात संपन्न झाले. दि. २४ ऑगस्ट रोजी रात्री ८ वा. संत एकनाथ नाट्यगृहात 'जिगीषा-अष्टविनायक' निर्मित, क्षितिज पटवर्धन लिखित आणि चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'भूमिका' हे नाटक सादर झाले. ज्यात समिधा गरू, जाई खांडेकर, जयश्री जगताप, अतुल महाजन, सुयश झुंझुरके आणि सचिन खेडेकर अशा कलाकारांचा समावेश होता. या प्रयोगाने नाट्यमहोत्सवाचा यशस्वीरीत्या समारोप झाला.

- **आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या ४१ व्या पुण्यतिथीनिमित्त 'बिहार विधानसभा निवडणूक निकालाचा अन्वयार्थ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई विभागीय केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम विद्यापीठ आणि कॉलेज ऑफ कम्युनिकेशर्न मिडिया यांच्या वतीने 'बिहार विधानसभा निवडणूक निकालाचा अन्वयार्थ' या विषयावर सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता, विनोबा भावे सभागृह, एमजीएम परिसर येथे ज्येष्ठ पत्रकार प्रशांत कदम यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी, द्वारकाभाऊ पाथ्रीकर, नीलेश राऊत, डॉ.रेखा शेळके व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नीलेश राऊत यांनी केले, सूत्रसंचालन रुपेश मोरे यांनी केले तर आभार डॉ. रेखा शेळके यांनी मानले.

महाराष्ट्राचा बिहार झाला आहे, हे आपण सर्रासपणे म्हणत आलोय मात्र, आताची स्थिती पाहता बिहार बरे म्हणण्याची वेळ आपल्या महाराष्ट्रावर आलेली आहे. 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना' सारख्या योजनांच्या माध्यमातून मतदारांना सरकारी तिजोरीतून विकत घेण्याचा नवीन पायंडा आताच्या राजकारणी मंडळींनी सुरू केल्याचे पाठीमागील काही निवडणुकांवरून आपल्या लक्षात येते. अशा प्रकारचा एक नवीन फंडा राजकारणी लोकांना सापडला आहे. शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असताना ते प्राधान्यक्रम कुठेच दिसत नसल्याचे ज्येष्ठ पत्रकार प्रशांत कदम यांनी या वेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुबोध जाधव, श्रीकांत येरुळे, वैशाली बाविस्कर, आशा देशपांडे, मंगेश निरंतर, ज्ञानेश बोद्रे, किशोर नरवडे, अरुण घोडके आदींनी प्रयत्न केले.

- **११ व्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजन**

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाया अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव बुधवार, २८ जानेवारी ते रविवार, १ फेब्रुवारी २०२६ यादरम्यान हा महोत्सव आयनॉक्स थिएटर प्रोझोन मॉल, छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न झाला.

भारतीय सिनेमा स्पर्धा गट ज्युरी समितीचे अध्यक्ष आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ध्वनी संयोजक, ऑस्कर पुरस्कार विजेते पद्मश्री रसूल पुकूट्टी (कोचीन) हे होते. फिप्रेसी ही चित्रपट समीक्षकांची आंतरराष्ट्रीय संघटना आहे. फिप्रेसी भारत हे जगभरातील महोत्सवांमधून उत्तम चित्रपट निवडून त्यांना पुरस्कार प्रदान करतात. त्या पुरस्कारांना आंतरराष्ट्रीय सन्मान मानले जातो. या समितीचे ज्युरी अध्यक्ष ज्येष्ठ चित्रपट समीक्षक डॉ.सी.एस. व्यंकटीस्वरन (कोचीन) तर डॉ.मीनाक्षी दत्ता (दिब्रुगड) व एम.एम.व्हेट्टीकाड (नवी दिल्ली) हे मान्यवर या समितीत होते.

चित्रपट महोत्सवाचा उद्‌घाटन सोहळा बुधवार, २८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता रूक्मिणी सभागृह, एमजीएम परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाला. यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार महान भारतीय संगीतकार, पद्मविभूषण इल्लैयाराजा  यांना त्यांच्या भारतीय सिनेमातील अतुल्य सांगितिक योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आल. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, महोत्सव संचालक सुनील सुकथनकर, महोत्सवाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, प्रोझोनचे सेंटर डायरेक्टर व वरिष्ठ उपाध्यक्ष कमल आर. सोनी यांची उपस्थिती होती.

महोत्सवाचा समारोप सोहळा रविवार, ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ५ वाजता आयनॉक्स प्रोझोन मॉल येथे संपन्न झाला. प्रसिद्ध दिग्दर्शक व निर्माते आनंद एल. राय व ऑस्कर विजेते साउंड डिझायनर रसूल पुक्कूट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप सोहळा संपन्न झाला.

'परज्या' या चित्रपटाला यंदाचा सुवर्ण कैलास पुरस्कार वितरित करण्यात आला.

- **'सजग पालकत्व' या विषयावर डॉ. नंदू मुलमुले यांच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन**

बदलत्या सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थितीत शालेय विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक विकास आणि सजग पालकत्व या विषयांना वाढते महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार तथा महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त 'सजग पालकत्व ; अर्थपूर्ण शिक्षण' या विषयावर प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. नंदू मुलमुले यांच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते.

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर आणि श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ही मुलाखत  गुरुवार, १२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता  गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृह, औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाली.

या कार्यक्रमात महाराष्ट्रातील ज्येष्ठ व ख्यातनाम मानसोपचार तज्ज्ञ डॉ नंदू मुलमुले यांच्याशी विशेष संवाद आयोजित करण्यात आला होता. प्रसिद्ध शिक्षण कार्यकर्ते सचिन उषा विलास जोशी (नाशिक) यांनी मुलमुले यांची मुलाखत घेतली. या प्रसंगी स. भु. शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, नीलेश राऊत आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात 'खरे शिक्षण म्हणजे नेमके काय ?', 'सजग पालकत्व प्रत्यक्षात कसे घडवावे ?', 'मुलांच्या मानसिक आरोग्याची जपणूक कशी करावी ?' अशा महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. मानसशास्त्र

आणि शिक्षण यांचा संगम घडवून पालक आणि शिक्षकांना विचारांची स्पष्टता, आत्मविश्वास आणि मुलांच्या भविष्याला योग्य दिशा देण्यासाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा केंद्राचे कोषाध्यक्ष सचिन मुळे, सचिव नीलेश राऊत, प्रा. दासू वैद्य, डॉ. आनंद निकाळजे, डॉ रेखा शेळके, डॉ. प्रेरणा दळवी, दळवी, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, श्रीकांत देशपांडे, निखिल भालेराव आदींनी प्रयत्न केले.

- **'गांधी टॉक्स' चित्रपटाचे प्रदर्शन**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छ. संभाजीनगर व मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (AIFF) राऊंड द इयर कार्यक्रमांतर्गत रविवार, १५ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स् येथील व्ही. शांताराम प्रेक्षागृहात 'गांधी टॉक्स' हा चित्रपट दाखविण्यात आला. या वेळी चित्रपटाचे दिग्दर्शक श्री. किशोर बेळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या चित्रपटात महात्मा गांधींच्या विचारांचा आधुनिक काळाशी असलेला संबंध आणि त्याची उपयुक्तता यावर संवेदनशील पद्धतीने भाष्य केले आहे. समाजातील बदलते मूल्य, नैतिकता आणि मानवी वर्तन यावर सूक्ष्म निरीक्षण करणारा हा चित्रपट प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतो.

- **धोरण कुठंवर आलं गं बाई' या विशेष चर्चासत्राचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर, एम.जी.एम. विद्यापीठ आणि एम.जी.एम. कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफएम यांच्या संयुक्त विद्यमाने १६ मार्च रोजी 'धोरण कुठंवर आलं गं बाई' या विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. एम.जी.एम. विद्यापीठातील आईन्स्टाईन सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेणुका कड यांनी महिला शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे लक्ष वेधले. महिला धोरणांमध्ये शेतजमिनीवर नाव, अनुदान आणि शेतकरी म्हणून कायदेशीर अधिकार देण्याच्या विविध तरतुदी असूनही, स्थानिक प्रशासकीय स्तरावर महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. विशेषत: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील महिलांच्या नावावर जमिनीची कागदपत्रे सहजपणे होत नसल्याने, हे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी त्यांनी केली. यासोबतच, चार महिला धोरणे येऊनही शहरे आणि ग्रामीण भागातील सार्वजनिक स्वच्छतागृहांचा प्रश्न कायम असून, प्रवासाच्या मार्गांवर ही सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत उपस्थित महिलांनी आक्रमक भूमिका मांडली. बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका महिलांना बसत असून आगामी धोरणांमध्ये हवामान बदलाच्या मुद्द्यांचा समावेश करावा, असेही कड यांनी आवर्जून सांगितले.

या चर्चासत्रात मराठवाडा कॅन्सर हॉस्पिटलचे डॉ. वरुण नागोरी यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन करताना महिलांना ब्रेस्ट, सर्व्हायकल आणि तोंडाच्या कॅन्सरबद्दल सविस्तर माहिती दिली. महिलांनी स्वत:च्या शरीरातील बदलांकडे दुर्लक्ष न करता, वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगरमधील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या १२ अंगणवाडी सेविकांचा विशेष सन्मान करण्यात आला. या प्रसंगी एम.जी.एम. विद्यापीठाच्या प्रा. आशा देशपांडे, डॉ. डी. जॉन चेल्लादुराई, डॉ. अमोल चाटे, चव्हाण

सेंटरचे मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, जिल्हा सचिव निलेश राऊत, सुबोध जाधव, साधना तिप्पनाकजे आणि एम.जी.एम. कम्युनिटी रेडिओच्या अश्विनी यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाला जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून प्रतिसाद दिला.

## १०.४ अंबाजोगाई

- **'पुस्तकाचे गाव- संकल्पना' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर- बीड, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ मे २०२५ रोजी 'यशवंत सभागृह' यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई येथे "पुस्तकाचे गाव- संकल्पना" या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अनिकेत लोहिया- अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण सेंटर- बीड हे होते तर श्रीमती अश्विनी सोनवणे- अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई; श्री. दीपक वजाळे- उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई; श्रीमती प्रियंका टोंगे- मुख्याधिकारी नगरपरिषद अंबाजोगाई; श्री.संदीप शिंदे- पहिले पुस्तकाचे गाव भिलार येथील चळवळीचे कार्यकर्ते; श्री. अमर हबीब- जेष्ठ साहित्यिक तथा सामाजिक कार्यकर्ते; श्री दगडूदादा लोमटे- उपाध्यक्ष यशवंतराव चव्हाण सेंटर, बीड यांनी या चर्चासत्रात सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंतराव चव्हाण सेंटर, बीडचे सचिव डॉ. नरेंद्र काळे यांनी केले. अंबाजोगाई शहराला पुस्तकाचे गाव म्हणून ओळख प्राप्त झाली याचा सर्व नागरिकांना आनंद झाला. पुस्तकाचे गाव या संकल्पनेचे नेमके स्वरूप कसे आहे?, यात नागरिकांची भूमिका काय असावी? या संदर्भात विचारमंथन करण्यासाठी या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे असे मत डॉ. नरेंद्र काळे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रातील पहिले पुस्तकाचे गाव- भिलार येथील चळवळीचे कार्यकर्ते श्री. संदीप शिंदे हेही या चर्चासत्रात सहभागी झाले होते.

निसर्गरम्य महाबळेश्वर जवळील 'भिलार' हे गाव पहिले पुस्तकाचे गाव म्हणून शासनाच्या वतीने घोषित करण्यात आले. यात माजी शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांची फार मोठी भूमिका होती. अंबाजोगाई पुस्तकाचे भांडार आहे. पर्यटन दृष्टीने समृद्ध आहे. आद्य कवी मुकुंदराज यांची पार्श्वभूमी या गावाला लाभलेली आहे, असे श्री. संदीप शिंदे यांनी सांगितले. श्री. दीपक वजाळे- सहसमन्वय अधिकारी पुस्तकांचे गाव, अंबाजोगाई तथा उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी प्रत्येक जिल्ह्यात किमान एक तरी गाव 'पुस्तकाचे गाव' असावे यासाठी शासकीय पातळीवरून प्रयत्न केले जात आहेत. मोबाईल संगणकाच्या या जगात वाचन संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. ती परत रुजवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज शासनाच्या लक्षात आली असून यातून बौद्धिक समृद्धता वाढीस लागेल. शासनाची जागरूकता, दूरदृष्टी यातून अधोरेखित होते असे ते म्हणाले. श्रीमती. प्रियंका टोंगे- मुख्याधिकारी नगरपरिषद, अंबाजोगाई यांनी सर्वसामान्य लोकांपर्यंत हा उपक्रम घेऊन जाण्यासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहेत. समाजमंदिरासारख्या ठिकाणी वाचनालये उभी राहिली पाहिजेत जेणेकरून जास्तीत जास्त वाचक निर्माण होतील आणि सर्वांचा फायदा होईल असे सांगितले. श्री. दगडूदादा लोमटे- उपाध्यक्ष यशवंतराव चव्हाण सेंटर, बीड यांनी साहित्य संस्कृती विषयक उपक्रम, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, यशवंतराव चव्हाण सेंटर, बीड यांसारख्या अनेक गोष्टी अंबाजोगाईत वाचन संस्कृती रुजविण्यात कारणीभूत

ठरल्या आहेत असे सांगितले. श्री. अमर हबीब- ज्येष्ठ साहित्यिक तथा सामाजिक कार्यकर्ते यांनी 'पुस्तकाचे गाव' या संकल्पनेतून पुस्तक वाचण्यासाठीचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. सोबतच पुस्तक मेळावे आयोजित करून वाचन संस्कृती जोपासली पाहिजे. 'उत्तम वाचक पुरस्कार' योजना सुरू करून वाचन संस्कृतीला पोषक वातावरण तयार केले पाहिजे. अंबाजोगाई शहरातील हजारो विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा होईल. त्यांचे भविष्य समृद्ध होण्यासाठी 'पुस्तकाचे गाव' ही संकल्पना फार महत्त्वाची आहे. शहरातील महिला वर्गालाही पुस्तके सहज उपलब्ध होतील. या प्रक्रियेमध्ये कविवर्य दासू वैद्य यांची भूमिका फार महत्त्वाची आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अनिकेत लोहिया- अध्यक्ष यशवंतराव चव्हाण सेंटर, बीड यांनी या संपूर्ण प्रक्रियेविषयी समाधान व्यक्त केले तसेच 'पुस्तकाचे गाव' या प्रक्रियेला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. श्री. अभिजीत जोंधळे- कोषाध्यक्ष यशवंतराव चव्हाण सेंटर, बीड हे या कार्यक्रमाचे समन्वयक होते. डॉ. नरेंद्र काळे- सचिव यशवंतराव चव्हाण सेंटर, बीड यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाने हा कार्यक्रम संपन्न झाला. श्री. अनिकेत लोहिया, प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

## १०.५ ठाणे

- **पावसाळी काव्य संमेलन**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र ठाणे यांच्यातर्फे **'सरीवर सरी'** हे पावसाळी काव्य संमेलन रविवार, १० ऑगस्ट २०२५ रोजी वा. अ. रेगे सभागृह, मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे येथे आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ कवी श्री. सतीश सोळांकुरकर यांनी केले. श्री. मुरलीधर नाले यांच्या हस्ते कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. महेश केळुसकर आणि सर्व कवींचा सत्कार करण्यात आला.

सुप्रिया पुरोहित-हळबे, कवयित्री पियानी पाटील, डॉ. प्रमोद बेजकर, कॅप्टन वैभव दळवी, डॉ. विवेक बोंडे, कवयित्री महानंदा मोहिते, ज्येष्ठ कवी श्री. अशोक बागवे, डॉ. महेश केळकर, डॉ. प्रमोद बेजकर, श्री. सतीश सोळांकुरकर यांनी सादर केलेल्या विविध गझल आणि कविता रसिकांच्या मनात घर करून गेल्या.

अनघा प्रकाशनच्या रामदास खरे यांच्या 'द लॉस्ट बॅलन्स' या कादंबरीला कोल्हापूर येथील शब्दांगण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कवी अशोक बागवे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. केंद्राचे सचिव श्री. अमोल नाले यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाला अनेक कवी, काव्यरसिक, ज्येष्ठ नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

- **शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांच्या कार्याचा गौरव**

शनिवार, २० सप्टेंबर २०२५ रोजी मुरबाड तलुक्यातील महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, धसई येथे शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या कार्याची या वेळी विशेष प्रशंसा करण्यात आली. सत्कारमूर्ती म्हणून प्रणाली घोलप, गणेश ठाकरे, अनंत भोंडीवले, शिल्पा तारमळे व सुदर्शन पाटील यांचा गौरव करण्यात आला. पुरस्कारार्थींनी अध्यापनातील अनुभव मांडले. तर मान्यवरांनी समाजोपयोगी कार्याचा व

विद्यार्थ्यांच्या जीवनात घडवलेल्या सकारात्मक बदलांचा उल्लेख केला. या उपक्रमामुळे शिक्षकांना नवी ऊर्जा मिळून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीच्या कार्याला अधिक प्रेरणा मिळेल असे सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून मुरलीधर नाले, डॉ. महेश केळुसकर, अमोल नाले, शालेय समितीचे अध्यक्ष श्रीधर घोलप, केंद्र प्रमुख राजाराम घुडे, प्राचार्य प्रमोद घोलप व वरिष्ठ शिक्षक शरद धनराळे उपस्थित होते.

- **'ज्येष्ठ नागरिक गौरव आणि विचारांचे वाण' या दोन अभिनव उपक्रमांचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र ठाणे आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ रोजी 'ज्येष्ठ नागरिक गौरव आणि विचारांचे वाण' या दोन अभिनव उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ञ श्री. रमेश पानसे होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्टगीताने झाली. डॉ. निर्मोही फडके यांनी पानसे सरांची दीर्घ मुलाखत घेतली. या वेळी बोलताना पानसे सर म्हणाले की राजकारणी मंडळी शिक्षण क्षेत्रात लुडबुड करत राहिल्यामुळे महाराष्ट्रात शिक्षणाचा खेळखंडोबा झाला. मराठी भाषा हे बालशिक्षणाचं एकमेव माध्यम असलं पाहिजे. हिंदी आणि इंग्रजी भाषांचं स्तोम माजवणारे मराठी लोक आपल्या मुलांच्या क्षमता नासवण्याचं पाप करत आहेत, असं स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. रमेश पानसे यांनी केले.

मुलाखती नंतर श्री. व सौ. पानसे यांच्या हस्ते के. जी. अनंतकृष्णन (फार्मसुटीकल क्षेत्र), डॉ. उमेश खारीवाला(रक्त संकलन), डॉ. माधव म्हस्के (हास्य योग) या ज्येष्ठांचा तर 'विचारांचे वाण' अंतर्गत श्रीमती राधा राव (समाजिक क्षेत्र), श्रीमती सुषमा पाध्ये (शैक्षणिक क्षेत्र), श्रीमती दीपा जोशी (साहित्य व अध्ययन), श्रीमती अवनी चोरगे (ग्रंथालय क्षेत्र) यांचा शाल, प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीमती पानसे, रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थच्या अध्यक्ष रोटेरियन ममता वंजानी, निशा कपीला, मेधा जोशी, वैदेही संतोष, चव्हाण सेंटरचे अध्यक्ष मुरलीधर नाले, डॉ. महेश केळुसकर, डॉ. अनंत देशमुख आदी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. ठाण्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर आवर्जून या कार्यक्रमाला उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. अमोल नाले यांनी केले.

## १०.६ नवी मुंबई

- यशवंतराव चव्हाण सेंटरच्या आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक विभागाच्या वतीने दोन दिवस लोणावळा, जिल्हा पुणे येथे ७ व ८ जून २०२५ रोजी आयोजित जिल्हा समन्वय कार्यशाळेस नवी मुंबई केंद्राचे प्रतिनिधी म्हणून श्री. प्रभाकर गुमास्ते (ज्येष्ठ नागरिक समन्वयक) व सौ. मनिषा देसाई (आरोग्य व दिव्यांग समन्वयक) दोन दिवस उपस्थित राहून सहभागी झाले. दि. ७ जून २०२५ रोजी श्री. सचिनभाऊ अहिर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

- ज्येष्ठ लेखक, पानिपातकार श्री. विश्वास पाटील यांची जानेवारी २०२६ मध्ये सातारा येथे होणाऱ्या ९९व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनपदी निवड झाल्याने दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी त्यांचा नवी मुंबई केंद्रातर्फे भव्य सत्कार करून व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी कविवर्य प्रा. अशोक बागवे प्रमुख पाहुणे होते. नेरूळ येथील स्टर्लिंग कॉलेजच्या हॉलमधील या कार्यक्रमास नवी मुंबईतील साहित्यप्रेमी रसिकांनी गर्दी केली होती. केंद्र अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी हा सत्कार केला.

- दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई केंद्राच्यावतीने नवी मुंबईचे लेखक, व्याख्याते जयवंत पाटील यांच्या "प्रतिष्ठान : पैठणचा समग्र इतिहास" या ६०० पानी ग्रंथाचे पानिपा तकार विश्वास पाटील यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कुसुमाग्रज सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्टर्लिंग कॉलेजच्या भव्य भरगच्च रसिकांमध्ये समारंभ संपन्न झाला. या वेळी ललित पथक व अन्य लेखक आणि कवी यांनी आवर्जून उपस्थिती लावली. केंद्राचे सचिव डॉ. अशोक पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

- महिला दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नवी मुंबई यांच्यातर्फे 'धोरण कुठवर आलं ग बाई?' हा महिला धोरणाचा आढावा घेणारा दर्जेदार चर्चासत्राचा कार्यक्रम साहित्य मंदिर हॉल, सेक्टर ६, वाशी येथे आयोजित करण्यात आला होता. या वेळी भीम रासकर, प्रा. वृषाली मगदूम, हसीना खान व दत्ता बाळसराफ यांनी आपले उत्कृष्ट विचार मांडले. अभ्यासपूर्ण अशा चर्चासत्राचे उद्घाटन केंद्र अध्यक्ष प्रमोद कर्नाड व साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी यांनी केले. अनेक विचारवंत, रसिक या वेळी उपस्थित होते.

- संस्कृत पंडिता डॉ. मीनाताई कुलकर्णी यांचे 'कर्मयोग : आजच्या जीवनशैलीसाठी सुखाची गुरुकिल्ली' ह्या विषयावर दि. १४ मार्च २०२६ रोजी स्टर्लीन कॉलेज हॉल, नेरूळ येथे मा. आमदार दिलीपराव वळसे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास पूर्वाताई वळसे पाटील यांच्यासह अनेक महिला विचारवंत रसिक उपस्थित होते. कर्मयोग सोपा करून सांगत त्यातून सुखी जीवनशैली मीनाताई यांनी विषद केली. केंद्रातर्फे वक्त्या मीनाताई कुलकर्णी यांचा अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. केंद्राचे सचिव डॉ. अशोक पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. कोषाध्यक्ष भाऊसाहेब शिंगाडे यांनी या कार्यक्रमास सत्र प्रायोजकत्व दिले.

- दि. १४ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या ११३व्या जयंतीचे औचित्य साधून नवी मुंबई केंद्रातर्फे आमदार मा. दिलीपराव वळसे पाटील यांच्या शुभहस्ते नवी मुंबईत विविध कार्यक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ५ गुणवंत संस्था व ११ गुणवंत व्यक्तींना 'कृतज्ञता पुरस्कार २०२६' प्रदान करण्याचा जोरदार कार्यक्रम स्टर्लिंग कॉलेज, नेरूळच्या हॉलमध्ये संपन्न झाला. पाणी स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संतुलनासाठी जाणीव सामाजिक संस्था, पुरुष हक्कासाठी झटणाऱ्या वास्तव फाऊंडेशन, सांस्कृतिक संवर्धन करणाऱ्या पनवेल कल्चरल सेंटर, पर्यावरण संतुलन व सामाजिक कार्य करणाऱ्या एन्वायरमेंट लाईफ फाऊंडेशन व कविता / शिवमाहात्म्य प्रसार यासाठी झटणाऱ्या शिवतुतारी प्रतिष्ठान या ५ संस्थांना मा. दिलीपरावजी वळसे पाटील साहेबांनी कृतज्ञता पुरस्कार प्रदान केले. तसेच वैद्यकीय सेवा, भजन संस्कृती प्रसार, प्रशासन, क्रीडा, बालसाहित्य, पत्रकारिता, गझल प्रसार अशा विविध कार्यक्षेत्रात उत्तम कार्य करणाऱ्या नवी मुंबईतील गुणी ११ व्यक्तींचाही सन्मान यावेळी पुरस्कार देऊन करण्यात आला. या वेळी नामदार दिलीप वळसे पाटील साहेबांनी चव्हाण यांचा संपूर्ण जीवनपटच आपल्या भाषणातून उलगडला. सन २०१८ पासून केंद्राचा असा पुरस्कार समारंभ सुरू असल्याचे केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी त्यांच्या प्रास्ताविकात सांगितले. डॉ. अशोक पाटील यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमास सुमारे ४०० श्रोत्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

या वेळी नवी मुंबईच्या पोलीस अधीक्षक सौ. पुष्पलता दिघे व साहाय्यक पोलीस आयुक्त (निवृत्त) शिवाजीराव देसाई यांना राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल दिलीपराव वळसे पाटील साहेबांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## १०.७ कराड (विरंगुळा)

- **स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांची ४२वी पुण्यतिथी**

दि. १ जून २०२५ रोजी स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांच्या ४२व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर, कराडचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते स्व. यशवंतराव व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पांजली वाहण्यात आली. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण सेंटर, कराड व वेणुताई चव्हाण स्मारक, कराडचे सदस्य श्री. राजेश पाटील वाठारकर, श्री. नंदकुमार बटाने, नगरसेवक श्री. सौरभ पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

- **७९वा स्वातंत्र्यदिन**

यशवंतराव चव्हाण सेंटर, कराड येथे १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त सेंटरचे सदस्य श्री. नंदकुमार बटाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व यशवंतराव चव्हाण सेंटर, कराडचे सर्व कर्मचारी तसेच अभ्यासिकेतील विद्यार्थी उपस्थित होते.

- **खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांची यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या कराड येथील समाधिस्थळ व विरंगुळा निवासस्थानास भेट.**

दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांनी कराड येथील स्व.यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या समाधिस्थळी दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. त्यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांचे निवासस्थान ‘विरंगुळा’ येथील यशवंतराव चव्हाण साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच सौ. वेणूताई चव्हाण स्मारक कराड येथील यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. या वेळी माजी खासदार श्री. श्रीनिवास पाटील, श्री सारंग पाटील, श्री. नंदकुमार बटाने व इतर मान्यवर उपस्थित होते.

- **स्व. यशवंतराव चव्हाण यांची ४१वी पुण्यतिथी**

स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या ४१ व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर कराडचे सदस्य श्री. नंदकुमार बटाने यांच्या हस्ते स्व.यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

- **प्रजासत्ताक दिन**

प्रजासत्ताकदिनानिमित्त २६ जानेवारी २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर कराडचे सदस्य श्री. नंदकुमार बटाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराडचे व यशवंतराव चव्हाण सेंटर कराडचे सर्व कर्मचारी तसेच अभ्यासिकेतील विद्यार्थी उपस्थित होते.

- **स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांची १००वी जयंती**

सौ. वेणूताई चव्हाण यांच्या १००व्या जयंती दिनानिमित्त २ फेब्रुवारी २०२६ रोजी बारामती शहरातील कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी भेट दिली. श्री. अभिजित घाडगे बारामती शहराध्यक्ष यांच्या हस्ते सौ. वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

- **स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांचा ११२वा जयंती सोहळा**

स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या ११२व्या जयंतीनिमित्त १२ मार्च २०२६ रोजी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस यशवंतराव चव्हाण सेंटर कराडचे सदस्य श्री. नंदकुमार बटाने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. आदर्श प्राथमिक शाळा कराड येथील शिक्षक व १०५ विद्यार्थ्यांनी येथे भेट दिली. इयत्ता चौथी मधील विद्यार्थी हुमेर सय्यद याने "मी यशवंतराव होणार" या विषयावर भाषण केले.

## १०.८ सोलापूर

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र सोलापूरच्या नूतन अध्यक्षा डॉ. निशिगंधा माळी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारणीची पहिली बैठक संपन्न झाली. या प्रसंगी कोषाध्यक्ष श्री. राजशेखर शिवदारे, ज्येष्ठ सदस्य श्री. दत्ता गायकवाड, श्री. रजनीश जोशी, श्री. राहुल शहा, श्री. जयकुमार शितोळे, श्रीमती तेजश्री श्रीरेखम, श्री. बालाजी जक्का, श्री. सुशांत कुलकर्णी आणि सचिव श्री. दिनेश शिंदे उपस्थित होते.

- गवत्या मारूती चौक मोहोळ येथे श्रीमती शाहीन शेख यांनी महिलांसाठी उद्योजकता मार्गदर्शन शिबिर आयोजित केले. दि. १७ जून ते १९ जून २०२५ या तीन दिवसीय शिबिरात महिलांना लाईट माळा तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरात ६५ महिलांनी सहभाग नोंदवला. पैकी चाळीस महिलांनी लाईट माळा तयार करण्याची तयारी दर्शवली. त्या महिलांना लाईट माळा तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यांना लागणारा कच्चा माल पुरवणारे व तयार माल घेणाऱ्या व्यापाऱ्यांशी त्यांचे बोलणे घडवून आणले. या प्रशिक्षणासाठी सौ. अपर्णा माने आणि कल्याणी यांनी मार्गदर्शन केले. हे शिबिर पार पाडण्यासाठी श्रीमती नसरून शेख, कु. सोफीया शेख, डॉ. अर्शिया शेख, बिबीसारा शेख, नसरीन शेख, सौ. राजश्री लोळगे, सौ. सुनीता हडलगी व सारिका गवळी यांनी सहकार्य केले.

- मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५ रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात यशवंतराव चव्हाण सेंटर सोलापूर जिल्हा केंद्राच्यावतीने यशवंतराव चव्हाण यांच्या ४१ व्या पुण्यतिथीनिमित प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत मा. दत्ता गायकवाड होते. प्रारंभी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मा. गायकवाड यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याला उजाळा दिला. स्वागत व प्रास्ताविक केंद्राच्या अध्यक्षा डॉ. निशिगंधा माळी यांनी तर वक्त्यांचा परिचय युवा विभागाचे सर्फराज शेख यांनी केले. केंद्राचे सचिव दिनेश शिंदे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

● श्री. तुळजाभवानी शिक्षणशास्त्र महाविद्यालय (माढा) यांच्या वतीने ज्येष्ठ नेते पद्मविभूषण आदरणीय शरदचंद्र पवार यांच्या ८५व्या वाढदिवसानिमित्त १२ डिसेंबर २०२५ रोजी ज्येष्ठ विचारवंत प्रा. एम. आर. कांबळे यांचे 'संविधान निर्मितीनंतरचे बदल' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान माढ्याच्या श्री. तुळजाभवानी संस्थेच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पार पडले. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे संस्थापक सदस्य डॉ. एम. पी. सुरवसे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

● २५ डिसेंबर २०२५ रोजी उद्योगशिल्प स्व. जयकुमार पाटील यांच्या २१व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर आणि महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'सोलापुरातील उद्योग उभारणीचा काळ' या विषयावर विचारवंत प्रा. डॉ. रावसाहेब पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. गटनिदेशक अशोक मिर्गाने अध्यक्षस्थानी होते. निदेशक बाळकृष्ण पुतळे यांनी प्रस्तावना केली. निदेशक माधुरी मेहेर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. निरंजन कुराडे यांनी आभार मानले. संयोजक दिनेश शिंदे, सुशांत कुलकर्णी, विनायक सुतार यांची प्रमुख उपस्थिती होती.

● १२ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना यशवंतराव चव्हाण सेंटर. जिल्हा केंद्र सोलापूरच्या अध्यक्ष डॉ. निशिगंधा माळी कोल्हे, मा. संदेश तोडकरी आणि नागरिक उपस्थित होते.

## १०.९ परभणी

● यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, परभणी आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील दिव्यांगांची जनजागृती करण्याच्या हेतूने राष्ट्रीयन्यास कायद्याखाली १९९९ चा ४४ वा कायदा या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यशाळा दि. १८ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र येथे संपन्न झाली. मा. श्री. माणिकराव मुलगीर यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिरात प्रमुख अतिथी म्हणून पुण्याचे मा. नंदकुमार फुले यांनी त्यांच्या भाषणाने राष्ट्रीयन्यास कायद्याखालील सर्व मुद्द्यांची सविस्तर माहिती समजावून सांगितली. चव्हाण सेंटरच्या आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक विभाग प्रमुख, दीपिका शेरखाने यांनी त्यांच्या भाषणात पालकत्व म्हणजे काय त्याचे प्रमाणपत्र काढल्याने त्याचे काय फायदे होतात याबद्दल सविस्तर माहिती दिली.

● जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय परभणी, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील मतिमंद, सेरेब्रल पाल्सी, ऑटीझम आणि बहुविकलांग दिव्यंगाची जनजागृती करण्याच्या हेतूने राष्ट्रीयन्यास कायद्याखाली १९९९ चा ४४ वा कायदा या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिर आणि निरामया योजनेचे कार्ड वाटपाचा कार्यक्रम दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र परभणी येथे सपंन्न झाले. मा. श्री. पी. एम. लांडे (जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी), यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिरास, प्रमुख अतिथी म्हणून श्री. ज्ञानेश्वर भुसारे, मानसशास्त्रज; के. विठ्ठलराव मोरे मतिमंद विद्यालय, पूर्णा; श्री. माणिकराव मुलगीर; श्री. अद्वैत मुळी इ. मान्यवर उपस्थित होते. मा. श्री. पी. एम. लांडे (जिल्हा दिव्यांग

सक्षमीकरण अधिकारी) यांनी मतिमंद, सेरेब्रेल पाल्सी, ऑटीझम आणि बहुविकलांग दिव्यांगांच्या सर्व पालकांना निरामया योजनेबद्दल सर्व माहिती दिली व त्यांच्या हस्ते निरामय कार्डाचे वाटप देखील करण्यात आले.

- यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र परभणीच्या वतीने 'धोरण कुठवर आलं गं बाई' या चर्चासत्राचे १४ मार्च २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. परभणीतील कमलताई जामकर महिला महाविद्यालयात चर्चासत्र घेण्यात आले. यात महिला सुरक्षा, सक्षमीकरणावर मान्यवरांनी मत व्यक्त केले. महाविद्यालयाच्या डॉ. संगीता आवचार, जी. प. माजी अध्यक्ष कुसुम देशमुख, पूजा थिटे, प्रा. डॉ. रामचंद्र भिसे, कुसुमताई देशमुख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रामचंद्र भिसे होते.

### १०.१० बुलढाणा

- **गुणवंतांचा सत्कार सोहळा**

विद्यार्थी एखादा मोटिवेशनल व्हिडिओ पाहून प्रेरित होतो आणि स्पर्धा परीक्षाची तयारी करायला लागतो. त्यामध्ये पुण्यासारख्या ठिकाणी येऊन स्पर्धा परीक्षाची तयारी करतो. त्यामध्ये मग कुणी ४ तास अभ्यास करतो ८ तास अभ्यास करतो. अभ्यास करणे म्हणजे फक्त सिलॅबस वाचन नव्हे. तुम्ही किती तास अभ्यास केला यापेक्षा तुम्ही त्यातलं किती वेचलं हा महत्त्वाचा भाग आहे. तुम्हाला मनाला वाटते की आम्ही एवढ्या तास अभ्यास केला परंतु हा फक्त आभास आहे, तुम्ही त्यातलं किती वेचलं हाच खरा तुमचा अभ्यास आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यास आणि आभास मधला फरक समजावून घेणं गरजेचे आहे असे मत प्रा. गणेश कड, गणेश कड अकॅडमी, पुणे चे संचालक यांनी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा व शिवराय शिक्षण संस्था अंत्रि तेली यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वी भव: गुणवंतांचा सत्कार सोहळा व मार्गदर्शनाच्या निमित्ताने बुलढाणा येथे दि. २९ जून २०२५ रोजी झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राचे अध्यक्ष तथा माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे, आमदार धीरज लिंगाडे यांच्या हस्ते सत्कारसोहळा पार पडला.

जिल्ह्यातील एमपीएससी, यूपीएससीच्या माध्यमातून अलिकडच्या काळात निवड झालेल्या अ व ब वर्गातील उमेदवारांचा सत्कार व तालुक्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत प्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रम राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट इमारत, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धा परीक्षाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी खास गणेश गड अकॅडमी, पुणे येथील प्रा. गणेश कड सर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व महामानवांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविकामध्ये नरेश शेळके सचिव, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, बुलढाणा यांनी सांगितले की, जिल्ह्यामध्ये स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा सत्कार करताना त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देताना त्यांच्या हातून सर्वसामान्यांना न्याय देत असताना त्यांच्याकडून राष्ट्र निर्माण कार्यात मोलाचे योगदान द्यावे व यांच्या कडून प्रेरणा घेऊन इतर विद्यार्थ्यांनी देखील आपल्या यश संपादित करावं यासाठी पेरणा व मार्गदर्शन यशस्वी भव: कार्यक्रमातून मिळावी या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार धीरज लिंगाडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, स्पर्धा परीक्षेच्या तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर काही धोरणाच्या माध्यमातून अन्याय होतो त्या त्या वेळेस आम्ही

वेगवेगळ्या माध्यमातून यांच्यासाठी आवाज उठवून वेळोवेळी त्यांना न्याय मिळवून दिला आहे. भविष्यात देखील या सर्व विद्यार्थ्यांना मागे आम्ही खंबीरपणे उभे राहू असे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी सांगितले की स्पर्धा परीक्षेतील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत यांना मिळालेले हे यश हे नियमित आणि स्थिर अभ्यास व परिश्रम केल्यामुळे मिळालेले आहे. सहजासहजी कोणालाही काहीच मिळत नाही आणि परिश्रम व मेहनतीला शॉर्टकट नाही, त्यामुळे आपण सर्वांनी गुणवंतांचा आदर्श घेत आपले इच्छित ध्येय साध्य करावे.

सुरुवातीला जिल्ह्यातील एमपीएससी यूपीएससी च्या माध्यमातून निवड झालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे सन्मानपत्र पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांनी स्वागत केले. शिवाय बारावीमध्ये बोर्डाच्या परीक्षेत आपापल्या कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे देखील सन्मानपत्र व पुष्प देऊन स्वागत केले व त्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. या वेळी विशेष सत्कार साखळी जिल्हा परिषद शाळेत शिकत असलेली इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी कु.सिद्धी राजू सोनवणे हिचा करण्यात आला. सिद्धीने वडिलांची गरिबी व कौटुंबिक अडचणीला आपल्या प्रगतीला बाधा न बनवता चिकाटी व मेहनतीच्या जोरावर वयाच्या अवघ्या नव्या वर्षी महाराष्ट्रातील सर्वात कठीण कोकण कडा हे शिखर सर करून इंडिया ग्रीनीज बुक ऑफ रेकॉर्ड नाव नोंदविला आहे. या चिमुकलीचा सन्मानपत्र देऊन सत्कार करताना उपस्थितांची छाती अभिमानाने भरून आली. तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी देखील तिच्या पाठीमागे आपण सर्वांनी उभे राहावं अशी आशा व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरचे प्रा.रामकृष्ण मस्के ,डॉ.अण्णासाहेब मळसणे, रणजीत सिंग राजपूत ,ज्ञानेश्वर वायाळ ,डॉ.विजयाताई काकडे, उर्मिलाताई बावस्कर , विजय गवारगुर, अशोकराव निकम, सुरेशजी देवकर ,डॉ.गायत्रीताई सावजी, प्रा.ज्योतीताई पाटील ,डॉ.ज्योतीताई खेडेकर, ह भ प शंकर महाराज प्रा.अंजली गाढे ,प्रा.सचिन खरे, प्रा.रवींद्र गाडेकर ,प्रा.दीपक आमले ,प्रा.आर डी जाधव, प्रा.गजानन चौधरी, प्रा.तरमळे, प्रा.चव्हाण , मीनाक्षी सरदेशमुख यांनी परिश्रम घेतले. यावेळी पीएम जाधव, भगवानराव शेळके, तुळशीराम काळे ,नसीम शेठ, नाझीमाताई खान ,माजी सभापती लक्ष्मीताई शेळके ,नलिनी टापरे, अनिल कोळसे ,खांडवे सर ,हरिदास अंभोरे, पुरुषोत्तम पडघान, काकडे साहेब, गोपाळराव देशमुख, गजानन भिवसनकर, विश्वासराव शेळके, शिवदास शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

- **स्वातंत्र्यदिनानिमित्त स्वतंत्र ज्योत रॅलीचे आयोजन**

इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी असंख्य ज्ञात अज्ञात युवकांनी स्वतंत्र संक्रमणात उड्या घेतल्या, स्वातंत्र्य योध्यांनी लाठ्या काठ्या खाल्ल्या, तुरुंगवास भोगला, छातीवर गोळ्या झेलल्या, फासावर गेले तेव्हा आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. आज आपण स्वातंत्र्याचे फळे चाखत असताना स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाची जाण ठेवून आपल्या देशाला घातक असलेल्या प्रवृत्तीपासून सजगक राहावं. आजच्या युवकाचे कार्य देश हिताचे असावे, सामाजिक एकता व अखंडता टिकविणे ही युवकांची जबाबदारी आहे असे मत नरेश शेळके सचिव, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा यांनी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला बुलढाण्यामध्ये आयोजित युवा स्वतंत्र ज्योतरॅली मध्ये केले.

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला युवा स्वतंत्र ज्योत रॅली काढली जाते. बुलढाणा शहरांमध्ये देखील यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा व शिवराज शिक्षण संस्था अन्त्रि तेली यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या सतरा वर्षापासून युवा स्वतंत्र ज्योत रॅली काढली जाते. या वर्षी देखील १४ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री आठ वाजता जयस्तंभ चौक बुलढाणा येथून सदर रॅली काढण्यात आली. रॅलीच्या सुरुवात ज्योत प्रज्वलित करून करण्यात आली. रॅली ही शहराच्या मुख्य मार्गाने देशभक्तिपर नारे देत हुतात्मा गोरे स्मारक येथे आली. हुतात्म्य गोरे स्मारकावर पुष्पचक्र सर्मपित करून देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १०.११ जालना

- **धोरण कुठवर आल गं बाई ! महिला धोरण विषय एक दिवशीय चर्चासत्र**

जागतिक महिला दिनाच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई जिल्हा केंद्र जालना आणि अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने महिला धोरणाचा सर्वंकष आढावा घेणारे चर्चासत्र दि. १४ मार्च २०२६ रोजी सेंटरचे कार्यक्रम व्यवस्थापक दत्ताजी बाळसराफ, महिला बाल कल्याण विभाग जालनाच्या अधिकारी कोमल कोरे यांच्या विशेष उपस्थितित संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे अध्यक्ष राजेश भैय्या टोपे होते. या प्रसंगी डॉ. मंगल मुळे, अश्विनी धन्नावत, रेणुका कड यांनी मार्गदर्शन केले.

- **'पहिली पासून तीन भाषा' या विषयावर शिक्षण कट्ट्याचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई जिल्हा केंद्र जालना आणि शिक्षण विकास मंचाच्या वतीने स्थानिक जिल्हा परिषद्मुलांच्या प्रशाळेत 'पहिली पासून तीन भाषा' या विषयावर १ जुलै २०२५ रोजी शिक्षण कट्ट्याचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे माजी आरोग्य मंत्री तथा सेंटरचे जिल्हा अध्यक्ष राजेश भैय्या टोपे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात जिल्ह्यातील नामवंत शिक्षकांनी हजेरी लावली. शिक्षण अभ्यासक महेंद्र गणपुले, बाल मानस मेंदू तज्ज्ञ श्रुती पानसे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. शिक्षणाधिकारी संगीता भागवत आणि बाळासाहेब खरात यांची मुख्य उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली. पहिली पासून तीन विषयाची सक्ती करणे बाल मानसशास्त्राच्या आणि भाषा शिकण्याच्या नैसर्गिक क्रमाच्या विरोधी असल्याचा सूर या परिषदेतून निघाला.

- **मान्सून शो २०२५ जालना, दिनांक ४, ५, ६ ऑक्टोबर २०२५; जिल्हा स्तरीय कलाप्रदर्शनाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र जालना, अजिंठा चित्रकला महाविद्यालय जालना व रोटरी क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मान्सून शो २०२५ कला प्रदर्शन अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना या ठिकाणी दि. ४, ५, ६ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडले. या प्रदर्शनात जालना जिल्ह्यातील साठ कलावंतांनी सहभाग नोंदविला त्यांच्या एकूण १२२ कलाकृती प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आल्या. कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रासाठी उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ मुंबईचे संचालक श्री. विनोदजी दांडगे उपस्थित होते

तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी मंत्री तथा यशवंतराव चव्हाण सेंटरचे जिल्हाध्यक्ष श्री राजेशभैय्या टोपे व प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक श्री. अरुणजी अग्रवाल, रोटरी क्लबच्या अध्यक्षा श्रीमती वर्षा पित्ती, दिव्य मराठीचे राज्य प्रमुख श्री सुभाष बोंद्रे, सरला अग्रवाल, मा. रेखा बैजल, मा. बाबासिंग बायस व प्रा. डॉ. रावसाहेब ढवळे उपस्थित होते. उदघाटन सत्रानंतर पुढील सत्रामध्ये कला शिक्षकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून चित्रकार दीपक अंकलखोपे, सांगली यांनी कलाशिक्षणातील बदलते स्वरूप या विषयावर माहिती दिली. त्यासोबतच चित्रकार सागर पवार मालेगाव यांनी फलक लेखनाचे प्रात्यक्षिक दिले. या कार्यशाळेसाठी जिल्ह्यातील ५० कलाशिक्षक उपस्थित होते.

- **छोटे सायंटिस्ट उपक्रम २.० : दि. १५ नोव्हेंबर २०२५; एक दिवसीय विज्ञान शिक्षक कार्यशाळा**

'छोटे सायंटिस्ट' उपक्रमावर आधारित विज्ञान शिक्षकांसाठीच्या एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र जालना, सेवा सहयोग फाऊंडेशन पुणे आणि जालना एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जालना येथील मामा चौकातील क्रिस्टल कॉम्प्लेक्समधील 'विज्ञान शोधवाटिका' सभागृहात करण्यात आले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विज्ञान विषयाचे अध्ययन - अध्यापन आता कौशल्यपूर्णच असावे, तरच आपला निभाव लागेल असे स्पष्ट प्रतिपादन राज्याचे माजी आरोग्यमंत्री तथा यशवंतराव चव्हाण सेंटर केंद्राचे जिल्हाध्यक्ष राजेशभैय्या टोपे यांनी केले.

विद्यार्थ्यांना कठीण वाटणारा विज्ञान हा विषय शिक्षकांनी सोप्या - सुटसुटीत पद्धतीने, प्रात्यक्षिक प्रयोग व अनुभवावर आधारित प्रत्यक्ष कृतींव्दारेच शिकवणे ही काळाची गरज असल्याचेही राजेशभैय्या टोपे यांनी या वेळी विविध उदाहरणांद्वारे लक्षात आणून दिले.

कार्यशाळेत पुणे येथील केपीआयटी सीएसआरचे समन्वयक रविराज दामले आणि ज्ञान प्रबोधिनीच्या श्रीमती प्रियंका दामले व रेचर श्रावस्ती यांनी विविध सत्रांत प्रश्न कौशल्य आणि वर्गीकरण कौशल्य याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

- **आयडॉल शिक्षकांचा सत्कार : राज्यस्तरीय निवड झालेल्या दहा शिक्षकांचा सत्कार**

राज्य शासनाचा आयडॉल शिक्षक पुरस्कार मिळालेल्या जिल्ह्यातील १० शिक्षक बंधू भगिनींचा सत्कार दि. २६ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई जिल्हा केंद्र जालनाच्या वतीने करण्यात आला. एकविसाव्या शतकातील विविध क्षेत्रातील आव्हानांचा जर यशस्वीरीत्या सामना करायचा असेल तर गुणवत्तापूर्ण, दर्जेदार शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यासाठी या क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेऊन वाड्या वस्तीवरील विद्यार्थ्यांना समर्पित भावनेने काम करणारे शिक्षक हे खऱ्या अर्थाने इतरांसाठी प्रेरणादायक आणि मार्गदर्शक आहेत. असे गौरवोद्गार राज्याचे माजी आरोग्य मंत्री तथा यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई, जालना जिल्हा केंद्राचे अध्यक्ष राजेश भैय्या टोपे साहेब यांनी या वेळी काढले.

या प्रसंगी पुरस्कारप्राप्त शिक्षकांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमाबद्दल त्यांनी माहिती जाणून घेतली तसेच भविष्यात कुठल्याही शैक्षणिक कार्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. केंद्राचे सहसचिव प्रा. डॉ. रंजित

बायस यांनी गुण गौरवसोहळ्यामागची भूमिका व विविध क्षेत्रातील सेंटरच्या कामाची व्याप्ती व महत्त्व विषद करून सकारात्मक कामासाठी सेंटर कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.

### १०.१२ देवराष्ट्रे (जन्म घर)

- सन २०२५-२६ या कालावधीत जन्मघर स्मारकास एकूण १३८० पर्यटकांनी भेटी दिल्या आहेत.

- दि. २५ मे २०२५ रोजी उमरखेड-महागाव विधान सभेचे मा. आ. किसनराव वानखेडे यांनी मा. चव्हाण साहेबांच्या जन्मघराला भेट दिली. "आज माझे स्वप्न पूर्ण झाले, ज्या मातीने एवढा मोठा युगपुरुष जन्माला घातला त्यांच्या जन्मघरात आज येण्याचा योग आला. ज्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वामुळे, कर्तृत्वामुळे महाराष्ट्र राज्याची ओळख निर्माण झाली या त्यांच्या छोट्याशा जन्मघराला संपूर्ण महाराष्ट्र दैवत मानतो त्या जन्मघरात येऊन, त्या मातीत येऊन धन्य झालो", असे उद्गार त्यांनी काढले.

- दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी विठामाता चव्हाण यांच्या जयंती निमित्त मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मघरामध्ये विठामातेच्या फोटोस देवराष्ट्रे गावच्या प्रथम नागरिक सरपंच श्रीमती निर्मला बोडरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

- दि. ९ ऑक्टोंबर २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई, केंद्र-देवराष्ट्रे व भारती विद्यापीठ सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये देवराष्ट्रेमधील ग्रामस्थांची दंतचिकित्सा करून त्यावर उपचार करण्यात आले. सदर शिबिरास ७२ लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

- दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी मा.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त देवराष्ट्रे गावातील जन्मघर स्मारकामध्ये त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी पदवीधर मतदार संघाचे आ. अरुण (आण्णा) लाड उपस्थित होते. त्यांच्या हस्ते मा. चव्हाण साहेबांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी कडेगावचे तहसीलदार श्री. अजित शेलार, उपविभागीय अधिकारी श्री. रणजीत भोसले हे देखील उपस्थित होते.

- दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. श्री. चंद्रकांत दळवी (रयत शिक्षण संस्था, सातारा) यांनी सदिच्छा भेट दिली. 'या छोट्याशा गावातून राज्याला, देशाला समर्थ नेतृत्व देणारे यशवंतराव चव्हाण हे आदर्श राजकीय नेते होते. या पवित्र स्थळास भेट देऊन कृतज्ञ झाल्याची भावना निर्माण झाली', असे उद्गार त्यांनी काढले.

- दि. १२ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या ११३व्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई केंद्र देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यशवंत कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील लोकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हे कवी संमेलन आयोजित केले जाते. कवी संमेलनाचे हे ११वे वर्ष आहे. बीड जिल्ह्यातील श्री. प्रभाकर

साळेगांवकर, श्री. अतुल कुलकर्णी व त्यांची टीम तसेच सांगली जिल्ह्यातील कवी एकत्रित येऊन हे कवी संमेलन पार पाडतात.

- दि. १२ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई, ठाकरसी ग्रुप मुंबई, सिकोर एड्स प्रा. लि., महाराष्ट्र राज्य केमिस्ट ड्रग्ज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मघर स्मारकामध्ये मोफत डिजिटल श्रवणयंत्र बसविण्याकरिता पूर्वतपासणी व वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी चव्हाण सेंटरच्या आरोग्य व दिव्यांग विभाग प्रमुख श्रीमती दीपिका शेरखाने व श्रीमती मनिषा खिल्लारे उपस्थित होत्या. देवराष्ट्रे पंचक्रोशीतील ज्येष्ठ नागरिकांची कर्ण तपासणी करून त्यांना मोफत श्रवणयंत्र वाटप करण्यात आले. या शिबिरामध्ये ६० लोकांना श्रवणयंत्राचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सनद पवार उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी भारती मेडिकल कॉलेज सांगली यांचे सहकार्य लाभले.

## १०.१३ कोल्हापूर

- नव महाराष्ट्राचे शिल्पकार पहिले मुख्यमंत्री व पंचायत राज्याचे जनक माजी उपपंतप्रधान स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने कोल्हापूर जिल्हा परिषद आवारात उभारलेल्या स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कोल्हापूर जिल्हा केंद्राचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील, अशोक पोवार, पद्मजा तिवले, रमेश मोरे, महादेव पाटील इ. उपस्थित होते.

## १०.१४ पुणे

- **मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी आणि चष्मे वाटप :**

सालाबाद प्रमाणे यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र पुणेच्या वतीने संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीसोबत आलेल्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी व चष्मे वाटप तसेच त्यांना सकाळी चहा-नाष्टा दिला जातो. २५०० वारकऱ्यांनी याचा लाभ घेतला. या प्रसंगी केंद्राचे सचिव श्री. अंकुश काकडे, कोषाध्यक्ष श्री. विशाल तांबे, श्री. नंदकुमार पापळ, श्री. रवी चौधरी, श्री. सुनील खताळ, श्रीमती मनाली भिलारे इत्यादी उपस्थित होते.

- **'धोरण कुठंवर आलं ग बाई' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर महिला विभाग व पुणे जिल्हा केंद्राच्या वतीने मंगळवार, दिनांक २८ एप्रिल रोजी महिला धोरणांचा आढावा घेणाऱ्या 'धोरण कुठंवर आलं गं बाई' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. पुण्यातील एस एम जोशी फाऊंडेशनच्या सभागृहात हे चर्चासत्र पार पडले. संपत्तीतील समान वाटा यापासून सुरू झालेल्या पहिल्या महिला धोरणाचा प्रवास आता कुठेतरी थकत चालला आहे. तसेच अलीकडची धोरणे सर्वव्यापक व सर्वसमावेशक नसल्याची खंत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या किरण मोघे यांनी महिला धोरणावरील चर्चासत्रात व्यक्त केली.

या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मिलिंद चव्हाण यांनी बंद पडत चाललेल्या सरकारी शाळांवर चिंता व्यक्त करत याचा परिणाम मुलींच्या शिक्षणावर होत असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, मोफत आरोग्यसेवा व शहरातही महिला सभा व वॉर्ड सभा घेण्याची गरज आहे. पुरुषांसोबत 'पुरुषत्वाच्या संकल्पने'वर काम करायला हवे. सरकारी प्रकल्प राबवताना भरपाई मिळते त्यात महिलेला किती वाटा मिळतो, हेही सरकारने तपासायला हवे, असे मत मिलिंद चव्हाण यांनी मांडले.

मिळून साऱ्याजणी नियतकालिकेच्या संपादिका गीताली वि.मं. यांनी अत्याचार करणाऱ्या पुरुषांकरता पुरुष सुधार केंद्राची गरज असल्याचे मत व्यक्त केले. पुरुषांनी मर्दानगीच्या पलीकडे विचार करायला हवा. भावनिक नातेसंबंध कसे हाताळावे हे पारंपरिकदृष्ट्या न सांगितल्याने पुरुष व्यक्त होऊ शकत नाही. तसेच कोणत्याही महिला धोरणात 'घरकामाचा मोबदला' हा मुद्दा आला नाही. घरकामाला प्रतिष्ठा मिळायला हवी असाही आग्रह गीताली यांनी केला.

या चर्चासत्रात महिलांसाठी काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या. त्यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले –

- ग्रामपंचायतील महिला कल्याण १० टक्के निधीचा वापर केवळ महिला विकासासाठीच व्हावा.
- बालविवाह रोखण्यासाठी सरपंचांनी पुढाकार घ्यावा.
- स्वच्छतागृहे नसल्याने मुलींच्या शाळागळतीचे प्रमाण वाढते.
- सरकारी शाळा बंद करण्यामुळे कष्टकरी वर्गातील मुलींचे शाळेत जायचे प्रमाण घटले.
- मालमत्तेतला अर्धा हिस्सा कलमाचा विपर्यास करत आता 'हुंडा' म्हणून मागितला जातो.
- प्रत्येक मतदारसंघात महिलांकरता कॅन्सर उपचार केंद्र शासनाने मोफत किंवा अल्प दरात सुरू करावीत.
- आर्थिक भेटीपेक्षा समान संधी आणि सक्षम कामे द्यावी.
- घटस्फोटाच्या केसेस २०-२५ वर्ष लांबणीवर आहेत.
- पतीचे निधन झाल्यानंतर वडिलोपार्जित संपत्तीत वाटा मिळण्याकरता मोठा लढा द्यावा लागतो.
- खासगी क्षेत्रात विशेषत: पुण्यातील आयटी कंपन्यांमध्ये पॉश व विशाखा समितीची कडक अंमलबजावणी होत नाही.

या मुद्द्यांवर पुढील शिफारशी वक्त्यांकडून सुचवण्यात आल्या -

विविध शासकीय अध्यादेश हातात घेऊनच सरकारी कार्यालयात जाऊन आपले प्रश्न, म्हणणे मांडावे.

वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर अनाथ आश्रमातून बाहेर पडणाऱ्या मुलींना आधार, ओळखपत्रे व स्वावलंबी होण्यासाठी योजना.

चौथ्या धोरणातील मानसिक आरोग्याच्या मुद्द्याची ठोस अंमलबजावणी व्हावी.

धोरण राबवायला राजकीय इच्छाशक्ती महत्त्वाची. त्यामुळे महिलांनी राजकारणात अधिक सक्रिय व्हावे.

लोकशाही टिकवण्यासाठी चळवळी भक्कम व्हायला हव्यात.

ग्रामसेवक ते न्यायाधीश सर्वांकरता 'जेंडर सेन्सेटायझेशन' प्रशिक्षणे ठरावीक अंतराने घ्यावीत.

परिवहन सेवा, शिक्षण व आरोग्य यांचे खासगीकरण थांबवून महिलांना रोजगार द्यावा.
मालमत्ता केवळ नावावर नाही तर महिलेच्या नियंत्रणात हवी.

या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटर पुणे जिल्हा केंद्राचे कोषाध्यक्ष विशाल तांबे यांनी प्रास्ताविक केले. सचिव अंकुश काकडे यांनी पुढील चर्चासत्रात शासकीय अधिकाऱ्यांना सहभागी करण्याची सूचना केली तर सदस्य विलास लवांडे यांनी महिलांना बुवाबाजीपासून लांब राहण्याचे आवाहन केले. महिला विभागप्रमुख साधना तिप्पनाकजे यांनी याआधीच्या ५ जिल्ह्यातील महिला धोरण चर्चासत्रांमध्ये मांडण्यात आलेल्या समस्यांची माहिती दिली. तर जिल्हा केंद्र सदस्य मनाली भिलारे यांनी आभार प्रदर्शन करताना उच्च न्यायालयाच्या महिलांसाठी स्वच्छतागृहांच्या आदेशाचा पाठपुरावा करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड मेघा सस्ते यांनी केले. या कार्यक्रमात विविध संघटनांच्या शंभर महिला प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या.

**“नवे पदवीधर, नवी विद्यालये, नवी महाविद्यालये, नव्या चिंतनशील साहित्याची गिऱ्हाईके आहेत. पण महाराष्ट्रात नवी विद्यापीठे निघूनही ग्रंथांचा प्रसार का होत नाही याचा विचार करावयास पाहिजे. विद्यापीठांनी आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. शासन यासाठी काय करू शकेल याचाही स्वतंत्रपणे विचार झाला पाहिजे. ग्रंथ प्रसार होण्याची खात्री असेल तर चांगले लेखक पुढे येतील.”**

**-यशवंतराव चव्हाण**

## यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

**यशवंतराव चव्हाण सेंटरच्या प्रकाशनांची यादी खालीलप्रमाणे :**

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र कृष्णाकांठ/यशवंतराव चव्हाण | ३००/- |
| २. | ऋणानुबंध-यशवंतराव चव्हाण | २५०/- |
| ३. | कृष्णातीरे यशवंतराव चव्हाण की आत्मकथा | ३००/- |
| ४. | कृष्णकाठ/यशवंतराव चव्हाण | ३९५/- |
| ५. | भूमिका / यशवंतराव चव्हाण | २४०/- |
| ६. | यशवंतराव चव्हाण यांची विधिमंडळातील निवडक भाषणे खंड | २५०/- |
| ७. | माझ्या विद्यार्थी मित्रानों. स्व. यशवंतराव चव्हाण यांची दीक्षान्त समारंभातील भाषणे | ३९५/- |
| ८. | सहयाद्रीचे वारे/यशवंतराव चव्हाण | २२५/- |
| ९. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन परिसंवाद /शिंदे अण्णासाहेब | २००/- |
| १०. | यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तीमत्व | १००/- |
| ११. | मार्गदर्शिका ज्येष्ठ नागरिकासाठी (मराठी) | १३५/- |
| १२. | यशवंतराव चव्हाण/महानोर ना.धो यांचे मूळ विचार. | १०/- |
| १३. | यशवंतराव चव्हाण जीवनप्रवाह फोटो अल्बम / प्रधान राम | ६५०/- |
| १४. | यशवंतराव चव्हाण यांची विधीमंडळातील निवडक भाषणे (खंड इंग्रजी)<br>Selected Speeches in the State Legislature/Khobrekar,V.G. | ३००/- |
| १५. | Y.B.Chavan A.Pictoral Biography/Pradjan R.D. | ८५०/- |
| १६. | Handbook for senior citizens (English) | १३५/- |
| १७. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००/- |

**DVD**

| | | |
|---|---|---|
| १८. | एक साठवण यशवंतराव चव्हाण सिडिज इंग्रजी भाग १ | १००/- |
| १९. | एक साठवण यशवंतराव चव्हाण सिडिज इंग्रजी भाग २ | १००/- |
| २०. | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ओडिओ DVD | ४००/- |
| २१. | प्रवासी पक्षी विडीओ DVD | ५००/- |
| २२. | पु.ल. क्रॉनिकल व्हिडिओ DVD | ६००/- |
| २३. | मी एस.एम. विडीओ DVD | ३००/- |
| २४. | यशवंतराव विडीओ DVD | ५००/- |
| २५. | यशवंतराव चव्हाण यांची निवडक भाषणे ओडिओ DVD | १००/- |
| २६. | भूमिका ऑडिओ DVD | १००/- |
| २७. | सहयाद्रीचे वारे या पुस्तकाच्या ओडिओ DVD | १००/- |
| २८. | कृष्णाकांठ या आत्मचरित्राच्या पुस्तकाच्या ओडिओ DVD | १००/- |
| २९. | माझ्या विद्यार्थी मित्रानों.. स्व. यशवंतराव चव्हाण यांची दीक्षान्त समारंभातील भाषणे ओडिओ DVD | १००/- |

**अध्यापन विभाग**

| | |
|---|---|
| ३०. शैक्षणिक गुणवत्ता आव्हान आणि आवाहन डॉ. वसंत काळपांडे | २००/- |
| ३१. हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०/- |
| ३२. उपक्रम वेचक-वेधक डॉ. वसंत काळपांडे | १००/- |
| ३३. स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना सुप्रिया सुळे | २०/- |
| ३४. 'संवादिनी' सुप्रिया सुळे | २०/- |
| ३५. 'शाळांचे प्रगतिपुस्तक' डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००/- |
| ३६. शिक्षणवृत्ती डॉ. कुमुद बन्सल | २००/- |
| ३७. शिक्षणकट्टा बसंती रॉय | २००/- |
| ३८. वाटचाल ई-शिक्षणाची बसंती रॉय | २००/- |
| ३९. हवामान बदलास आमचे उत्तर | १००/- |
| ४०. Whats App चर्चा-शिक्षण विकासाच्या संपादक माधव सूर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत | २००/- |
| ४१. सेमी इंग्रजी का आणि कसे? | २००/- |
| ४२. शालेय प्रशासन आणि मानवी संबंध / डॉ. वसंत काळपांडे | २९९/- |
| ४३. देशोदेशीचे शालेय शिक्षण | ४९९/- |
| ४४. नवीन शैक्षणिक धोरण: प्रश्न मनातले | - |
| ४५. नवोपक्रमांची नवलनगरी / SPIF फेलो | ३५०/- |
| ४६. धोरण कुठवर आलं ग बाई | ३५०/- |

**शरद पवार इन्स्पायर साहित्य फेलोशिप अंतर्गत प्रकाशित पुस्तके**

| पुस्तक | लेखक | प्रकाशक |
|---|---|---|
| १. खोल खोल दुष्काळ डोळे | प्रदीप कोकरे | लोकवाङ्मय गृह |
| २. करुणापटो | मृदगंधा दीक्षित | मधुश्री पब्लिकेशन |
| ३. आधुनिक जीवशास्त्राची साधने: जनुककोशशास्त्र | असीम अमोल चाफळकर | मधुश्री पब्लिकेशन |
| ४. ज्वारीची कहाणी | धनंजय सानप | साधना प्रकाशन, पुणे |
| ५. आहार | अमृता देशपांडे | कृष्णा पब्लिकेशन्स |
| ६. द हाउस ऑफ पेपर | मूळ लेखक: कार्लोस मारिया दोमिंगेझ<br>मराठी अनुवाद: अभिषेक धनगर | कृष्णा पब्लिकेशन्स |
| ७. ब्रह्मदेशातील दिवस | मूळ लेखक: जॉर्ज ऑर्वेल<br>मराठी अनुवाद: रेश्मा महंमद तांबोळी | रुद्र पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| ८. शून्यरेषा | ज्ञानेश्वर प्रकाश जाधवर | रुद्र पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| ९. नकली पेंटिंगचं गूढ – भाग १ | विनय खंडागळे | रोहन प्रकाशन |
| १०. लांडगा आला रे आला – भाग २ | विनय खंडागळे | रोहन प्रकाशन |
| ११. बिल्लाबाँग | अक्षय दया मोहिते | ललित पब्लिकेशन |
| १२. परिवर्तनवादी चळवळीचा महानायक प्रा. विलास वाघ | गणेश उफाडे | मधुश्री पब्लिकेशन |
| १३. कुबड आणि इतर कथा | मूळ लेखक: खालीद जावेद<br>मराठी अनुवाद: विकास पालवे | पपायरस |

## Auditor's Report of YASHWANTRAO CHAVAN CENTRE, MUMBAI for the year ended 31st March, 2026

[Annexure to Report under Section 33(2) and Rule 19 of The Bombay Public Trust Act, 1950]

**Opinion**

We have audited the financial statements of, **YASHWANTRAO CHAVAN CENTRE, Mumbai** which comprise the Balance Sheet as at March 31, 2026, and the Income and Expenditure Account for the year then ended, a summary of significant accounting policies and other explanatory information. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the financial statements give the information required by the relevant sections and rules of the Bombay Public Trust Act, 1950 in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

i. In case of the Balance Sheet, of the State of Affairs of the Trust as at **31st March, 2026** and

ii. In case of the Income and Expenditure Account, of the **Surplus** for the year ended on that date.

**Basis for Opinion**

We conducted our audit in accordance with Standards on Auditing (SAs). Our responsibilities under those Standards are further described in the Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements section of our report.

We are independent of the entity in accordance with the ethical requirements that are relevant to our audit of the financial statements, and we have fulfilled our other responsibilities in accordance with these requirements. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

**Responsibilities of Management of Trust and Those Charged with Governance for the Financial Statements**

Trust Management is responsible for the preparation of these financial statements in accordance with accounting standards generally accepted in India necessary to enable the preparation of financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

In preparing the financial statements, management is responsible for assessing the entity's ability to continue as a going concern, disclosing, as applicable, matters related to going concern and using the going concern basis of accounting unless management either intends to liquidate the entity or to cease operations, or has no realistic alternative but to do so.

Those charged with governance are responsible for overseeing the entity's financial reporting process.

**Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements**

